म. ग्रं. सं. ठाणें

१४९

विषय नाटक

लेखक शि. म. परांजपे

ग्रंथालय क्रमांक ४७२

पुस्तकाचें नांव मानाजीराव

४७२

१४९

नाटक

ग ९

# मानाजीराव.

हें नाटक

महाकवि शेक्स्पियरकृत मॅक्बेथ नाटकाच्या

आधारानें

प्रो. शिवराम महादेव परांजपे, एम्. ए,

यांनीं रचिलें.

---

तें

पुणें येथें

'श्रीशिवाजी' व 'श्रीसिद्धिविनायक'

या छापखान्यांत छापिलें.

सन १८९८

किंमत बारा आणे.

( ह्या पुस्तका संबंधीं सर्व प्रकारचे हक्क मालकानें
आपणाकडे राखून ठेविले आहेत. )

## विज्ञप्ति.

प्रेक्षक आणि वाचक हो, ह्या मानाजीरावांत दोष तर पुष्कळच आहेत. तरी पण तो तुह्मांला आवडतो हें खास. ह्मणून घटकाभर करमणूक होण्यासाठीं त्याला तुमच्या पुढें आणला आहे. त्याचा अव्हेर न व्हावा.

Ganesh Bhicaji Vaishampayan

# मानाजीराव.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

स्थळ—एक मैदान.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे

[ मेघगर्जना होत आहेत व विजा चमकत आहेत. तीन चेटक्या प्रवेश करतात.]

१ चेटकी—आतां फिरून आपण केव्हां जमावयाचें?

२ चेटकी—ही गडबड संपली आणि ह्या लढाईचा काय तो निकाल लागला कीं आपण जमूंच एका ठिकाणीं.

३ चेटकी—लढाई काय आतां दिवस मावळला नाहीं तों संपेल.

१ चे०—बरें, जागा कोणती?

२ चे०—त्या माळावर.

३ चे०—तेथें आपण सगळ्यांनीं जमून मानाजीरावाला गांठायचें.

१ चे०—ठीक आहे.

सर्व— पद.

जाऊं या ॥ साऱ्या जणी आतां जाऊं या ॥
॥ ध्रु० ॥ बऱ्याचें वाईट वाइटाचें बरें टाकूं
क्षणामधें करूनियां ॥ खऱ्याचें खोटें खोट्याचें

खरें करूनि दाखवूं फिरूनियां ॥ जाऊं० ॥ हवेंत पोहूं पाण्यावर चालूं जमिनींत जाउं बुडी मारूनियां ॥ भविष्य सांगूं कुत्र्याचें रडणें पाखरांचें बोलणें ऐकुनियां ॥ जाऊं० ॥

[ सर्व जातात ]

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—परशुपुराच्या जवळील छावणी.

[पडद्याचे आंत शिंग वाजतें व नंतर राजा दमाजी, मल्हारराव, धनाजी, लक्ष्मणसिंग व हुजरे प्रवेश करतात. इतक्यांत एक जखमी झालेला शिलेदार त्यांना भेटतो. ]

**दमाजी**—ह्याचें सगळें अंग रक्तानें भरलें आहे. कोण बरें असावा हा? ह्याच्या ह्या स्थितीवरून मला असें वाटतें याला लढाईची अगदीं ताजी बातमी माहीत असली पाहिजे.

**मल्हारराव**—हाच तो रणशूर शिलेदार. मी मघाशीं शत्रूच्या हातांत सांपडत होतों तेव्हां शौर्यानें लढून मला ज्यानें सोडवलें तोच हा. या, दिलदार दोस्त, कसें काय ? बरें आहेना ? तूं जेव्हां तिकडून आलास तेव्हां लढाई कोणच्या पंथाला आली होती हें आमच्या महाराजांना सांग पाहूं.

**शिलेदार**—दोघेही पोहणारे थकून गेले ह्मणजे एकमेकांच्या गळयाला मिठ्या मारतात आणि मग त्यांतून एकालाही धड पोहतां येईनासें झालें ह्मणजे

त्यांतला कोण तरेल आणि कोण बुडेल हें जसें सांगतां येत नाहीं तशी मी निघालों तेव्हां युद्धाची स्थिति होती. तो क्रूर प्रतापराव-तो पहा बंड करण्यासाठींच निर्माण झालेला असावा, कारण कीं जगांतले सगळे दुर्गुण त्याच्या अंगांत कसे खचून भरले आहेत-त्या प्रतापरावाला पश्चिमेकडच्या मुलखांतून सैन्याचा यथास्थित पाठपुरावा झालेला आहे, आणि त्यानें हातीं घेतलेल्या ह्या कृत्यावर दैवाचीही बरीच कृपादृष्टि आहे. पण ह्या सगळ्याचा कांहीं उपयोग नाहीं. कारण तो शूर मानाजीराव-मानाजीरावच तो-त्या मानी पुरुषाला मानाजीराव हें नांव अगदीं योग्य आहे-त्यानें दैवाची किंवा कोणाचीही पर्वा न करतां शत्रूच्या रक्तानें माखलेली समशेर हातांत घेतली आणि मोठ्या शौर्यानें शत्रूचें सैन्य कापीत कापीत त्यामधून वाट करीत तो पुढें चालला. तेव्हां अखेरीस त्या गुलामाची आणि ह्याची गांठ पडली. पण त्याच्याशीं एक शद्बही न बोलतां आपल्या मानाजीराव सेनापतींनीं त्याच्या अंगावरील कातडी सोलून काढून आपल्या तटाच्या भिंतीवर त्याचें डोकें टांगून ठेविलें.

**दमाजी**-वाहवा रे मानाजीराव! मर्द असावा तर असा असावा!

**शिलेदार**-पण जेथून सूर्याचा प्रकाश निघतो तेथूनच गलबतें फोडून टाकणारीं वादळें आणि भयंकर मेघगर्जना उत्पन्न होतात त्याप्रमाणेंच जेथें आनंद होइल असें वाटत होतें तेथें मोठा दुःखाचा प्रसंग कोसळला. न्याय आणि पराक्रम हीं एकत्र झाल्यामुळें ते बंडवाले

लोक पळून जात होते पण इतक्यांत विलासपुरच्या राजानें संधि साधून, हत्यार धरून, आणि नवीन लोकांची कुमक मिळवून, फिरून लढाईला तोंड दिलें.

**दमाजी**–तर मग हें पाहून आमचे सेनापती मानाजीराव आणि व्यंकोजीराव अगदीं भिऊन गेले असतील नाहीं ?

**शिलेदार**–होय. ज्याप्रमाणें चिमण्यांना पाहून गरूडपक्षी भितात किंवा सशांना पाहून सिंह भितात त्याप्रमाणें ते भ्याले खरे ! सरकार भ्यायाचें तर लांबच राहिलें, पण ते तोफेसारखे गर्जत होते, आणि शत्रूवर त्यांनीं शस्त्रांचा भडीमार चालू केला होता, शत्रूच्या रक्तांत त्यांनीं स्नानें केलीं होतीं. सारांश त्यावेळीं हें कुरुक्षेत्रांतील दुसरें भारतीय युद्ध आहे कीं काय असा भास होत होता.–पण माझा जीव कासावीस होत चालला आहे. ह्या माझ्या जखमांना कांहीं तरी उपाय केलाच पाहिजे.

**दमाजी**–ह्या तुझ्या लढाईतील जखमा आणि हें तुझें लढाईचें वर्णन ह्या दोन्ही गोष्टींवरून तुझी योग्यता स्पष्ट दिसून येते. जा रे कोणी तरी आणि ह्याला वैद्याकडून औषधोपचार करावा.

( हुजऱ्याबरोबर शिलेदार जातो . )

( राणोजी प्रवेश करतो. )

**दमाजी**–हा इकडे कोण येत आहे ?

**मल्हार**०–हा राणोजी.

**लक्ष्मणसिंग**–ह्याच्या मुद्रेवरून हा अतिशय त्वरेच्या कामासाठीं येत असावा असें वाटतें. ज्याला

कांहीं अद्भुत गोष्टी कळवावयाच्या असतात त्याच्या मुद्रेवर असली त्वरा दिसत असते.

**राणोजी**– महाराजांचा जयजयकार असो.

**दमाजी**– तुम्हीं कोणीकडून आलां ?

नं. १९६

**राणोजी**-महाराज, जेथें विलासपुरच्या राजाचीं निशाणें फडकत आहेत आणि त्यामुळें जेथें आपल्या लोकांचा शौर्याग्नि अगदीं गारठून गेला आहे अशा त्या समरांगणांतून मी आलों. पराकाष्ठेचा राजद्रोही जो कठोरपुरचा ठाकूर त्याच्याकडून कुमक आणवून आणि दुसरेंही असंख्य सैन्य जमवून त्या विलासपुरच्या राजानें मोठें घनघोर युद्ध आरंभिलें. पण अखेरीस अंगांत चिलखत घालून सज्ज झालेला संग्रामदेवतेचा प्रियकर आपला मानाजीराव ह्याची आणि त्याची लढाई जुंपली. त्यानें तरवार उसपली कीं हा उसपी. त्यानें दुसरें एखादें हत्यार काढलें कीं हा तें काढी. अशा रीतीनें लढाई करून मानाजीरावानें त्याची अगदीं खोडकी जिरविली. आणि शेवटीं आपल्या पक्षाला जय मिळाला.

**दमाजी**–वाः वाः फारच आनंदाची गोष्ट झाली.

**राणोजी**–आतां त्या विलासपुरच्या राजानें तहाचें बोलणें लाविलें आहे. पण आपल्याला त्यानें दहा हजार मोहरा दिल्यावांचून आपण त्याच्या मेलेल्या लोकांना मुठमाती देखील देण्याची परवानगी देऊं नये.

**दमाजी**–इतःपर त्या कठोरपुरच्या ठाकराच्या गोडगोड भाषणावर विश्वास ठेऊन मुळींच फसतां कामा नये. जा रे कोणी तरी आणि त्या ठाकराला

आतांच्या आतां देहांतशासन करण्याचा हुकूम दिला आहे असें प्रसिद्ध करा. आणि कठोरपुरचा ठाकूर ही त्याची पदवी आपल्या मानाजीरावाला दिली आहे असें त्यांना जाहिर करा.

**राणोजी०**-महाराज मी या कामाची व्यवस्था लावतों.

**दमाजी**- जें त्या ठाकरानें गमाविलें तें मानाजीरावानें कमाविलें हें वरें झालें.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा.

---

स्थळ–माळरान

[ मेघगर्जना चालली असतां तीन चेटक्या प्रवेश करतात. ]

१ चे०–अक्का, तूं एवढा वेळ कोणीकडे गेली होतीस ?

२ चे०–त्या किल्लेदाराची बायको बाळंतीण झाली आहे ती–तिनें साहवीच्या दिवशीं साऱ्यांना घुगऱ्या चारल्या आणि मी तिच्या शेजारींच रहात असून तिनें मला कांहीं सुद्धां दिलें नाहीं. ह्मणून मीं तिचें तें कारटें बाजेवरून पटकन उचलून घेतलें. आणि जातां जातां बाजेखालची रसरसलेली शेगडी खोलीच्या दरवाज्यांत मधोमध अधांतरीं दिली टांगून आणि गेलें तें पोर घेऊन त्या पडक्या बुरजावर. आणि तिथल्या त्या फड्या निवडुंगाच्या एका काट्याला दिलें घुबडा सारखें उरफाटें टांगून.

३ चे०–असं असं ! तर मग एकूण आपण ह्या

[stamp]

कामांत गुंतला होतां काय? बरें पण ताई, तूं ग कोठें इतका वेळ गडप झाली होतीस?

१ चे०—मी होय? ( वेडें विद्रें हसते. )

३ चे०— हो, हो तूंच. अशी हसतेस कां? आणि डोक्यावर हें लिंबाचे टहाळे, गळ्यांत हा सुया टोंचलेली लिंबाची पायघोळ माळ, आणि कानावर हीं पिसें कां दिलीं आहेस ठेऊन? आणि तसेंच हें तुझें तोंड कशानें बरबटलें आहे इतकें.

१ चे०—तुला नव्हतें का मी एकदा सांगितलें?

३ चे०—काय तें?

१ चे०—कीं त्या पाटलाची नुकतीच लग्न झालेली सून एक दिवस भरदोनप्रहरीं नदीवर पाण्याला आली होती.

२ चे०—मग आली ह्मणून? तुझें ग काय तिनें गांठोडें बुडवलें होतें?

१ चे०—अग, तिचें आणि माझें तर हाडवैर

३ चे०—हं! हं! आतां मला आठवलें खरें. ती एकटी सांपडल्याबरोबर तूं तिच्या वर कांयसें चेटुक केलेस ह्मणून तूं सांगितलें होतेंस खरें.

२ चे०—मग तिला तूं आतां कसें तें चैन पडूं देत नसशील?

१ चे०—चैन? ती जेवायला बसली कीं तिच्या पानांत मी विष्टा कालवितें. तिनें दही विरजलेलें असलें तर तें सारें दह्याचें मडकें शेणखळ्यानें भरून टाकतें. खुंटीवर चित्पुटांचें गांठोडें असलें तर त्यांतली तिच्याच लुगड्याची घडी तेवढी नेमकी मी जाळून टाकतें.

आणि नवरा अंगाला हात लावायला आला कीं तिला किंकाळ्याच फोडायला लावतें, कीं तो बापडा जातो माघारा भिऊन.

३ चे०——पण आपलें हें तोंड कशानें लड-बडलें आहे ? कांहीं तरी नैवेद्य मिळाला वाटतें त्या पाटलाकडून.

१ चे०-अग हो. तर मी सोडतें कीं काय ? त्यानें गांवदेवी पुढें एक बकरें कापलें होतें. त्याचें रक्त मीं ढेंकर येईपर्यंत प्यायलें. त्याचे शिंतोडे कुठें माझ्या तोंडावर उडाले असतील.

२ चे०-वाहवा ग वाहवा ! बरीच आहेस कीं ग ! तूं तेवढें रक्त रगडलेंस. आणि आह्मांला कांहीं आणलें नाहींसना ?

१ चे०-अग हो. नाहीं कसें ? हीं घ्या तुह्मांला ( हाडें देते. )

३ चे०-मांस सोलून खाललेलीं हीं नुसतीं हाडें आह्मांला देतेस का ?

२ चे०-हें तुला चांगलें दिसतें का? चल ग आपण जाऊं या. ( पडद्यांत नगरा वाजतो. )

१ चे०-अग, अशा रागवून जातां कोठें ? हीं पहा वाद्यें वाजूं लागलीं भारी, आणि आली मानाजी-रावाची स्वारी. आतां सोडा सारा हट्ट आणि व्हा ज-राशा धट्ट.

२ आणि ३ चे०-खरेंच, तर मग आतां ही रुसण्या-ची वेळ नाहीं.

सर्व— पद

आपण साऱ्या चेटकिणींग ॥ एकीमेकींच्या बहिणींग ॥
हात हातांत घालून ॥ गाणीं मंजुळ गाऊन ॥
नाचू आपण मौजेनें ॥ नाचूं आपण मौजेनें ॥
एक दोन तीन, तीन त्रिक नऊ, कापूस मऊ, कुणी
केला ? आह्मी केला ॥

( मानाजीराव आणि व्यंकोजीराव प्रवेश करतात. )

**मानाजीराव**–इतका चांगला आणि वाईट दिवस मी कधींही पाहिला नव्हता.

**व्यंकोजीराव**–अजून आपली छावणी किती लांब आहे बरें ? — अरे! ह्या कोण असाव्यात? ह्या किती तरी खप्पड दिसत आहेत व यांचा पोशाख देखील मोठा विलक्षण दिसतो आहे ! पृथ्वीवर राहणाऱ्या प्राण्यांपैकीं ह्या कोणी नसाव्यात. तरी पण आश्चर्य हें कीं ह्या हल्लीं पृथ्वीवर आहेत.–तुह्मी कोणी सजीव प्राणी आहां काय ? मनुष्यानें विचारलेले प्रश्न समजण्याची तुह्मांला शक्ति आहे काय ? तुमच्यापैकीं प्रत्येकजण आपलें बोट ओठावर ठेविते यावरून माझें ह्मणणें तुह्मांला समजतें आहे असें दिसतें. तुह्मी बायका असाव्यात असें वाटतें. तरी पण तुमचा पोषाख कांहीं चत्मकारिकच दिसतो त्यामुळें तसेंही ह्मणतां येत नाहीं.

**मानाजी०**–जर तुह्मांला वाचाशक्ति असेल तर तुह्मी कोण आहां तें सांगा.

**पहिली चेटकी**–माणिकपुरचे जहागिरदार मानाजीराव यांचा जयजयकार असो.

**दुसरी चेटकी**–कठोरपुरचे ठाकूर मानाजीराव ह्यांचा जयजयकार असो.

**तिसरी चेटकी**–या देशाचा भावी राजा, मानाजीराव याचा जयजयकार असो.

**व्यंकोजी**०–मानाजीराव, हें भविष्य शुभसूचक असून तुह्मी असे दचकतां कां? आणि असे भ्यायल्यासारखे कां दिसतां?–तुह्माला शपथ आहे, खरें सांगा. तुमची ही सगळी माया आहे किंवा तुह्मी जशा दिसतां तशाच खरोखर तुह्मी आहांत? आतांच्या आतां मिळणारा सन्मान आणि पुढें मिळणारें राज्यपद ह्यां विषयीं भविष्य कथन करून तुह्मी माझ्या स्नेह्याचें अभिनंदन केलें.—आणि त्या राज्यपदाच्या आशेंत हा अगदीं गर्क होऊन गेलेला दिसत आहे.—पण तुह्मी माझ्या विषयीं कांहींच भविष्य सांगत नाहीं तें कां? जर तुह्मांला कालाच्या अनंत अवकाशांतील बीजांचें अवलोकन करण्याचें सामर्थ्य खरोखर असेल तर त्यांपैकीं कोणत्या बीजाला अंकुर फुटेल आणि कोणत्याला फुटणार नाहीं हें सांगा. तुह्मी शुभ सांगितलें तरी त्याच्या पासून मला आनंद होणार नाहीं किंवा अशुभ सांगितलें तरी त्याचें मला दुःख वाटणार नाहीं. तेव्हां काय असेल तें स्पष्ट सांगा.

**पहिली चेटकी**–तुझा जयजयकार असो.

**दुसरी चेटकी**–तुझा जयजयकार असो.

**तिसरी चेटकी**–तुझा जयजयकार असो.

**पहिली चेटकी**–तुझी योग्यता मानाजीरावापेक्षां कमी असेल, पण जास्तीही होईल.

**दुसरी चेटकी**–तुला मानाजीरावा इतकें सुख मिळणार नाहीं, पण त्यापेक्षां तूं अधिक सुखी होशील.

**तिसरी चेटकी**–तूं स्वतः राजा होणार नाहींस. पण तूं राजे निर्माण करशील. तेव्हां मानाजीराव आणि व्यंकोजीराव यांचा जयजयकार असो.

**पहिली चेटकी**–व्यंकोजीराव आणि मानाजीराव यांचा जयजयकार असो.

**मानाजी**०–थांबा, तुह्मीअर्धवट बोलतां हें पुरें नाहीं. मला आणखी सांगा. माझ्या बापाच्या मरणानंतर मी माणिकपुरचा जहागिरदार झालों हें मला ठाऊक आहे, पण मी कठोरपुरचा ठाकूर कसा झालों? कारण कठोरपुरचा ठाकूर तर जिवंत आहे व त्याचा चांगला उत्कर्ष होत चालला आहे. आणि जसें कठोरपुरचा ठाकूर होणें हें असंभवनीय आहे त्याप्रमाणेंच राजा होणें हें देखील अगदीं असंभवनीय दिसतें. तेव्हां तुह्मी हें अद्भुत भविष्य कशावरून सांगितलें हें मला कळूं द्या. तसेंच ह्या माळावर आमची वाट अडवून असलें भविष्य सांगून आमचें अभिनंदन करण्याचें तुह्माला काय प्रयोजन होतें? सांगा, तुह्माला शपथ आहे.

( सर्व चेटक्या अदृश्य होतात )

**व्यंकोजी**०–जसे पाण्यावर बुडबुडे दिसतात तसेच पृथ्वीवरही दिसतात त्यांतलेच हे ह्मणावयाचे. ह्या कुठें बरें अदृश्य झाल्या असाव्यात ?

**मानाजी**०–या हवेंत आणि दुसरीकडे कोठें ? आणि त्याचीं शरीरें ह्मणून जीं दिसत होतीं तीं आपल्या श्वासोच्छ्वासाप्रमाणें वातावरणांत वितळून नाहींशीं

झालीं. जर त्या थांबल्या असत्या तर बरें झालें असतें.

**व्यंकोजी०**—आपण ज्यांच्याबद्दल बोलतां आह्मी त्या येथें खरोखर होत्या का? किंवा आपल्या बुद्धीला भ्रम तर झाला नाहीं ना?

**मानाजी०**—तुमचीं मुलें राज्यपदावर बसणार.

**व्यंकोजी०**—आणि तुह्मी तर स्वतःच बसणार?

**मानाजी०**—आणि कठोरपुरचे ठाकूर पण होणार असें नाहीं का त्या ह्मणाल्या?

**व्यंकोजी०**—होय. असेच त्यांचे शब्द होते. हे कोण येत आहेत?

(राणोजी आणि अंग्रे प्रवेश करितात.)

**राणोजी**—मानाजीराव, तुमच्या विजयाची बातमी ऐकून आपल्या महाराजांना फार आनंद झाला. आणि त्या बंडखोराशीं लढत असतांना तुह्मी जो आपल्या अंगचा पराक्रम प्रकट केला तो त्यांनीं ऐकला तेव्हां तर त्यांना असें झालें कीं ह्या गोष्टीबद्दल त्यांना आश्चर्य मानावें किंवा तुमची स्तुति करावी हें त्यांना कांहींच सुचेना. त्या कारणानें त्यांची चित्तवृत्ति अगदीं स्तब्ध होऊन गेली. तसेंच आजच्या लढाईतील आपल्या दुसऱ्या कृत्यांचा ते विचार करीत असतां त्यांना असें कळून आलें कीं विलासपुरच्या राजाच्या टोळींत शिरून तुम्ही स्वतः हजारों लोकांचीं डोकीं निर्भयपणें उडवीत होतां. एका पाठीमागून एक जशा पावसाळ्यांत गारा पडतात त्याप्रमाणें जासुदावर जासूद येत होते आणि त्यांपैकीं प्रत्येक जण आपल्या राज्याच्या संरक्षणासाठीं आपण जो पराक्रम

करीत होतां त्याचे पोवाडे आपल्या महाराजांसमोर गात होता.

**अंग्रे**–महाराजांनीं आपले आभार मानण्यासाठीं आह्माला पाठविलें आहे व आह्मी आपल्याला महाराजांकडे नेण्याला मात्र आलों आहों. आपल्याला बक्षीस काय देणें तें महाराज देतील.

**राणोजी**–आणि पुढें तुम्हांला जो मोठा मान मिळणार आहे त्याचा सचकार म्हणून आपल्याला कठोरपुरचा ठाकूर असा किताब त्यांनीं दिला आहे. तेव्हां अहो कठोरपुरचे ठाकूर साहेब, तुमचा जयजयकार असो.

**त्र्यंकोजी०**–काय! त्या भुतांनीं खरें सांगितलें काय?

**मानाजी०**–कठोरपुरचा ठाकूर तर जिवंत आहे. मग लोकांच्या वस्त्रांनीं माझें शरीर तुह्मी काय म्हणून भूषित करतां ?

**अंग्रे**–जो कठोरपुरचा ठाकूर होता, तो अद्यापि जिवंत आहे हें खरें. पण त्याला योग्य अशी देहांत शिक्षा देण्यांचें ठरलें आहे. विलासपुरच्या राजाशीं त्यानें सख्य ठेविलें किंवा त्या बंडखोराला त्यानें गुप्त मदत केली किंवा ह्या दोन्ही उपायांनीं तो आपल्या देशाचा नाश करण्यासाठीं खटपट करीत होता हें कांहीं मला माहीत नाहीं. परंतु राजद्रोहाचा गुन्हा त्याजवर शाबीत झाला व त्यानेंही तो कबूल केला, आणि अशा रीतीनें त्याचा उच्छेद झाला आहे.

**मानाजी०**–मी माणिकपुरचा जहागिरदार आणि कठोरपुरचा ठाकूर तर झालोंच. पण मुख्य तें अजून

मागेंच राहिलें आहे.—तुम्ही माझ्यासाठीं जे श्रम घे-तले त्यावद्दल मी तुमचा आभारी आहें.—ज्यांनीं मला तूं कठोरपुरचा ठाकूर होशील ह्मणून सांगितलें हो-तें त्यांनींच तुमचे मुलगे राजे होतील म्हणून सांगितलें होतें. तर आतां तेंही भविष्य खरें होईल असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?

व्यंकोजी०—हें जर खरें मानूं लागलों तर कठोर-पुरचा ठाकूर हा किताव मिळाल्यावर राज्यपदाची आशा तुमच्याही मनांत जागृत झाली पाहिजे. पण हें कांहीं विलक्षण दिसतें. आणि आपली पापाकडे प्रवृत्ति करण्यासाठीं हे पिशाचयोनींतील प्राणी पुष्कळ वेळां आपल्याला खरें भविष्यही सांगत असतात. क्षुल्लक गोष्टींत खरेपणा दाखवून आपलें मन वळवून घेऊन अखेरीस भयंकर प्रसंगीं हे आपल्याला तोंडघशीं पाड-तात.—मित्रांनों, जरा इकडे या. मला तुमच्यापाशीं कांहीं बोलावयाचें आहे.

मानाजी०—दोन भविष्यें तर खरीं ठरलीं. आणि पुढें जें राज्यप्राप्तीचें मोठें भव्य नाटक व्हावयाचें आहे त्याची ही मंगलसूचक नांदीच ह्मणावयाची.—मित्रहो, मी तुमचा फार आभारी आहें.— हें जें चेटक्यांनीं केलेलें भाकित त्याचा हेतु वाईट आहे असें ह्मणतां येत नाहीं आणि चांगला आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. जर वाईट आहे असें ह्मणावें तर पुढें जें काम फत्ते होणार त्याचा हा सचकार मला आधी कां मिळावा ? प्रारंभ तर प्रामाणिकपणाचा झाला आहे. कारण मी कठोरपुरचा ठाकूर झालों. बरें त्याचा हेतु चांगला

असावा असें ह्मणावें तर असले विचार पूर्वी कधींही माझ्या मनांत आले नव्हते.—किती तरी भयंकर विचार हे ! ह्यांच्या योगानें माझ्या अंगावर शहारे उभे राहताहेत, आणि माझें नेहमीं स्थिर असलेलें हृदय ह्या बरगड्या फोडून बाहेर येत आहे कीं काय असें वाटतें ! असले भयंकर विचार माझ्या मनांत अधिकाधिक कां बरें येतात? प्रत्यक्ष भीतीपेक्षां भयंकर कल्पनाच अधिक भयप्रद असतात. माझ्या मनांत खून करण्याची कल्पना अजून मुळींच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. तरी पण त्या विचारांनीं माझें अंतःकरण असें कांहीं खवळून सोडलें आहे कीं त्या विचारांत गुंग झाल्यामुळें पुढें काय करावें हें मला कांहींच सुचत नाहीं. आणि हल्लीं माझ्या मनांत भावी कल्पनांवांचून दुसरें कांहीं येतच नाहीं.

व्यंकोजी०-पहा, आपले स्नेही विचारांत कसे गर्क झाले आहेत ते !

मानाजी०-मी राजा होणार असें जर दैवानें ठरविलेलें असेल तर मग मी खटपट केली नाहीं तरी देखील तेंच दैव मला राज्यपदावर बसवील.

व्यंकोजी०-नवीन केलेले कपडे प्रथम आपल्या अंगाला चांगले बसत नाहींत. पण तेच जुने झाले ह्मणजे सवईनें चांगले बसतात. त्याप्रमाणेंच नवीन मिळालेल्या सन्मानामुळें ह्यांना कसेंसेंच वाटत आहे. पण कांहीं दिवसांनीं सर्व ठीक जमेल.

मानाजी०-कांहीं ही होवो. आणि कितीही अडचणी येवोत. जें व्हायचें तें होणारच.

**व्यंकोजी**०–ठाकूरसाहेब, आह्मी आपल्यासाठीं थांबलों आहों.

**मानाजी**०–मेहरबानीनें एवढा गुन्हा माफ करा. कांहीं गोष्टीची मला विस्मृति झाली होती त्याची मी आठवण करीत होतों. मित्रहो, तुह्मी माझ्यासाठीं घेतलेले श्रम मी आपल्या हृदयावर लिहून ठेविले आहेत. व तेथें मी त्यांचें नित्य अवलोकन करीत जाईन. चला आपण आतां महाराजांकडे जाऊं या.—आज ज्या गोष्टी घडून आल्या त्यांचा तुह्मी चांगला विचार करा. आणि तसा विचार केलात ह्मणजे फिरून केव्हां तरी आपण अगदीं मन मोकळें करून ह्याविषयीं बोलूं.

**व्यंकोजी**०–मोठ्या खुषीनें.

**मानाजी**०–तर मग तेथपर्यंत हा विषय बंद असूं द्या.– चला मित्रांनों, या. (सर्व जातात.)

---

## प्रवेश ४ था.

स्थळ–राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

[ दमाजी, मल्हारराव, धनाजी, लक्ष्मणसिंग आणि हुजरे प्र. क.]

**दमाजी**–कठोरपुरच्या ठाकुराला देहांतशिक्षा दिली नाहीं ? ज्यांना हें काम सांगितलें होतें ते अजून परत आले नाहींत काय ?

**मल्हारराव**–महाराज, ते अजून माघारे आले नाहींत. पण ज्यानें त्याला मरतांना पाहिलें अशा एका गृहस्थाशीं माझें बोलणें झालें. त्यानें असें सांगितलें कीं त्या ठाकुरानें आपल्या राजद्रोहाचें पातक उघड उघडपणें

कबूल केलें, आपली, त्यानें क्षमा मागितली, आणि आपल्या मनाला झालेला पश्चात्ताप त्यानें प्रकट करून दाखविला. प्राण सोडण्या इतकें चांगलें कृत्य त्याच्या कुडींत प्राण होता तेथपर्यंत त्याच्या हातून कोणतेंच झालें नव्हतें. त्यानें इतक्या शांतपणानें प्राण सोडला कीं अतिशय प्रियकर वस्तु असूनही ती कवडीमोल आहे असें समजून तिचा त्याग करण्याची जणूं काय त्याला सवयच झालेली होती.

**दमाजी**—अशी एखादी कला कोठेंही उपलब्ध नाहीं कीं जिच्या योगानें चेहऱ्यावरून मनांत काय काय विचार चालले आहेत हें ओळखतां येईल. तो चांगला सभ्य माणूस दिसत असे आणि त्याच्यावर माझा पूर्ण विश्वास बसला होता.

[ मानाजीराव, व्यंकोजीराव, राणोजी आणि अंग्रे येतात. ]

या, आमचे शूर सेनापतिसाहेब, या. तुमच्या उपकाराबद्दल मी उतराई झालों नाहीं ह्या माझ्या कृतघ्नपणाचें पाप माझ्या मनांत आतांपर्यंतही डांचत होतें. तुमचे उपकार इतके कांहीं थोर आहेत कीं त्यांच्या मोबदला कांहीं केलें तरी त्यांची फेड होणारच नाहीं. एखादवेळ मला असें देखील वाटतें कीं तुमचीं सत्कृत्यें झालीं त्याच्या पेक्षां कमी असतीं तर फार बरें झालें असतें, कारण मग तुमचे आभार मानणें आणि तुह्मांला बक्षीस देणें ह्या गोष्टी मला सहज करतां आल्या असत्या. सध्या आह्मा सगळ्याजणांना जें देतां येईल त्याच्यापेक्षां शतपटीनें आपल्याला आह्मी दिलें पाहिजे होतें हे शब्द मात्र माझ्यापाशीं आपल्याला द्यायला आहेत.

**मानाजी०**—सेवा आणि राजनिष्ठा हा माझा धर्मच आहे आणि तो मी पाळला ह्मणजे यांतच माझें बक्षिस मला मिळालें. आपली गादी, आपलें राज्य, आपलीं मुलें, आणि आपले अधिकारी यांची चाकरी करणें हा आमचा धर्म आहे आणि ती चाकरी आमच्या हातून करून घेणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे. आपली प्रीति आणि मान हीं राखण्याकरितां आह्मी जें जें कांहीं करतों तें सर्व आह्मी करावयाला पाहिजेच असतें.

**दमाजी**—फार उत्तम आहे. आपल्या उपकाराचें बीज मी आपल्या हृदयांत पेरलें आहे. आणि त्याचा अंकुर चांगला वाढून उत्कर्षास यावा अशी मी नेहमीं खटपट करीन.—त्र्यंकोजीराव, तुह्मी ही मानाजीरावासारखीच फार मोठी कामगिरी बजाविली आहे. आणि त्यांच्या प्रमाणेंच तुह्मीही स्तुतीला पात्र आहां.

**त्र्यंकोजी०**—माझ्यावर आपली अशी प्रीति असली ह्मणजे मग माझ्या हातून असलीं कामें होण्याला काय हरकत आहे ?

**दमाजी**—मला हल्लीं इतका कांहीं पराकाष्ठेचा हर्ष होत आहे कीं त्यामुळें माझे नेत्र अश्रूंनीं भरून आले आहेत.—माझे मुलगे, माझे बंधु, माझ्या पदरचे सरदार, आणि जे जे कोणी माझ्या प्रीतींतले लोक आहेत त्यांना माझी अशी विनंति आहे कीं माझ्या पश्चात् माझें राज्य माझा वडीलपुत्र मल्हारराव ह्याला देण्याचा माझा इरादा आहे. ह्मणून त्याला आजपासून युवराज ही पदवी मी दिली आहे. पण ही

पदवी देऊन त्याला एकट्यालाच संतोषित करावें असें माझ्या मनांत मुळींच नाहीं. तर सरदारीच्या वगैरे दुसऱ्या पदव्या जे जे कोणी सन्मानाला पात्र असतील त्यांनाही द्यावयाच्या माझ्या मनांतून आहेत. तेव्हां आतां आपण येथून तुमच्या इंद्रपुराला जाऊं या आणि मग तेथेंच हा पदव्या देण्याचा समारंभ करूं.

**मानाजी०**–महाराज, ह्याच्या पुढील व्यवस्था करावयाची हें श्रमाचें काम आहे व तें करणें आपल्याला योग्य नाहीं. ह्मणून मी ती सर्व व्यवस्था करण्याकरितां पुढें जातों. सरकारस्वारी आमच्या घरीं येणार हें ऐकून माझ्या पत्नीला किती तरी आनंद होईल! मी आपली रजा घेतों.

**दमाजी**–ठीक आहे. (मानाजीरावाशिवाय सर्व जातात.)

**मानाजी**–काय! त्यानें आपल्या मुलाला युवराज केलें? ही एक माझ्या वाटेंत धोंडच येऊन पडली. हिच्यावरून उडी मारून गेलें पाहिजे. नाहीं तर घडघडत खालीं पडावें लागणार.—हे ताऱ्यांनों, तुह्मी आपलें तेज कांहीं वेळ झांकून ठेवा. माझ्या मनांत अगदीं खोल खोल असलेली अतिशय अधमपणाची इच्छा प्रकाशाच्या देखील दृष्टीस पडतां कामा नये. आणि तें काम या हातानें घडून येत असतां या डोळ्यानें त्याच्याकडे किलकिल्या दृष्टीनें देखील पहातां उपयोगी नाहीं. पण जें कृत्य घडून आलें ह्मणजे त्याच्याकडे पाहण्याची डोळ्याला देखील भीति वाटेल तें कसेंही करून झालेंच पाहिजे. ( जातो. )

———

## प्रवेश ९ वा.

स्थळ—इंद्रपुर. मानाजीरावाच्या किल्यांतलि एक दिवाणखाना.

( मानाजीरावाची स्त्री दर्याबाई पत्र वाचीत प्रवेश करते. )

दर्याबाई—"ज्या दिवशीं मला जय मिळाला त्याच दिवशीं त्या मला भेटल्या आणि मी पुरी चौकशी केल्यावरून मला असें कळून आलें आहे कीं त्यांना मनुष्यापेक्षां कांहीं तरी अधिक ज्ञान आहे. आणखी कांहीं प्रश्न विचारण्याचें माझ्या मनांतून फार होतें. पण त्या एकाएकीं हवेंत नाहींशा झाल्या. पुढें त्या आश्चर्यकारक स्थितीचा विचार करण्यांत मी कांहीं वेळ गर्क झालों होतों इतक्यांत राजाकडून कांहीं गृहस्थ आले आणि 'कठोरपुरच्या ठाकुर साहेबांचा जयजयकार असो!' असें त्यांनीं मला म्हटलें. आणि हाच किताब मला प्राप्त होईल असें थोड्या वेळा पूर्वी त्या चेटक्यांनीं मला आश्वसन दिलें होतें. आणि कांहीं काळानें तूं राजा होशील असें ही त्यांनीं भविष्य सांगितलें आहे. माझ्या भाग्याची तूं वांटेकरणि असल्यामुळें ही गोष्ट तुला कळविणें अवश्य आहे असें मला वाटलें. मी असें केलें नसतें तर तुझ्या कपाळीं केवढें सुख लिहिलेलें आहे हें न कळल्यामुळें तुला आनंदसुखाचा अनुभव घेतां आला नसता. ह्मणून मी तुला कळविलें आहे. ह्याचा नीट विचार कर. कळावें." माणिकपुरचे जहागिरदार आणि कठोरपुरचे ठाकूर तर हे झालेच. आणि बहुतकरून दुसरें जें भाकित आहे त्याप्रमाणें

तिकडे राज्यपदही मिळेल. तरी पण मला तिकडच्या स्वभावाचा भरंवसा येत नाहीं. त्यांच्या अंतःकरणाला दयेचा पाझर तेव्हांच फुटतो. त्यामुळें असलें काम साधण्याला जी अतिशय जवळची वाट असते तिनें जाण्याचें धैर्य यांना व्हायचें नाहीं. ह्यांना मोठें व्हायला पाहिजे. महत्त्वाकांक्षा नाहीं असें नाहीं. पण त्यांतला वाईटपणा तेवढा नको. ह्यांना मोठेपणा तर मिळवायला पाहिजे, पण पापाला तेवढें भ्यायचें. ह्यांना लबाडी लचाडी तर करायला नको, आणि लोकाचें राज्य तेवढें मात्र बळकावयाला पाहिजे. ह्यांना जें राज्यपद हवें आहे तें स्पष्ट असें सांगतें आहे कीं 'मी जर तुह्मांला पाहिजे असेन तर तुह्मी असें केलें पाहिजे,' आणि तें तसें घडून येऊं नये अशी कांहीं तिकडची इच्छा नसेल. पण तें करण्याचें धारिष्ट यांच्या अंगीं मुळींच नाहीं. बरें त्यांना घरीं येऊं द्या, ह्मणजे मग दैवाच्या आणि त्या पिशाचांच्या मनांतून जो सुवर्णमय मुकुट त्यांच्या मस्तकावर विराजमान व्हावा असें आहे त्याला आड येणारे जे कांहीं भागूबाई-पणाचे विचार तिकडे मनांत असतील ते सगळे मी आपल्या उपदेशानें घालवून टाकीन तरच नांवाची दर्याबाई होईन. ( एक चाकर प्रवेश करितो. ) कायरे बातमी आहे?

चाकर—राजेसाहेबांची स्वारी आज येथें येणार आहे.

दर्या०—तुला वेडाबिड तर लागलें नाहीं? अरे तुझे धनी राजेसाहेबांबरोबर नाहींत का ? आणि तूं ह्मणतोस तसें असतें तर त्यांनीं पुढील व्यवस्थेसाठीं आपल्याला कळविलें नसतें का ?

चाकर—बाईसाहेब, मी ह्मणतों तें अगदीं खरें आहे. आपले धनीसाहेबही पुढें येतच आहेत. पण माझ्या सोबत्यांपैकीं एकजण धनीसाहेबांच्या पुढें धांवत धांवत आला, त्यानें मला ही वातमी सांगितली. कारण तो धांवून धांवून इतका दमून गेला होता कीं हा निरोप माझ्यापाशीं सांगण्याची देखील त्याला मोठी मारामार पडली.

दर्या॰—बरें तर त्यानें ही मोठी चांगली बातमी आणिली आहे. ह्यासाठीं जा आणि त्याची नीट व्यवस्था ठेव. ( चाकर जातो. ) आज दमाजी महाराज आमच्या किल्ल्यांत येणार. अशा वेळीं हें घुबड ओरडत आहे—अगदीं कर्कश ओरडत आहे. खास! हा कांहीं त्यांना शुभ शकुन नाहीं.—अहो तुह्मी दुष्ट विचारांवर अम्मल चालविणाऱ्या देवतांनों, मी स्त्री आहें, पण मला या प्रसंगीं तुह्मी पुरुषाचें धैर्य द्या; आणि माझ्या पायाच्या नखापासून तों डोकीच्या केसापर्यंत सर्व अंगांत भयंकर क्रूरपणाचा ओतप्रोत संचार होऊं द्या. आणि माझ्या मनांतील पश्चात्तापाचे सर्व दरवाजे बंद होण्यासाठीं शरीरांतील माझें सगळें रक्त गोठवून टाका. आणि हें बरें आहे कीं वाईट आहे, करूं कीं नको करूं, असल्या विचारांनीं माझ्या मनांतील हेतु तिळमात्रही हळमळूं देऊं नका; अरे तुह्मी खुनाला उत्तेजन देणाऱ्या पिशाचांनों, तुह्मी उपद्रव देण्याच्या कामांत कोठेंही गुंतलां असलां तरी तेथून अदृश्य रूपानें झटकन या आणि माझ्या हृदयांत जी कांहीं दया माया असेल ती चट् सारी जाळून खाक करा. हे निबिड-

तमोमय रात्रि, ये तूं ही ये, आणि अंधकूप नरकांतील घनदाट काळोख बरोबर आणून आपला अंधकार काळोकाभिन्न कर; आणि माझा खंजीर त्याच्या शरीरांत जी जखम करील ती त्या खंजिराला देखील दिसूं देऊं नको. तसेंच हे आकाशांतील तारे माझें हें कृत्य पाहून मध्येंच 'नको नको' ह्मणून ओरडतील, ह्मणून तुझ्या ढगांच्या आवरणांतून त्यांना डोकावूं देखील दऊं नको. (मानाजीराव येतो. ) यायचें कठोरपुरचे ठाकूर साहेब! आणि त्या भविष्यवादाप्रमाणें लवकरच ह्याही पेक्षां मोठ्या पदवीला चढायचेंना? आपलें पत्र वाचून मला इतका कांहीं आनंद झाला आहे कीं त्यामुळें मी आपली सध्याची स्थिति अगदीं विसरून गेलें आहें, आणि पुढें प्राप्त होणारें तें वैभव आतांच मिळालें आहे असें मला वाटूं लागलें आहे.

**मानाजी**०—दमाजी महाराज आज रात्रीं येथें येणार आहेत.

**दर्या**०—आणि येथून जाणार केव्हां?

**मानाजी**०—उद्यां जायचा त्यांचा बेत आहे.

**दर्या**०—उद्यां! तो उद्यांचा दिवस कधींही उगवायचा नाहीं!— पण, हें पहा आपला चेहराच असा आहे कीं त्यावरून आपल्या मनांतले विचार दुसऱ्याला केव्हांच ओळखूं येतात. ह्मणून ह्मणतें वेळ मारून नेण्यासाठीं वेळ पडेल तशी मुद्रा धारण करायची. तुमच्या डोळ्यांत, हाताच्या कृतींत, आणि गोड गोड भाषणांत आदरातिथ्य पूर्ण भरलेलें आहे असें दाखवायचें. बाह्यात्कारी फुलाप्रमाणें रमणीय दिसावें, पण अंतर्यामीं त्या फुला-

खालीं दडून बसलेल्या सापाप्रमाणें असावें. आज रात्रीं आपल्याकडे जो पाहुणा यायचा आहे त्याची नीट तजवीज लाविली पाहिजे. तेव्हां ही आजच्या रात्रीची महत्त्वाची कामगिरी आपण माझ्याकडे सोपवावी. आजच्या रात्रीची कामगिरी फत्ते झाली ह्मणजे पुढें येणाऱ्या सर्व रात्री आणि दिवस ह्यांमध्यें आपल्याला राज्यसुखाचा अनुभव घ्यायला सांपडेल.

**मानाजी**०—ह्याविषयीं मग आपण बोलूं.

**दर्या**०—कांहीं हरकत नाहीं, पण चेहऱ्यांत मात्र चलविचल होऊं देऊं नका. चेहऱ्यांत फरक पडला कीं मनांत भीति उत्पन्न झाली आहे असें लोक सहज ताडतात. ह्मणून एवढ्याबद्दल सावधगिरी ठेवा आणि मग बाकीचें काम माझ्याकडे खुशाल सोंपवा. (सर्व जातात.)

---

## प्रवेश ६ वा.

स्थळ.—इंद्रपुरच्या किल्ल्यासमोरील मैदान.

[दमाजी, मल्हारराव, धनाजी, व्यंकोजीराव, लक्षमणसिंग, मकुंदराव, राणोजी, अंग्रे आणि त्यांचे हुजरे प्रवेश करतात.]

**दमाजी**०—हा किल्याचें ठिकाण मोठें रमणीय आहे. आणि येथील हा मंजुळ आणि मधुर वारा शरीराला किती तरी आनंद देत आहे!

**व्यंकोजी**०—या वसंत ऋतूंत चोहोंकडेच गार वारा असतो. पण हें ठिकाण उंचावर असल्यामुळें येथें वाऱ्याची विशेष मजा आहे खरी.

( दर्याबाई प्रवेश करते. )

दमाजी–या पहा दर्याबाईसाहेब आल्या. या ! या ! आज आह्मी तुमच्याकडे पाहुणे आलों आहोंत. आमच्या येण्यानें तुह्मांला थोडी तसदी पडले हें खरें. पण आम्हांला ठाऊक आहे कीं तुह्मांला ती तसदीशी वाटणार नाहीं.

दर्या०–आह्मांला महाराजांनीं जे मोठमोठे किताब दिले त्यांच्याशीं तुळना करून पाहिलें असतां आम्ही जी करीत आहों त्याच्या चौपटीनें आपली सेवा केली तरी ती त्यांच्या पासंगाला देखील पुरणार नाहीं. आपण पूर्वीं आणि आतां आह्मांला ज्या पदव्या दिल्या त्या सर्वांबद्दल आह्मी परमेश्वराजवळ नेहमीं आपलें कल्याण चिंतूं.

दमाजी–ठाकुरसाहेब कुठे आहेत? आह्मी अगदीं त्यांच्या पाठोपाठ निघालों व त्यांच्या आधीं येण्याचा आमचा बेत होता. पण ते पडले घोड्यावर बसणारे मोठे बांके आणि पुनः घरीं येण्याचा ओढा. त्यामुळें ते आमच्या आधीं येऊन पोहोंचले असतील. दर्याबाई, आज रात्रींचा आमचा मुक्काम येथेंच आहे.

दर्या०–आम्ही आपले चाकर आहों व आमचें म्हणून जें जें कांहीं आहे तें सर्व आपलेंच आहे.

दमाजी–बरें आहे. चला आतां आपले यजमान ठाकुरसाहेब यांची गांठ घेऊं या; त्यांच्यावर आमची मर्जी फार बहाल आहे. आणि आमची मेहरबानी त्यांजवर अशीच नेहमीं कायम राहील. चला, दर्याबाई, चला.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

स्थळ—इंद्रपुरच्या किल्ल्यांतील एक दिवाणखाना.

[ कित्येक चाकर लोक जेवणाचें सामान व ताटें वगैरे घेऊन इकडून तिकडे जातात व नंतर मानाजीराव प्रवेश करितो. ]

**मानाजी.**—हें काम केलें ह्मणजे सगळें आटपलें असें जर असेल तर तें झटकन उरकून टाकावें हें बरें. जर हा खून केल्याचा कांहीं बोभाटा झाला नाहीं आणि ह्या राजाला मारल्याच्या योगानें आपला डाव साधला, जर ह्या शस्त्रप्रहाराचा मागमूस न लागतां माझ्या मनासारख्या सगळ्या गोष्टी जुळून आल्या, तर ह्या मृत्युलोकांत असूनही मला स्वर्ग लोकांतील सुख मिळेल यांत संशय नाहीं. पण असल्या कामांत नेहमीं पापाचें प्रायश्चित्त येथल्या येथेंच मिळाल्यावांचून राहत नाहीं. आपण खुनाचें काम करावें पण केल्या बरोबर लागलाच तो करणाऱ्याच्या बोकांडीस बसतो. आपण दुसऱ्यासाठीं ह्मणून विषाचा पेला तयार करतों. पण खोट्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव घालणारी ती न्यायदेवता तो पेला आपल्याच घशांत ओतते.—महाराज तर अगदीं बेफिकीरपणानें येथें आले आहेत. कारण कीं मी पहलें त्यांचा जवळचा नातलग आणि विश्वासू सेवक. आणि ह्या दोन्ही नात्यांनीं पाहिलें तरी अशी गोष्ट करणें अगदीं गैर आहे. दुसरें कारण असें कीं माझ्या घरीं तो आज पाहुणा म्हणून आला आहे. त्याचा गळा कापायला जर कोणी येऊं लागेल तर त्याला प्रतिबंध करणें हें माझें काम. तें

सोडून मीच जर हातांत सुरा घेऊन त्याचे प्राण घेऊं लागलों तर तें कसें बरें ठीक दिसेल! शिवाय हा दमाजी लोकांपाशीं फार नम्रपणानें वागलेला आहे. आणि ह्याचा राज्यकारभार अगदीं चोख आहे. तेव्हां याचा खून करण्याचें जर कोणी अघोर पातक करील तर त्याच्याविषयीं दमाजीचे सद्गुण लोकांचीं मनें अगदीं खवळून टाकतील; आणि मग नुकत्याच जन्मलेल्या आणि वस्त्रहीन अशा तान्ह्या मुलाप्रमाणें सर्वांना त्याची दया आल्यावांचून राहणार नाहीं. मग तें दयेचें वारें हूं हूं ह्मणतां प्रत्येकाच्या डोळ्यापुढें हें भयंकर कर्म अशा रीतीनें आणून ठेवील कीं त्या डोळ्यांतून शतावधि अश्रुधारा गळल्यावांचून राहणार नाहींत. मला जबरदस्त महत्त्वाकांक्षा मात्र आहे. त्यामुळें अशा गोष्टी करण्याची इच्छा होते. पण ती शेवटास नेण्याचें सामर्थ्य माझ्या अंगांत मुळींच नाहीं.—( दर्याबाई येते.) कां? कसें काय चाललें आहे?

दर्या०—त्यांचें जेवण बहुतेक आटपलें. पण तुह्मी तेथून इकडे कां आलां?

मानाजी०—त्यांनीं माझी चौकशी केली कीं काय?

दर्या०—हो, हो, केली तर! त्यांनीं केली आपली चौकशी. आपल्याला माहीत नाहीं वाटतें?

मानाजी०—हा बेत आतां इतकाच राहूं दे. कारण महाराजांनीं मला अलीकडे बराच मान दिलेला आहे. आणि चोहोंकडे सर्व लोक मला नांवाजताहेत. तेव्हां त्या नांवालौकिकासारखी मला कृति

केली पाहिजे. असल्या नीच कृत्यांनीं त्याला कालिमा लावणें बरोबर नाहीं.

दर्या०—इतके दिवस ज्या आशेनें तुमच्या मनावर पगडा बसविला होता ती काय तर मग सारी वेळगडपणाचीच होती? ती इच्छा तुमच्या मनांत आल्याला आज इतके दिवस झाले तोंपर्यंत आपण काय निजलां होतां? आणि आतां कशानें जागे झालां? इतके दिवस मनांत हे विचार एकसारखे घोळत होते आणि आतांच इतके गर्भगाळित कशानें झालां? माझ्या वरची तुमची प्रीति देखील तर मग अशीच लटपटीत आहे असें आजपासून उघड झालें. ज्याप्रमाणें तुमच्या मनांत इच्छा असेल त्याप्रमाणें ती हातानें घडवून आणण्याची तुम्हाला भीति वाटते? सगळ्या जन्माचें भूषण ज्याला तुम्हीं मानतां तें राज्यपद मात्र तुम्हांला पाहिजे. पण मी वीरश्रीचें काम करीन असें तुम्हाला वाटत नाहीं हें कसें? इच्छा असायची आणि हातून कृति मात्र घडायची नाहीं हें अगदीं वाईट.

मानाजी०—ऐक. मानवी प्राण्याला शोभेल असें कोणतेंही कृत्य करण्याचें धारिष्ट मला आहे. पण त्याच्यापेक्षां पलीकडचें कर्म जो करतो तो माणुसच नव्हे.

दर्या०—तर मग ज्यानें हें अघोर कृत्य करण्याची गोष्ट मझ्यापाशीं काढली तो कोण पशु होता वाटतें! जेव्हां ती गोष्ट करण्याचें धारिष्ट तुमच्या मनांत होतें तेव्हां तुम्ही माणुस होतां खरे. आपली आहे त्यापेक्षां ज्यास्त योग्यता वाढविण्याकरितां पुरुषाला योग्य असें कांहीं अघ-

टित कृत्य करण्याला तुह्मी तयार झालां होतां. तेव्हां हें कृत्य केव्हां करावें आणि कोठें करावें ह्याचा तुह्मांला कांहीं अंदाज नव्हता. तरी पण वेळ आणि स्थळ हीं आपण जुळवून आणूं असें तुह्मांला वाटत होतें. आतां वेळ आणि स्थळ हीं आपोआप जुळून आलीं आहेत. आणि ही योग्य संधि जुळून आलेली पाहून आतां तुह्मी असे हातपाय गाळतां ! मी लहान मुलांना अंगावर पाजिलें आहे. आणि तान्ह्या बाळाला पाजतांना प्रेमाचा पान्हा कसा फुटतो हेंही पण मला ठाऊक आहे. पण मी जर तुमच्यासारखी शपथ वाहिली असती तर तेंच तान्हें बाळ माझ्याकडे पाहून हसत हसत पीत असतांना देखील त्याच्या त्या कोवळ्या लुसलुशीत ओठांतून मी आपला स्तन हिसकावून घेऊन त्या कारट्याला दगडावर आटपून त्याच्या टाळक्याचे तुकडे तुकडे केले असते.

मानाजी०—बरें, पण आपला बेत फसला तर ?

दर्या०—फसला तर ! मनांत धैर्य मात्र धरा. आणि मग मी तुह्मांला खात्रीनें सांगतें कीं आपला बेत फसायचाच नाहीं. दमाजी आज साऱ्या दिवसाचा दमून भागून आलेला आहे. त्यामुळें त्याला लवकर गाढ झोंप लागेल. आतां त्याच्या महालांतील दोन हुजरे राहिले. पण त्यांना मी इतकी कांहीं दारू पाजीन कीं त्यामुळें त्यांच्या डोक्यांत पहारा करणाऱ्या स्मृतीचा मागमूसही राहणार नाहीं. त्यांची सारी अक्कल गुंग होऊन जाईल. आणि अशा रीतीनें दारू पिऊन ते अजगरासारखे घोरत पडले, ते जिते आहेत कीं मेले आहेत अशी त्यांची अवस्था झाली, ह्मणजे मग त्या

दमाजीची तुह्मी आणि मी मिळून हवी तशी वाट लावून टाकूं. आणि आपण केलेल्या खुनाचा आरोप त्याच्याच चाकरमाणसांवर घालूं ह्मणजे झालें.

**मानाजी**०–तुझ्या पोटीं पुरुषच जन्माला आले पाहिजेत. कारण कीं हें जें तुझें प्रसंगीं न ढळणारें धैर्य आहे त्या पासून पुरुषाचीच उत्पत्ति झाली पाहिजे.—बरें त्याच्या खोलींत निजणाऱ्या त्या दोघां हुजऱ्यांच्या तरवारी घेऊनच जर आपण त्याचा गळा चिरला आणि त्या हुजऱ्यांच्या अंगाला रक्त फासून ठेविलें तर मग त्यांनींच हें काम केलें असें लोक ह्मणणार नाहींत का ?

**दर्या**०–लोकांना त्यावांचून दुसरी कल्पनाच करतां येणार नाहीं. कारण आपण त्याच्या मरणासाठीं ओक्साबोक्शी रडून आकांत करून सोडूं ह्मणजे झालें.

**मानाजी**०–ठीक. झाला माझ्या मनाचा निश्चय. माझ्या शरीरांतील प्रत्येक शक्तीचा उपयोग ह्या भयंकर कर्माकडे केल्यावांचून आतां मी राहणार नाहीं. चला, आतां आपण जाऊं या. आणि मध्यंतरींच्या वेळांत आपली मुद्रा तिळमात्रही बदलूं देतां कामा नये. ह्या खोटसाळ अंतःकरणांत जी वाटाघाट चालली आहे ती खोटसाळ मुद्राधारण करूनच छपवून ठेविली पाहिजे.

( सर्व जातात. )

———

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ–इंद्रपुर. मानाजीरावाच्या किल्यांतील एक पटांगण.

( व्यंकोजीराव व त्याचा मुलगा गुलाब हातांत दिवा घेऊन प्रवेश करितात. )

**व्यंकोजी०**–बाळा, किती रात्र झाली रे?

**गुलाब**–चंद्र मावळून गेला. पण मी किती वाजले तें ऐकिलें नाहीं.

**व्यंकोजी०**–आज चंद्र मध्यान रात्रीं मावळायचा.

**गुलाब**–पण मला वाटतें, बाबा, मध्य रात्र उलटून गेली असावी.

**व्यंकोजी०**–थांब.— ही माझी तरवार जरा तूं घे पाहूं. देवाच्या घरीं देखील काटकसर आहे. कारण पहा कीं आकाशांतील सर्व दिवे ह्मणजे हीं नक्षत्रें बहुतेक दिसेनाशीं झालीं. माझ्या डोळ्यावर झोपेची झांपड आली आहे. तरी पण निजावेंसें वाटत नाहीं. देवा एकांतांत असतांना मनांत जे कुविचार येतात त्यांना तूं नाहींसे कर.—दे ती तरवार माझ्या हातांत. कोण आहे तें तिकडे?

( मानाजीराव आणि त्याचा एक चाकर हातांत दिवा घेऊन प्रवेश करतात. )

**मानाजी०**–आपला स्नेही.

**व्यंकोजी०**–काय अजून तुह्मी निजलां नाहीं? आपले राजेसाहेब तर केव्हांच झोपीं गेले. आज

त्यांची तबेत अगदीं खुष झाली. आणि त्यांनीं तुमच्या चाकर माणसांना त्यामुळें पुष्कळ इनाम दिलें. आपल्या कुटुंबाकडून त्यांची चांगली बरदास्त ठेवण्यांत आली ह्मणून त्यांनीं हा हिरा त्यांना बक्षीस दिला आहे. आजच्या त्यांच्या आनंदाला पारावारच नाहीं.

**मानाजी**०–पूर्वीपासून तयारी नव्हती ह्मणून आमच्या मर्जीप्रमाणें रहावा तसा बातबेत राहिला नाहीं. जर योग्य फुरसत सांपडती तर मनासारखी तरतूद ठेवतां आली असती.

**व्यंकोजी**०–छे छे ! झाला तो बेत उत्तम झाला. पण मला काल रात्रीं स्वप्नांत त्या तीन चेटक्या दिसल्या. त्यांनीं तुह्मांला सांगितलेलें भविष्य तर कांहीं अंशीं खरें झालें.

**मानाजी**०–मी त्याचा विचार सुद्धां करीत नाहीं. तरी पण तुह्माला जेव्हां घटकाभर फुरसत असेल तेव्हां ह्याबद्दल तुमच्या परवानगीनें माझ्या मनांतून चार शब्द बोलायचे आहेत.

**व्यंकोजी**०–तुह्मांला जेव्हां फुरसत असेल तेव्हां माझ्याकडून तयारी आहे.

**मानाजी**०–तुह्मी माझ्या मर्जीवर ही गोष्ट ठेवतां हा तुमचा मोठेपणा आहे,

**व्यंकोजी**०–नवीन मोठेपणा संपादन करतांना पहिला नाहींसा होऊं नये आणि माझें मन निर्मळ रहावें आणि माझी राजनिष्ठा अबाधित असावी अशी माझी फार इच्छा आहे. ह्मणून मला या कामांत आपला सल्ला घेतलाच पाहिजे आहे.

**मानाजी०**—ठीक आहे. आतां तुह्मांला स्वस्थ झोप लागूं द्या.

**व्यंकोजी०**—ह्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तुह्मी ही आतां जाऊन निजाच.

( व्यंकोजीराव आणि गुलाब जातात. )

**मानाजी०**—माझें प्यायचें दुध तयार झालें कीं मला कळवायला तिला सांगून तूं निजायला जा. ( चाकर जातो. ) माझ्या पुढें हें काय बरें दिसतें आहे ! ही कट्यार आहे काय? हीची मूठ माझ्या हाताकडे वळलेली दिसते आहे. बरें, हातांत घेऊन पाहूं या. चल ये माझ्या हातांत. काय ! हाताला लागत नाहींस! पण दृष्टीला तर दिसतेस. अरे घातुका मायिक शस्त्रा, ज्याप्रमाणें तूं दृष्टीला गोचर आहेस त्याप्रमाणें तूं स्पर्शाला गोचर नाहींस काय ? किंवा तूं केवळ कल्पनामयच आहेस ? अथवा भयंकर विचारांनीं भणभगलेल्या मस्तकांतून निघालेली खोटी सृष्टि तर तूं नाहींसना? पण माझ्या हातांतल्या या नागव्या कट्यारीप्रमाणें तूं हुबेहुब दिसते आहेस. हें काम करण्याकरितां मी ज्या मार्गाचें अवलंबन करणार होतों तोच मार्ग तूं मला दाखवीत आहेस. मी असल्याच शस्त्राचा उपयोग करणार होतों.—इतर सर्व इंद्रियांनीं माझ्या डोळ्यांला मूर्ख बनविण्याचा विचार केला आहे किंवा डोळेच सर्व इंद्रियांचें काम करीत आहेत !—अजून तूं मला दिसते आहेस. आणि तुझ्या धारेवर रक्ताचे डाग पडलेले दिसताहेत. हे पूर्वीं येथें नव्हते. —छे नव्हे ! ही येथें दिसणारी कट्यार मिथ्याच असली

पाहिजे. माझ्या मनांतलें अघोर कर्मच हा भास उत्पन्न करीत आहे.—यावेळीं अर्ध्या सृष्टिचा प्रळय झाला आहे असें दिसतें. आणि ऐषआरामांत पलंगावर झोपीं गेलेल्या लोकांना देखिल भलतीं सलतीं स्वप्नें पडत आहेत. पंचाक्षरी, देवऋषि, चेटक्या आपल्या इष्टदेवता आणि भुतेंखेतें यांची आराधना करण्यांत गुंतले आहेत. खून करण्याला प्रवृत्त झालेले मनुष्य आपला बेत सिद्धीस नेण्याकरितां लपत छपत चालले आहेत.–हे अचल धरित्रि माते, माझीं पावलें कोणीकडच्या वाटेनें जात आहेत हें सुद्धां तूं ऐकूं नकोस. कारण तुझ्या पृष्ठभागावरील हे पाषाण देखिल मी कोठें जात आहें व काय करीत आहें हें सर्व बडबडायला लागतील, आणि त्या योगानें शांत वेळीं भयंकर कृत्य करण्यापासून उत्पन्न होणाऱ्या भयानक रसाचा भंग होईल.–पण माझ्या नुसत्या वल्गना चालल्या आहेत आणि तो अजून जिवंत आहे. काम करण्याच्या उमेदीला फार बडबडण्यानें विरजण पडतें. ( डंका वाजतो.) हा मी जातों आणि एका क्षणांत तें उरकून टाकतों. हा जो डंका वाजला तो मला हें काम करायला चल ह्मणून बोलवीत आहे. दमाजी, तूं हा ऐकूं नकोस. कारण हा तुला स्वर्गाला किंवा नरकाला पोंचवीत आहे. ( जातो. )

## प्रवेश २ रा.

स्थळ—पूर्वींचेंच. ( दर्याबाई प्रवेश करिते. )

**दर्याबाई**—ज्यानें त्यांना बेशुद्ध केलें त्यानेंच मला धारिष्ट आणून दिलें आहे. कसला बरें हा आवाज? —हा त्या घुबडाचा कर्कश आवाज आहे. ह्या वेळीं स्वारी तें काम करण्याच्या अगदीं बेतांत असेल. दरवाजे अगदीं उघडे आहेत आणि ते त्याचे चाकर जागण्याची कामगिरी घोरूनच करीत आहेत. मी त्यांच्या दारूमध्यें कांहीं वनस्पतींचें मिश्रण करून दिलें आहे. त्याच्या योगानें ते इतके गुंगले आहेत कीं ते जिवंत आहेत कीं मेले आहेत हें देखील समजत नाहीं.

**मानाजी**०—( आंतून ) कोण आहे तिकडे ?

**दर्या**०—घात झाला ! मला वाटतें ते जागे झाले. आणि काम कांहीं शेवटास गेलें नाहीं. ह्या कृत्याच्या दुष्टपणामुळें माझें मन गोंधळलें नाहीं. पण हें कसें पार पडेल ह्या चिंतेनें माझा गोंधळ झाला आहे.—थांबा. मी त्यांच्या कट्यारी अगदीं तयार करून ठेविल्या होत्या. त्या त्यांना सांपडल्याच असतील.—तो निजला असतां माझ्या बाबांसारखा दिसला नसता तर मीच तें काम उरकलें असतें. काय ! तेच इकडे आले !

( मानाजीराव येतो. )

**मानाजी**०—मी तें काम तर पार पाडलें.—पण तूं मधें कांहीं गलबला ऐकिला नाहींस काय ?

**दर्या**०—होय; घुबड ओरडत होतें आणि रात्र

किरं शब्द करीत होती तें मी ऐकिलें. तुम्ही मधें कांहीं शब्द बोललां ना ?

**मानाजी**०-केव्हां ?

**दर्या**०-आतां.

**मानाजी**०-आतां मी खालीं आलों तेव्हां ?

**दर्या**०-होय.

**मानाजी**०-ऐक ! त्या दुसऱ्या खोलींत कोण निजलें आहे ?

**दर्या**०-वनाजीराव.

**मानाजी**०-(हातांकडे पाहून) काय भयंकर देखावा हा!

**दर्या**०-असें ह्मणणें मूर्खपणाचें काम आहे.

**मानाजी**०-तेथें कोणसा निजला होता. तो झोपेंतच हसूं लागला, आणि दुसरा एकजण निजला होता तो झोपेंत " खून खून " असें बडबडूं लागला. मग दोघांनीं एकमेकांना जागें केलें. मी मुकाट्यानें उभा राहून ऐकत होतों. त्यांनीं दुष्टस्वप्ननिरसनार्थ एक स्तोत्र ह्मटलें आणि फिरून ते निजले.

**दर्या**०-अहाहा ! अहो, ते निजले तर मग त्यांनां भ्यायचें काय कारण आहे !

**मानाजी**०-स्वप्नांत त्यांनीं मला ह्या हातांनीं खून करतांना पाहिलें. ह्मणून त्यांतील एकानें देवाचें स्मरण करून ह्मटलें "दुःस्वप्नं विलयं नीत्वा शोभनं कुरु केशव." तें ऐकून दुसऱ्यानेंही "तथास्तु" असें ह्मटलें. ह्मणून माझ्याही मनांतून देवापाशीं "तथास्तु" ह्मणून प्रार्थना करायची होती. पण माझ्यानें ती करवेना.

**दर्या॰**—त्याचा एवढा विचार कशाला पाहिजे?

**मानाजी॰**—पण मला ' तथास्तु ' अशी प्रार्थना देवापाशीं करण्याचें धारिष्ट कां होऊं नये! मला ईश्वराच्या कृपेची त्या वेळीं फार अवश्यकता होती.

**दर्या॰**—असल्या कामाचा अशा रीतीनें विचार करणें चांगलें नाहीं. अशानें आपल्याला वेड देखील लागेल.

**मानाजी॰**—'आतां याच्या पुढें झोंपेचें नांव नको, मानाजीराव झोंपेचा खून करीत आहे, ' अशी ओरड ऐकिल्याचा मला एकदा भास झाला.

**दर्या॰**—ह्या तुमच्या वडबडण्याचा अर्थ तरी काय?

**मानाजी॰**—किल्ल्यांतील सगळ्या मनुष्यांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें आतां 'झोंप नाहींशी झाली' असा शब्द ऐकूं येत होता. आणखी असाही शब्द झाला कीं 'माणिकपुरच्या जहागिरदारानें झोंपेचा खून केला, ह्मणून कठोरपुरच्या ठाकुराला झोंप मिळणार नाहीं! मानाजीरावाला झोंप मिळणार नाहीं! '

**दर्या॰**—असें कोण तेथें ह्मणायला आलें होतें? अहो असा भ्रमिष्टासारखा विचार करीत बसून तुह्मी आपल्या धैर्याचें पाणी करीत आहां. जा थोडें पाणी घ्या. आणि तुमच्या हातावर ज्या ह्या घाणेरड्या मुद्याच्या खुणा आहेत त्या धुऊन टाका. ह्या कट्यारी तुह्मी तेथून येथें कशाला आणल्या? त्या तेथेंच ठेवायला पाहिजे होत्या. जा, ह्याही बरोबर घेऊन जा. आणि त्याचे हुजरे तेथें निजले आहेत त्यांच्या अंगाला चांगलें रक्त फांसा.

हरामखोर पापी लोक नरकामंदे पडण्यापाई ये-ऊनशेनी मला झोप लागूं घेइनात. आतां काय करावं यासनी? हा! हा! ही युगत लई ब्येस सुचलिया! रातीच कुणीबी नरकामंदि पडायासनी येऊं नय असा हुकूम आपल्या धनीसाबाकडूनशेनी मी काढवतो.—पर इचि भन त्ये पापी लोक लइ दोवाड असत्याती. त्ये आमच्या यमाजीपंताचा हुकूम ऐकत्याल कीं नाहीं कोणासनी ठावं?—आं! अरे इचि भन! मर्त्युलोकामंदि कुणी हुकूम केला कीं रातीच कुणी मरूंबी नका कीं कुणी मेलं तर जाळूंबी नका तर ह्ये लंवडीचे पापी लोक निमूटपणें ऐकत्याती अन् आमच्या धन्याचं ऐकणार नाहींत व्हय? त्येंची तेवढी ह्या पाप्यांना लई जरब वाटती असं तमग झालं व्हय? आन् इचि भन त्येंची तेवढी रातीची झोप मोडतां कामा नाहीं आन् माजी मोडली तरी चालल व्हय? बरं बरं! त्या लेकांसनी ह्मणाव तुह्मी नरकांत पडायासनी या तर खरे, कीं मग ह्या पठ्ठ्याशीं गांठ हाय. मग मी घेतों पाहूनइयानी. ( दारावर आणखी धक्के बसतात. ) मारा मारा! दारावर एकसारखे धक्के मारीत असा. मंधि खळ बी पडूं घेऊं नका. हं! ह्यो क्कोण आलायर! ह्यो त्यो जनावर समजुनइयेनी माणसासनीच ठार करीत असतो नव्हका?—या तुह्मी राव! क्वण हायर तिकडे? जा यासनी घेऊन आन त्ये वाघ, सिंह, अस्वल थत हायती नइका त्यांच्या मंदि ह्या गुलामासनी द्या फेकुन. ( फिरून धक्का बसतो. ) ह्यो क्वण आला? अर इचि भन, ह्यो दारू पिनारा आन् मांस खानारा हायर

बुवा! इचि भन हे दारूच्यापुन लइ परमळताय! अवबवब! ह्येच नाकवी कस तोंडल्यावाणी लाल भडक झाल या! जारे, ह्येला बेगी बेगी न्येउनश्यानी गाढवाच्या मुतांनीं भरलेल्या त्या हिरींत द्या ढकलून. (फिरून धक्के ऐकू येतात.) या तुह्मी कोण आलां? हं. हे पक्षपात करणारे अन्यावाधीश! ह्ये मोठे बडे लोक हायती हं! तुह्मी थांबा वइच बावा. तुमचा न्याव नीट निवडला पाहिजे व्हयना! थांबा तुह्मीं.—ह्ये कोण तुमच्या मागून आले हायेती? हं हं! ह्ये तुमचे लांचाचे पैसे वसूल करणारे दलाल! ह्ये दोघांबी बाजूकडूनशेनी पैसे उपटणारे वकील! ह्ये खोटीं खतें तयार करणारे सावकार! ह्ये पाहिजे त्या बाजूची पाहिजे तशी साक्ष देणारे बनावट साक्षीदार! अवववव! काय ह्यांचे थवेच्या थवे हे! अर ल्येको, तुह्माला इतक्यांसनी न्याऱ्या न्याऱ्या जागा तरी हत हायत कुट? द्यार ह्या समद्या गुलामासनी येकाच खाड्यामंदि ढकलून! अववबव! मृत्युलोकांतले ह्ये सारे बडे बडे लोक तर हकडच येत्याती! आपणासनी नग बावा ह्य तरास. भल्या माणसानं ह्या काळांत नरकातल्या देवडीवाल्याचें काम पतकरूं नये. (धक्का ऐकू येतो.) कोण दारावर धक्का मारीत आहे?

[मुकुंदराव आणि लक्ष्मणसिंग प्रवेश करितात.]

**मुकुंद॰**—काय रे गड्या, इतका वेळ तुला झोंप कां लागली होती? रात्रीं निजायला उशीर झाला होता कीं काय?

**देवडी॰**—व्हय दादा, दुसरा कोंबडा ओरडेतों आह्मी मजा मारीत बसलों होतों.

मुकुंद०-तुझे धनीसाहेब उठले आहेत काय? ( मानाजीराव येतो. ) आह्मी दारावर धक्के मारीत होतों त्यामुळें जागे होऊन हे इकडेच आले.

लक्ष्मण०-राम, राम, ठाकूरसाहेब.

मानाजी०-राम राम! राम राम!

मुकुंद०-ठाकूरसाहेब, सरकार जागे झाले आहेत काय?

मानाजी०-नाहीं अजून.

मुकुंद०-मला त्यांनीं बऱ्याच मोठ्या पहाटेस हाक मारायला सांगितलें होतें. पण माझ्या कडून-ती वेळ बहुतेक चुकून गेली.

मानाजी०-चला, मी तुह्मांला त्यांच्याकडे घेऊन जातों.

मुकुंद०-हे जरी आपल्याला श्रम पडत आहेत तरी ह्या श्रमापासून आपल्याला आनंदच होईल हें मला माहीत आहे.

मानाजी०-जे श्रम करण्याची आपल्याला हौस असते ते केल्याचा शीण मुळींच वाटत नाहीं.—हा त्यांच्या महालाचा दरवाजा.

मुकुंद०-त्यांनीं मला सांगितलेंच आहे त्यापेक्षां त्यांना जाऊन उठवलेंच पाहिजे. ( जातो. )

लक्ष्मण०-सरकारस्वारी आज येथून जाणार आहे काय?

मानाजी०-होय. असा काल त्यांचा विचार ठरलेला आहे खरा.

लक्ष्मण०-ह्या रात्रीं मोठी गडबड चालली हो-

ती. आह्मी जेथें निजलों होतों तेथील तटाचे बुरूज धडाधड कोसळून पडत होते. आणि कोणी कोणी तर असें सांगतात कीं रडण्याचे स्वर आणि मरणकाळचे आक्रोश ऐकूं येत होते. आणि पुढें येणाऱ्या भयंकर काळांत अग्निप्रळय होतील आणि सर्व गोष्टींत विलक्षण घोटाळा उडून जाईल असले भयंकर स्वरानें उच्चारिलेले भविष्यवादही ऐकूं येत होते. तीं अंधकारप्रिय घुवडें साऱ्या रात्रभर एकसारखीं ओरडत होतीं. कोणी ह्मणतात कीं जमीन तप्त झाली होती आणि कांहीं वेळ धरणीकंपही झाला.

**मानाजी**०—ही रात्र तर मोठी खडतर गेली खरी.

**लक्ष्मण**०—माझ्या आठवणींत मी कधीं असली रात्र पाहिली नव्हती!

[ मुकुंदराव प्रवेश करितो. ]

**मुकुंद**०—हाय हाय! घात! घात! घात! ज्या अघोर कर्माची अंतःकरणाला कल्पना करतां येणार नाहीं आणि जिव्हेला ज्याचें वर्णन करतां येणार नाहीं असा हा भयंकर घात झाला!

**मानाजी** आणि **लक्ष्मण**०—काय! झालें तरी काय?

**मुकुंद**०—दुसरें काय? दुर्दैवानें आपली कमाल करून सोडली! कोणी हरामखोरानें आपल्या महाराजांच्या हृदयमंदिराचा भेद करून त्यांतील प्राणरूपी रत्न हरण करून नेलें!

**मानाजी**०—तुह्मी काय ह्मणतां? प्राण हरण केले?

**लक्ष्मण**०—आपल्या महाराजांचे?

**मुकुंद**०—त्या महालाजवळ चला, आणि तुह्मीच

आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पहा. मी तोंडानें काय सांगूं ! तें भयंकर कृत्य पाहिल्याबरोबर तुमचे डोळे फाटून जातील.[ मानाजिराव आणि लक्ष्मणसिंग जातात. ] उठा ! उठा ! जागे व्हा ! अरे तें शिंग फुंका आणि सगळ्यांना जागे करा.—खून ! खून ! दगा रे दगा ! व्यंकोजीराव! धनाजी! मल्हारराव ! उठा ! उठा ! मृत्यूची प्रतिमा जी ही तुमची झोंप तीं टाकून द्या. आणि हा प्रत्यक्ष मृत्यु येथें घडला आहे तो पहा. उठा उठा ! आणि हें भयंकर मृत्यूचें स्वरूप पहा ! मल्हारराव, व्यंकोजीराव, तुह्मी आपल्या चितारूप शय्येवरून उठा आणि पिशाचासारखे इकडे धांवत येऊन हा भयंकर देखावा अधिक भयंकर करून सोडा.

[ शिंग वाजतें व दर्याबाई प्रवेश करिते. ]

**दर्या०**—किल्ल्यांत सगळीं माणसें निजलीं असतां अशा भयंकर रीतीनें हें शिंग कोणी वाजलें? असें झालें आहे तरी काय! सांगा, सांगा लौकर.

**मुकुंद०**—दर्याबाई, छे. छे. तुमच्या सारख्या कोमल अंतःकरणाच्या स्त्रियांच्या कानावर ही गोष्ट आली तर ती ऐकतां ऐकतांच तुह्मी घेरी येऊन पडाल. ( व्यंकोजीराव प्रवेश करितो. ) व्यंकोजीराव! अहो व्यंकोजीराव ! आपल्या धनीसाहेबांचा कोणी खून केला हो!

**दर्या०**—अग बाई ! काय हें ! असली गोष्टी ! आणि ती आमच्या येथें !

**व्यंकोजी०**—बाईसाहेब, ही गोष्ट कोठें ही झाली असती तरी वाईटच.

[मानाजीराव आणि लक्ष्मणसिंग प्रवेश करितात. ]

**मानाजी०**—ही भयंकर गोष्ट घडून येण्यापूर्वी एक घटकाभर आधीं जर मी मेलों असतों तरी माझ्या जन्माचें सार्थक झालें असतें. कारण आतां ह्या जगांत काय अर्थ राहिला आहे? आतां हा संसार निःसार झाला. कीर्ति आणि चांगुलपणा हीं आज लयाला गेलीं. आज त्रिभुवनांतील खरें रत्न तें हरपून गेलें, आणि मागें ह्या सगळ्या गारगोट्या मात्र उरल्या आहेत.

( मल्हारराव आणि धनाजी प्रवेश करितात. )

**धनाजी**—काय हो ? काय? आहे काय प्रकार ?

**मानाजी०**—आपल्याला ठाऊक नाहीं? आपल्यावर मोठा दुःखाचा पर्वत कोसळला! तुमच्या अंगांत जो रक्ताचा प्रवाह खेळत आहे त्याचा उगम आज बंद पडला !

**मुकुंद०**—आपल्या वडलांचा खून झाला !

**मल्हार०**—शिव शिव! कोणत्या हरामखोरानें तो केला?

**लक्ष्मण०**—त्यांच्या महालांत जे हुजरे निजले होते त्यांनींच हें काम केलें असावें असें दिसतें. त्यांचे हात आणि त्यांचीं तोंडें सगळीं रक्तानें भरलेलीं होतीं. तसेंच त्यांच्या तरवारीही रक्तानें भरलेल्या होत्या आणि त्या तशाच न पुसतां त्यांनीं आपल्या उशाजवळ ठेविलेल्या आह्मांला आढळल्या. ते आमच्याकडे डोळे वटारून पहात होते आणि त्यांचें डोकें फिरल्यासारखें दिसत होतें. कोणीही मनुष्य त्यांच्याजवळ असता तरी त्याचा खून पाडण्याला त्यांनीं कमी केलें नसतें.

**मानाजी०**–तरी पण रागाच्या झपाट्यांत मी त्यांना ठार केलें ह्याबद्दल मला राहून राहून वाईट वाटतें आहे.

**मुकुंद०**–तुम्ही असें कां केलेंत ?

**मानाजी०**–आश्चर्यचकित झाल्यावर मागचें पुढचें धोरण कोणाला राहणार आहे ? रागाच्या आवेशांत आल्यावर नेमस्तपणा कसा टिकणार ? आणि ज्याच्या मनांत राजनिष्ठा ह्मणून कांहीं आहे तो अशा वेळीं नुसता तोंडाकडे पहात स्वस्थ राहिल काय ? कोणीही राहणार नाहीं. असल्या कृत्याला प्रतिबंध करणाऱ्या न्यायबुद्धीचें माझ्या राजनिष्ठेपुढें कांहीं चाललें नाहीं.—एका बाजूला दमाजी महाराज पडले होते. त्यांच्या सर्वांगावरून रक्ताचे ओघळ चालले होते आणि जागोजाग मोठमोठ्या जखमा पडल्या होत्या. आणि दुसरीकडे त्यांचा खून करणारे ते हुजरे निजले होते. त्यांचें अंग आणि तरवारी रक्तानें भरलेल्या जवळ पडल्या होत्या. अशा स्थितींत ज्याचें मन राजनिष्ठेनें भरलेलें आहे आणि ती राजनिष्ठा व्यक्त करण्याचा प्रसंग आला असतां ज्याच्या मनांत धैर्यही आहे अशा कोणत्या मनुष्यानें हें काम करायला सोडलें असतें ?

**दर्या०**–मला येथून कोणी तरी घेऊन चला हो.

**मुकुंद०**–दर्याबाईंना काय झालें तें पहा.

**मल्हार०**–वास्तविक पाहतां आपल्यावरच मुख्यत्वेंकरून हा प्रसंग गुदरलेला आहे. असें असून ह्या कामांत तूं कांहींच बोलत नाहींस तें कां ?

**धनाजी**–जेथें आपलें दुर्दैव झडप घालून आप-

त्याला देखील केव्हां धरील याचा नेम नाहीं अशा ठिकाणीं आपण काय बोलावें ! येथून आपण निघून जावें हाच आतां उत्तम मार्ग आहे. रडत बसण्याची ही वेळ नव्हे.

मल्हार०–दुःखाचा डोंगर एकदम कोसळला ह्मणजे काय बोलावें आणि काय करावें हें कांहींच सुचत नाहीं.

[ दर्याबाईला आंत नेतात. ]

व्यंकोजी०–बरें आतां महाराजांचें प्रेत फार वेळ ठेवतां कामा नये. तेव्हां त्यांना लवकर मूठमाती देऊं या आणि मग हें अघोर कृत्य कोणी केलें ह्याची चौकशी करण्याकरतां आपण सर्व एका ठिकाणीं जमूं. आपल्या मनांत नाना प्रकारच्या शंका आणि कुकल्पना येत आहेत. तरी पण परमेश्वरावर हवाला ठेवून ज्या कोणी हें राजद्रोहाचें कृत्य गुप्तपणें केलें असेल त्याचा सूड घेण्याला मी तयार आहें.

मुकुंद०–आणि मी पण तयार आहें.

सर्व—तुह्मीच काय ? आह्मी सर्वजण देखील ह्या कृत्याला तयार आहों.

मानाजी०–बरें तर जलदीनें आपलीं इतर कृत्यें उरकून घेऊन आपण या दिवाणखान्यांत जमूं या.

सर्व—ठीक आहे.

[ मल्हारराव आणि धनाजी ह्यांखेरीज सर्व जातात. ]

मल्हार०–तुझा कसा काय विचार आहे? आपण त्यांच्यांत मिसळूं नये असें मला वाटतें. पोटांतून ज्या

दुःखाचे उमाळे फुटत नाहींत त्या दुःखाचा वरकरणी बहाणा करणें हें लुच्चया लोकांनांच चांगलें साधतें. मी तर मगधदेशांत जाणार.

**धनाजी**—आणि मी रत्नपुराकडे जाणार. दोघे दोहोंकडे गेलों तरच आपण सुरक्षित राहूं. आपण हल्लीं जेथें आहों तेथलि लोक वरवर हसून आंतून आपला गळा कापायला कधींही कमी करायचे नाहींत. आणि ज्यांच्याशीं आपला शरीरसंबंध विशेष आहे ते आपल्या शरीराचे राई एवढे तुकडे करण्याला जास्त तत्पर हें तूं पक्कें समज.

**मल्हार०**—हें मनुष्याचें गळे कापणारें अस्त्र शत्रूच्या हातून सुटलें आहे, पण तें अजून आपल्या गळ्यावर येऊन पडलें नाहीं. आणि ह्मणून इतक्यांतच तें चुकविण्याचा प्रयत्न करणें हा उत्तम मार्ग होय. तेव्हां घोड्यावर बसून आपण येथून पळ काढूं या. कोणाचाही निरोप घेत बसण्याची ही वेळ नव्हे. कसेंही करून आपण येथून निसटलें पाहिजे. जेव्हां कोणाच्याच अंतःकरणांत दयेचा लेश उरलेला नसतो तेव्हां अशा रीतीनें वागण्यांत कांहीं गैरशिस्त नाहीं.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ—किल्याच्या बाहेरील एक मैदान.

( राणोजी आणि एक म्हातारा मनुष्य प्रवेश करितात. )

**म्हातारा**–आज माझ्या वयाला सत्तर वर्षे होऊन गेलीं. आणि ह्या इतक्या मुदतींत मी पुष्कळ भयंकर आणि अद्भुत गोष्टी पाहिल्या आहेत खऱ्या. पण आज रात्रीं जें कांहीं मी पाहिलें त्यापुढें मागील सर्व रद्द आहे.

**राणोजी**–बाबा, तुह्मी ह्मणतां तें अगदीं खरें आहे. अलीकडे माणसें भारी पाप करूं लागलीं आहेत. त्यामुळें असले अपशकुन होतात. हेंच पहाना, आतां वास्तविक ह्मटलें तर उजडायला पाहिजे. परंतु त्रिभुवनप्रदीप जो सूर्य त्याला अजून देखील रात्रीनें झांकून ठेविलें आहे. पृथ्वीच्या पाठीवर चोहोंकडे प्रकाश पसरावयाचा अशा वेळीं हा भूगोल अंधकारांत गढून गेला आहे. ह्याचें कारण काय असावें? रात्रच एवढी प्रबळ झाली ह्मणावी काय? किंवा सूर्यालाच उगवायला लाज वाटूं लागली कोण जाणें!

**म्हातारा**–आज घडून आलेलें कर्म जसें अपूर्व तसेंच हेंही अपूर्व ह्मटलें पाहिजे. गेल्या मंगळवारीं एक बहिरीससाणा आकाशांत उंच उडत होता. इतक्यांत एका घुबडानें लपत छपत येऊन त्याच्यावर झडप घातली आणि त्याला ठार केलें.—हे पहा मुकुंदराव इकडे येत आहेत.

[ मुकुंदराव येतो. ]

काय? कशी काय खबरबात आहे हल्लीं?

**मुकुंद०**–दुसरी काय? बघतांच आहां तुह्मी काय आहे ती.

**राणोजी**–हें अमानुष कृत्य कोणी केलें ह्याचा कांहीं शोध लागला काय?

**मुकुंद**–ज्यांना मानाजीरावांनीं मारलें त्यांचेंच हें कृत्य असलें पाहिजे.

**राणोजी**–अरेरे! त्या मांगांना ह्यापासून काय मिळालें असेल कोण जाणें?

**मुकुंद०**–त्यांना कोणी तरी पैसे देऊन हें कृत्य करण्याला प्रवृत्त केलें असावें. महाराजांचे दोघे मुलगे, मल्हारराव आणि धनाजी, हे येथून कोणाला न कळत पळून गेले. ह्यावरून त्यांनींच हें काम करविलें असावें अशी शंका येते.

**राणोजी**–छे. हें तर अगदींच संभवत नाहीं. पण तसेंही असेल कदाचित्.–शिव शिव! महत्त्वाकांक्षी पुरुषांचा चोहोंकडून निरुपाय झाला ह्मणजे ते ज्यांनीं आपल्याला जन्म दिला त्यांचा देखील गळा कापायला तयार होतात ना? बरें आतां हें राज्य मानाजीरावांनाच बहुतकरून मिळेल.

**मुकुंद०**-होय. त्यांनाच हें राज्य देण्याचा निश्चय ठरला आहे. आणि त्याप्रमाणें राज्याभिषेकासाठीं ते स्कंदपुराला निघून देखील गेले.

**राणोजी**–तुह्मी स्कंदपुराला जाणार आहां कीं काय?

**मुकुंद०**–नाहीं. मी आपल्या गांवीं जाणार आहें.

**राणोजी**–माझ्या मनांतून स्कंदपुराला जायचें आहे.

**मुकुंद०**–ठीक आहे. जा. तेथें सर्व गोष्टी निर्विघ्नपणें पार पडोत ह्मणजे झालें.–या तर, राम राम! पुढच्यांनीं मागच्याला बरें ह्मणायला लाविलें नाहीं ह्मणजे झालें!

**राणोजी**–येतों ह्मातारे बाबा, राम राम.

[ सर्व जातात. ]

---

## अंक ३ तिसरा.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**––परशुपुर. राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

( व्यंकोजीराव प्रवेश करतो. )

**व्यंकोजी०**–मानाजीराव, त्या चेटक्यांनीं भविष्य केल्याप्रमाणें माणिकपुरचा जहागिरदार, कठोरपुरचा ठाकूर, आणि राजा तूं झालास. पण मला अशी जबरदस्त शंका आहे कीं हें राज्यपद मिळविण्यासाठीं तूं अतिशय नीच कर्म केलें असावेंस. पण त्या चेटक्यांनीं आणखी असेंही सांगितलें कीं ही गादी तुझ्या वंशाकडे चालणार नाहीं. तर ती पुढें माझ्याच वंशजांकडे येणार. मानाजीराव, त्यांचें बोलणें तुझ्या विषयीं खरें झालें. ह्यावरून त्यांचें भविष्य चुकत नाहीं हें खास. तर मग आतां माझ्याविषयींचें भविष्य कां खरें होणार नाहीं ? त्याबद्दल माझ्या मनांत आशा उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. पण पुरे. ह्याचा आणखी विचार नको.

( शिंग वाजतें व नंतर राजा मानाजीराव, राणी दर्याबाई, लक्ष्मणसिंग व दुसरे सरदार आणि हुजरे प्रवेश करितात. )

**मानाजी०**–हे व्यंकोजीराव तर येथेंच आहेत.

**दर्या०**–ह्यांना आमंत्रण करण्याची जर आठवण झाली नसती तर आजच्या मेजवानीचा थाट चांगला जमला नसता, आणि सगळा बेत बिघडून गेला असता.

**मानाजी०**–आज रात्रीं आमच्या येथें मेजवानीचा बेत आहे. तेव्हां आपण याल तर मोठी मेहरबानी होईल.

**व्यंकोजी०**–ह्यांत मेहरबानी कसली ? सरकार जें जें सांगतील तें तें करायला मी नेहमीं तयार आहें.

**मानाजी०**–आज तिसऱ्या प्रहरीं घोड्यावर बसून फेरफटका करायला तुह्मांला कोठें जायचें आहे कीं काय ?

**व्यंकोजी०**–होय सरकार.

**मानाजी०**–आज दरबारांतल्या कांहीं कामासंबंधानें तुमचा सल्ला घ्यायचा होता.–तुमचा सल्ला नेहमींच पोक्त असतो व परिणामीं हितकारक होतो.–पण असो. त्याबद्दल आपण उद्यां विचार करूं.–तुह्मी फार लांब फिरायला जाणार आहां कीं काय ?

**व्यंकोजी०**–आतांपासून संध्याकाळच्या जेवणाची वेळ होईपर्यंत जितकें लांब जाऊन येतां येईल तितकें जाण्याचा विचार आहे. जर माझा घोडा दमल्यामुळें चांगला चालेनासा झाला तर कदाचित् घटका दोन घटका रात्र होण्याचा संभव आहे.

मानाजी०-पण वेळेवर यायला चुकूं नका हो.

व्यंकोजी०-नाहीं चुकणार सरकार.

मानाजी०-मी असें ऐकतों कीं तें अघोर कर्म करून मल्हारराव मगधदेशाला आणि धनाजी रत्नपुराला पळून गेले. आपण निर्दयपणानें केलेला आपल्या बापाचा खून छपवून ठेवून ते खोट्यानाट्या कंड्या उठवून लोकांना भलभलतें सांगत आहेत. पण ह्याविषयीं आपण उद्यां बोलूं.-उद्यां आपल्याला दुसऱ्या कामासाठीं दरबारांत जमायचेंच आहे. जा,जाच तर तुह्मी आतां. राम राम!-तुमचा गुलाब तुमच्या बरोबर येणार आहे कीं काय ?

व्यंकोजी०-होय सरकार. बरें आहे, जातों आतां. उशीर झाला आहे.

मानाजी०-ठीक आहे. यावें.

[ व्यंकोजीराव जातो. ]

दोन घटका रात्र होईपर्यंत ज्याला जिकडे जायचें असेल तिकडे त्यानें जावें. संध्याकाळीं मंडळींत मिसळण्यापासून अधिक सुख व्हावें ह्मणून मलाही कांहीं वेळ एकांत पाहिजे आहे.

[ मानाजीरावाखेरीज सर्व जातात. ]

अरे, ते लोक आले आहेत काय ?

हुजऱ्या-सरकार, राजवाड्याच्या दरवाजाबाहेर ते उभे आहेत.

मानाजी०-जा. त्यांना माझ्यासमोर घेऊन ये.

[ हुजऱ्या जातो. ]

अशा स्थितींत राहण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तर राज्य मिळून त्याच्याबरोबर निर्धास्तपणा मिळेल तर त्यांत मजा. मला व्यंकोजीरावाची मोठी भीति वाटते आहे. कारण त्याच्या त्या सरदारी स्वभावांतच असें कांहीं एक पाणी आहे कीं त्यापासून मला भयच उत्पन्न होतें. तो मोठा धाडशी असून पुन्हा शहाणा आहे. त्याच्या योगानें त्यानें एखादे वेळेला कांहीं धाडस केलें तरी ती बाजू त्याच्या अंगावर येत नाहीं. मला दुसरी कसलीही भीति नाहीं. पण हा जीवंत आहे हीच मला भीति. त्याच्यापुढें माझी अक्कल गुंग होऊन जाते. जेव्हां त्या चेटक्यांनीं मी राजा होईन ह्मणून सांगितलें तेव्हां हा त्यांच्यावर रागावला. आणि आपल्याबद्दल कांहीं भविष्य सांगण्याविषयीं त्यानें त्यांना विनंति केली. तेव्हां तुझ्या कुळांत जे पुरुष जन्माला येतील त्यांना राज्यपद मिळेल असा आशीर्वाद त्यांनीं त्याला दिला. तेव्हां माझ्या मस्तकावर त्यांनीं जो मुकुट ठेविला तो फुकट. आणि माझ्या हातांत त्यांनीं जो राजदंड दिला तोही पण व्यर्थ. कारण माझा मुलगा पुढें गादीवर बसायचा नसल्या कारणानें हीं दोन्हीही माझ्यापासून तिसराच कोणी तरी हिसकावून घेणार. आणि असें जर होणार असेल तर व्यंकोजीरावाच्या वंशजांसाठीं मी हें पाप केलें ! त्यांच्यासाठीं त्या महात्म्या दमाजीचा मी खून केला ! त्यांच्यासाठीं मी आपल्या

मनाला हजारों विंचू लावून घेतले. आणि त्यांना राजे करण्यासाठीं—त्या व्यंकोजीरावाच्या कारट्यांना राजे करण्यासाठीं—मी आपल्या परलोकच्या अक्षय सुखाला आंचवलों! अशा स्थितींत राहण्यापेक्षां, काय होईल तें होवो, त्याचा निकाल लावण्याला कंबर बांधलीच पाहिजे. चल ये नाशिबा! तुझ्याशीं मी लढणार. पाहूं दे कोणाची सरशी होते ती. कोण आहे तिकडे?

[ हुजऱ्या आणि दोन मारेकरी प्रवेश करितात. ]

जा. त्या दरवाजाजवळ उभा रहा. आणि मी हांक मारीपर्यंत तेथून हलूं नको.

[ हुजऱ्या जातो. ]

कालच तुमचें माझें बोलणें झालें नाहीं काय?

**पहिला मारेकरी**–होय सरकार.

**मानाजी०**–बरें तर. तुह्मी माझ्या ह्मणण्याचा विचार केलात काय? तुह्मांला वाटत होतें कीं मागें जें तुमचें नुकसान झालें तें मी केलें ह्मणून. पण तुह्मी पक्कें लक्षांत ठेवा कीं तें काम त्याचेंच होतें. आतां तें कसें ह्याबद्दल माझ्या कालच्या बोलण्यावरून तुमची खात्री झालीच असेल. तुमची लायकी असून तुह्मांला कसें मागें ठेवलें, तुमची कशी मानखंडना केली, तुह्मांला कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नाचवून आपला फायदा कसा करून घेतला, ह्या व इतर गोष्टी मी तुह्मांला इतक्या स्पष्ट रीतीनें सिद्ध करून दखविल्या आहेत कीं एखाद्या अर्धवट आणि वेडगळ मनुष्यानें त्या ऐकल्या

तर ' व्यंकोजीनेंच हें केलें ' असें ह्मटल्यावांचून त्याच्यानें सुद्धां राहवणार नाहीं.

पहिला मारेकरी—होय. तुह्मी आमची खात्री करून दिली खरी.

मानाजी०—खात्री करून दिली एवढेंच नव्हे. तर त्याच्या पुढलीही गोष्ट मी तुह्मांला सुचविली होती. आणि तिचाच आतांच्या बैठकीला आपल्याला विचार करायचा आहे. त्याचा सूड उगविण्याचा विचार तुमच्या मनांत येऊं नये इतका सहनशीलपणा तुमच्या अंगांत भरला आहे काय? ज्यानें तुमची अशी मरणांतिक अवस्था करून सोडली आणि ज्यानें तुमच्या पोरांबाळांना जन्माची भीक मागायला लाविलें त्या ह्या साधुपुरुषासाठीं आणि त्याच्या कारस्थांसाठीं देवापाशीं दुवा मागतां! कोण खुळसट धर्मवेडेपणा हा!

पहिला मारेकरी—महाराज, आह्मी कसे झालों तरी मनुष्य आहों.

मानाजी०—मनुष्यजातींत तुम्ही उत्पन्न झालां आहां एवढ्यावरूनच ह्मणायचें असेल तर तुह्मी मनुष्य आहां खरे. पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं. तुह्मी मनुष्य आहां, पण कोणत्या दर्जाचे आणि कोणतें काम उठवण्याची तुमच्या अंगांत धमक आहे हें मला सांगा. ह्मणजे मी तुह्मांला त्याप्रमाणें काम सांगेन. मी सांगितलेली कामगिरी जर तुह्मी बजाविली तर त्या योगानें तुमच्या शत्रूचा संहार होईल हें एक. आणि दुसरें तुह्मी माझ्या जिवाचे

कलिजे व्हाल. तो जिवंत आहे तोंपर्यंत मला मुळींच चैन पडत नाहीं. पण तो मेला म्हणजे मी अगदीं निर्धास्त झालों.

**दुसरा मारेकरी**—सरकार, ह्या जगांतील गचक्यांनीं आणि धरमधक्क्यांनीं मला इतकें डवचून सोडलें आहे कीं त्याचें उट्टें काढण्याकरितां मी काय पाहिजे तें करायला तयार आहें.

**पहिला मारेकरी**—आणि ह्याच्याप्रमाणें मी ही ह्या संसारांतील यातनांनीं अगदीं वैतागून गेलों आहें. आतां कांहीं माझ्यानें धीर निघत नाही. माझा निश्चय झाला आहे कीं नशीबाशीं शेवटचें झगडून एकदा काय तो सोक्षमोक्ष करून घ्यावा.

**मानाजी०**—तुम्हां दोघांनाही माहीत आहे कीं व्यंकोजीराव हा तुमचा दुस्मान आहे.

**दुसरा मारेकरी**—होय सरकार.

**मानाजी०**—तो जसा तुमचा दुस्मान आहे तसाच माझाही पण आहे. पण त्याचें माझें इतकें हाडवैर आहे कीं तो जिवंत आहे तोंपर्यंतचा प्रत्येक क्षण माझ्या अंतःकरणावर तरवारीचे घाव घालीत आहे असें मला वाटतें. आतां आपल्या सत्तेच्या जोरावर मला उघड उघड जरी त्याला धुळीला मिळवून देतां येईल तरी पण मला तसें करून उपयोगीं नाहीं. कारण कांहीं मंडळी त्याचे आणि माझे असे दोघांचे ही स्नेही आहेत. तेव्हां त्यांचें मन दुखविणें मला प्रशस्त वाटत नाहीं. तेव्हां आंतून त्याचा नाश करवून बाह्यात्कारी मला त्याच्यासाठीं रडून दाखविलें

पाहिजे. म्हणून मला ह्या कामांत तुमची मदत पाहिजे. अनेक महत्त्वाच्या कारणांकरितां ही गोष्ट अगदीं बिनबोभाट उरकून टाकणें जरूर आहे.

दुसरा मारेकरी—महाराज, आपला हुकूम बजावण्याला आह्मी तयार आहों.

पहिला मारेकरी—मग त्या कामांत आमचा जीव गेला तरी हरकत नाहीं.

मानाजी०—आतां तुमच्या अंगांत खरें पाणी चमकूं लागलें. तुह्मीं कोठें लपून रहावें आणि बरोबर कोणच्या वेळीं हें काम उरकून घ्यावें ह्याबद्दल नक्की माहिती मी तुह्मांला एका घटकेच्या आंत देतों. हें काम आजच्या रात्रीं आणि राजवाड्यापासून अगदीं लांब एकीकडे कुठे तरी उरकून टाकलें पाहिजे. लक्षांत ठेवा कीं यांत माझा कांहीं संबंध आहे असें मात्र कोणाला वाटतां कामा नये. आणि एकदा जें काम हातांत धरलें त्यांत व्यंग राहतां कामा नये ह्या साठीं व्यंकोजीरावाचा तो गुलाब त्याचेंही त्या काळोखांत चंदन उडालें पाहिजे. तोहि त्यावेळीं आपल्या बापाबरोबर असेलच. बापाचा खून मला जितका जरूर आहे तितकाच त्याच्या त्या कारट्याचाही आहे. तुह्मी एकीकडे जाऊन आपापसांत काय तें ठरवा. हा मी आलोंच इतक्यांत.

दुसरा मारेकरी—आमचा निश्चय तर होऊन चुकला आहे.

मानाजी०—ठीक आहे. तुह्मी जरा आंत बसा तों मी आलोंच.

[ मोरेकरी जातात. ]

ठरलें तर. व्यंकोजीराव! तुझ्या आत्म्याला जर स्वर्गप्राप्ति व्हायची असेल तर ती आज रात्रींच होणार.

[ जातो ]

## प्रवेश २ रा.

**स्थल**--पूर्वींचें. दुसरा दिवाणखाना.

( दर्याबाई आणि एक चाकर प्रवेश करितात. )

**दर्या**०–व्यंकोजीराव गेले काय ?

**चाकर**–होय, बाईसाहेब. पण रात्रीं ते परत येणार आहेत.

**दर्या**०–तिकडे जाऊन सांग कीं फुरसत असेल तर मला आपल्याशीं थोडेंसें बोलायचें आहे.

**चाकर**–होय बाईसाहेब.

[ जातो ]

**दर्या**०–जेथें आपल्या मर्जीप्रमाणें एखादी गोष्ट घडून येते पण मनाचें समाधान होत नाहीं तेथें आपल्या पदरचें सर्व खर्चून वेंचून आपल्या पदरांत अखेरीस फायदा ह्मणून कांहींच पडत नाहीं. पूर्वींची स्थिति सोडून नवीन स्थितींत जायचें आणि तेथें ह्या नवीन स्थितींतील आनंद मला चिरकाळ लाभेल कीं नाहीं ही विवंचना करीत बसायचें ह्यापेक्षां आपल्या पूर्वस्थितींत राहणें हेंच बरें.

[ मानाजीराव प्रवेश करतो. ]

कसें काय ? आतांशा असें काय अगदीं एकांतवासांत असायचें असतें ? भलभलत्या दुःखदायक कल्पना तुमच्या मनांत सदासर्वदा अशा कां

घोळत असतात? दमाजीबरोबरच त्याच्याबद्दलचे विचार देखील नाहींसे नकोत का व्हायला? ज्या गोष्टीला कांहीं उपाय नाहीं त्याची काळजी करून तरी काय हंशील? झालें तें झालें.

**मानाजी**०—आपण सापाची शेपटी मात्र तोडली. त्याला ठार मारलें नाहीं. तो आतां सावध होऊन हळुहळु आपल्याजवळ येत आहे. आणि आपल्या मनांत त्याच्याविषयीं कितीही द्वेष असला तरी आतां त्याच्या भीतीनें आपल्याला थरथर कांपत बसावें लागत आहे. अन्न गोड लागत नाहीं. सुखाची झोंप मिळत नाहीं. रात्रीचीं भयंकर स्वप्नें पडून अंगाला थरकांप सुटतो. ह्यापेक्षां ह्या जगांतील सर्व वस्तूंच्या संबंधरूपी शृंखळा तटातट तोडून टाकून स्वर्गलोक आणि मृत्युलोक ह्यांचा नाश करणें हें सुद्धां बरें. अंतःकरणाला हजारों वेदना होत असतांना तसेंच ह्या कष्टमय आनंदाच्या मोहांत राहण्यापेक्षां हें राज्यपद मिळविण्याकरितां मी ज्या दमाजीला मारलें त्याच्या प्रमाणेंच आपणही मरणें हें फार चांगलें. ह्या जगांत क्षणोक्षणीं होणारा संताप सोसून आतां दमाजी आपल्या थडग्यांत मोठ्या सुखानें झोंप घेत पडला असेल. राजद्रोहापासून त्याचें जें कांहीं अतिशय वाईट व्हायचें तें आज होऊन चुकलें आहे. शस्त्रप्रहार, विषप्रयोग, फंदफितुरी, किंवा परचक्र ह्यांपैकीं कशाच्यानेंही इतःपर त्याच्या निद्रेचा भंग करवणार नाहीं.

दर्या०—हें काय बाई ? मुद्रा अगदीं कावरी बावरी झालेली दिसते आहे. ती जरा स्थिर करा. आणि आज रात्रीं मेजवानीला मंडळी आपल्या घरीं जमली म्हणजे त्यांत चांगले हंसून खेळून वागा.

मानाजी०—प्रिये, मी तर असा वागेनच. पण तुलाही असेंच वागलें पाहिजे. तूं व्यंकोजीरावाचें कांहीं कमी पडूं देऊं नको. आणि तो आला म्हणजे त्याला या बसा करून तूं आपल्या आनंदी मुद्रेनें आणि गोडगोड भाषणानें त्याचा जरा विशेष मान ठेव.—आपला मोठेपणा बाजूला ठेवून ह्या लोकांची मर्जी संपादन करून घेणें जोंपर्यंत आपल्याला भाग आहे आणि आपली मुद्रा नेहमीं आनंदी ठेऊन आपल्या अंतःकरणांत काय चाललें आहे तें दुसऱ्यापासून छपवणें जोंपर्यंत भाग आहे तोंपर्यंत आपलें वैभव शाश्वत कसलें म्हणायचें!

दर्या०—पुरे झालें हें असलें बोलणें आतां.

मानाजी०—तुला काय सांगूं! माझ्या हृदयाला हजारों विंचू फडाफड नांग्या मारीत आहेत. तुला ठाऊकच आहे कीं व्यंकोजीराव आणि त्याचा कारटा तो गुलाब हे अद्याप जीवंत आहेत.

दर्या०—बरें पण ते कांहीं अक्षयी जगणार नाहींत.

मानाजी०—दुःखांत सुख मानायला ऐवढीच काय ती जागा आहे.—त्यांच्यावर शास्त्र चालेल.—तर मग आतां तूं खुशाल आनंदांत बसून रहा. पाकोळ्या रात्रीच्या प्रहरीं आपल्या घरट्यांत जाण्यापूर्वीं आणि वेताळाच्या हांकेसरशीं भुतें खेतें नाचूं लागण्याच्या पूर्वीं आज एक अतिशय भयंकर कृत्य घडून येणार आहे.

**दर्या०**-असें काय—योजिलें तरी काय आहे?

**मानाजी०**-छे आधीं नाहीं सांगायचें. तें झाल्या वर देखील तूं त्याची तारीफ केल्यावांचून तुला कांहीं नाहीं सांगायचें. कारण त्या योगानें तुझी उत्सुकता कमी होईल.—हे तिमिरमय रात्रि, चल ये झटकन् आणि ह्या बिचाऱ्या दिनमणीला तूं आपल्या कृष्ण वस्त्रांनीं गुंडाळून टाक. आणि ज्याच्या भीतीनें माझ्या रक्ताचें पाणी होऊन चाललें आहे त्याचें जीवितबंधन तूं आपल्या क्रूर आणि अदृश्य हातांनीं तोडून त्याचे तिळा एवढे तुकडे तुकडे करून टाक.—प्रकाश मंद होत चालला. कावळे आपल्या घरट्यांकडे परतूं लागले. दिवसाच्या सर्व चांगल्या वस्तु नाश पावत आहेत. आणि रात्रीच्या अंधकारांत क्रूर कृत्यें करणारे आपल्या सावजांवर झडप घालण्यासाठीं तयारी करीत आहेत.—तुला माझ्या बोलण्याचें आश्चर्य वाटतें आहे. पण जरा धीर धर.—अन्यायाच्या पायावर रचलेल्या इमारतीला अन्यायानेंच ज्यास्त मजबुती येते. पण तुझी मला ह्या कामांत मदत पाहिजे. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**-पूर्वीचें. मैदान.

( तिघे मारेकरी प्रवेश करितात. )

**१ ला मारे०**-आह्मांला येऊन मिळण्याविषयीं तुला कोणी हुकूम दिला?

**३ रा मारे०**-मानाजीरावांनीं.

**२ रा मारे०**-आपण आपलें काम कसें करायचें हें हा अगदीं बरोबर आपल्याला दाखवून देत आहे. तेव्हां ह्याच्यावर बेफिकीरपणानें विश्वास ठेवायला कांहीं हरकत नाहीं.

**१ ला मारे०**-तर मग ये, आमच्या जोडीला उभा रहा ये.—अजून पश्चिमेच्या अंगाला थोडथोडे किरण दिसत आहेत. प्रवासी लोक रात्र होईल या भीतीनें लवकर लवकर चालून आपआपल्या मुक्कामाला जात आहेत आणि आपण ज्याची वाट पहात आहों तोही आतां जवळ आला असेल.

**३ रा मारे०**-ऐका.घोड्याच्या टापा ऐकूं येत आहेत.

**व्यंकोजी**-( आंतून.) कोण आहे रे तिकडे? एक वत्ती पेटवून आणा पाहूं.

**२ रा मारे०**-तोच रे तोच हा.-आजच्या मेजवानीला बोलावलेले बाकीचे लोक आधींच किल्ल्यांत गेले आहेत. तेव्हां आतां कोणी यायची भीति नाहीं.

**१ ला मारे०**-ह्याचे घोडे कोठें गेले?

**३ रा मारे०**-ते एक मैलावर मागें राहिले असावेत. कारण त्याची—त्याचीचशी काय—सगळ्यांचीच अशी वहिवाट आहे कीं येथून राजवाड्यापर्यंत चालत जावयाचें.

( व्यंकोजीराव आणि गुलाब प्रवेश करितात. )

**३ रा मारे०**-तोच रे तोच हा.

**१ ला मारे०**-संभाळा आतां.

**व्यंकोजी०**-आज रात्रीं पाऊस पडेलसें वाटतें.

**१ ला मारे०**-रात्र कशाला पाहिजे ? हा आतांच आला पहा. ( व्यंकोजीरावावर प्रहार करितो. )

**व्यंकोजी०**-दगा रे दगा ! वाळ गुलाब ! पळ रे पळ ! तूं ह्याचा सूड घे.—अरे हरामखोरा ! ( व्यंकोजीराव मरतो व गुलाब पळून जातो. )

**३ रा मारे०**-दोहोंपैकीं एकच मुर्दा पडला आहे. तो कारटा पळून गेला असें दिसतें.

**२ रा मारे०**-आपण आपली कामगिरी अर्धवट बजाविली.

**१ ला मारे०**-बरें असो. चला आतां जाऊं या. आणि झालेली हकीकत त्यांना कळवूं ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**-राजवाड्यांतील दरबाराचा दिवाणखाना.

[ मानाजीराव, दर्याबाई, राणोजी, लक्ष्मणसिंग व इतर सरदार आणि हुजरे प्रवेश करितात. ]

**मानाजी०**-सर्वांनीं आपापल्या दर्जाप्रमाणें बसावें. अथवा कोठेंही बसलां ह्मणून काय झालें ? मी आहेंच आपला समाचार घ्यायला.

**सरदार**-किती गोड स्वभाव हा !

**मानाजी०**-आणि मी देखील तुमच्या पंक्तीला येऊन बसतोंच.

( दरवाजापाशीं पहिला मारेकरी प्रवेश करितो. )

**मानाजी०**-अरे तुझ्या तोंडावर रक्त उडालेलें दिसतें आहे.

**मारे०**—सरकार तें त्र्यंकोजीरावाचें आहे.

**मानाजी०**—तो येथें येण्यापेक्षां त्याचें रक्त येथें आलें हें फार चांगलें. त्याचा निकाल लाविलासना ?

**मारे०**—सरकार, त्याची गर्दन छाटून टाकली.

**मानाजी०**—भले शाबास, गळे कापणारांत तुझा पहिला नंबर आहे. तरी पण त्या गुलाबाचा गळा ज्यानें कापिला असेल त्याची शाबास खरी. जर तूं हें काम बजाविलें असशील तर तुझ्या सारखा दुसरा माणुसच्च नाहीं असें ह्मटलें पाहिजे.

**मारे०**—पण सरकार, गुलाब आमच्या हातून निसटून गेला.

**मानाजी०**—( आपल्याशीं ) तर मग फिरून माझें डोकें भणभणायला लागलें. गुलाब मेला असता ह्मणजे माझ्या सुखाला कांहीं कमी नव्हतें. पर्वताप्रमाणें माझी सत्ता स्थिर झाली असती. आणि अंतरिक्षांत वारा ज्याप्रमाणें अव्याहत फिरतो त्याप्रमाणें माझी सत्ता चोहोंकडे अव्याहत चालली असती. पण आतां पाहिलें तर माझी स्थिति एखाद्या तुरुंगांत घातलेल्या किंवा पाय तोडून टाकलेल्या मनुष्याप्रमाणें झाली आहे. आतां तो गुलाब येऊन माझें राज्य बळकावील कीं काय अशी शंका आणि भीति माझ्या मनाला रात्रंदिवस त्रास देणार.—पण त्र्यंकोजीरावाचा तरी अगदीं निकाल लागलाना !

**मारे०**—होय सरकार, खड्यांत त्याला पुरून देखील टाकलें, त्याच्या डोक्यावर वीस पंचवीस जखमा अशा भल्या जबरदस्त झाल्या आहेत कीं

त्यांतल्या अतिशय लहान जखमेनें देखील त्याचा प्राण गेला असता.

**मानाजी**०–ह्या कामाबद्दल तुला कांहीं तरी बक्षीस दिलें पाहिजे.—हा वृद्ध सर्प तर मरण पावलाच. आतां त्याचें पिलूं पळून गेलें आहे. त्याच्या अंगांत सृष्टिक्रमाप्रमाणें कांहीं काळानें जहर उत्पन्न होईल हें खरें. पण सध्यां तर त्याला दांत नाहींत.—तूं आतां जा. उद्यां फिरून तूं माझी गांठ घे. ( मारेकरी जातो. )

**दर्या**०–असें आपण उद्विग्न काय व्हायचें आहे ? लोकांना आपल्या घरीं मेजवानीला बोलवायचें आणि त्यांना असें खोळंबून ठेवायचें हें चांगलें का ? अशापेक्षां ज्यांनीं त्यांनीं आपापल्या घरीं जेवणें काय वाईट?

**मानाजी**०–तूं मला ह्याची आठवण केलीस हें फार बरें झालें. हं तुम्ही बसूं लागा.

**लक्ष्मण**०–महाराजांनीं पण येऊन बसावें.

[ व्यंकोजीरावचें भूत मानाजीरावाच्या पाटावर येऊन बसतें.]

**मानाजी**०–आपल्या व्यंकोजीरावांची स्वारी जर या ठिकाणीं असती तर आपला आनंद अगदीं शिखराला जाऊन पोंचला असता. वाटेंत कांहीं हरकत आल्यामुळें ते येथें वेळेवर आले नाहींत असें मला मुळींच वाटत नाहीं. ते मुद्दाम आले नाहींत.

**राणोजी**०–त्यांनीं येतों असें वचन दिलें असून अखेरीस ते आले नाहींत हें चांगलें नाहीं. बरें ते नाहीं आले तर नाहीं आले. महाराजांनीं तरी आम्हांला आतां आपल्या पंक्तीचा लाभ द्यावा.

**मानाजी०**–सगळ्या जागा भरल्या आहेत.

**लक्ष्मण०**–सरकार, ही येथें आपल्या करतां जागा राखून ठेवली आहे.

**मानाजी०**–कोठें ?

**लक्ष्मण०**–ही येथें सरकार.

**मानाजी०**–कोणाचें काम हें ?

**सरदार**–सरकार, कोणतें काम आपण ह्मणतां ?

**मानाजी०**–मी हें कृत्य केलें असें तुला ह्मणतां यावयाचें नाहीं. रक्तानें भरून गेलेले हे तुझे केस अशा रीतीनें पिंजारून तूं माझ्याकडे पाहूं नकोस.

**राणोजी**–आज सरकारांची तब्येत ठीक दिसत नाहीं.

**दर्या०**–बसा, बसा, तुह्मी स्वस्थ बसा. इकडे लहानपणापासूनच अशी सवय आहे. त्यामुळें पुष्कळ वेळां त्यांचें असें होतें कुणी उठायला नको कांहीं. हा ह्यांचा झटका थोडक्याच वेळांत नाहींसा होईल आणि लवकर शुद्धीवर येतील. तुह्मी जर ह्यांच्याकडे फार लक्ष देऊं लागलां तर त्यांना राग येऊन त्यांचा संताप अधिक वाढेल. तेव्हां तुह्मी स्वस्थ बसा. ह्यांच्याकडे तुम्ही बिलकुल लक्ष देऊं नका.—हा मर्दपणा वाटतें?

**मानाजी०**–अलबत मर्दपणा. नाहीं तर समंधाला सुद्धां ज्याच्याकडे पाहून कांपरें सुटेल त्याच्याकडे मला पाहवतेंच ना.

**दर्या०**–वाः वाः फार मोठा मर्दपणा ! तुमच्या मनांतल्या भीतीचेंच हें चित्र. दमाजीला मारा म्हणून

सांगणारी जशी कय्यार त्यांतलेंच हें. अहाहा ! किती भितां आणि किती दचकतां. भुतांच्या गोष्टी ऐकून जशी एखादी लहान पोरगी भिते तसे तुह्मी काय भितां ! ह्याची लाज कशी वाटत नाहीं ! मुद्रा अशी पालटतां काय !

**मानाजी**०—तें पहा. पहा पहा ! तिकडे पहा ! आतां तूं काय ह्मणशील?—तूं माना डोलव किंवा पाहिजे असल्यास बोलूं देखील लाग. मला त्याची मुळींच भीति नाहीं.—जमिनींत गाडून टाकलेलीं माणसें जर तेथून उठून अशीं माघारीं येऊं लागलीं तर यापुढें गिधाडांच्या चोंचीनें त्यांचे लचकेच तोडून खाववले पाहिजेत. [ भूत नाहींसें होतें. ]

**दर्या**०—मूर्खपणानें असे गर्भगळित कसे होऊन गेलां ?

**मानाजी**०—खरोखर मी त्याला येथें पाहिलें.

**दर्या**०—असें भलभलतें बोलायची लाज तरी कशी वाटत नाहीं!

**मानाजी**०—खुनाच्या विरुद्ध मनुष्यांनीं प्रतिबंध करून ठेवण्याच्या पूर्वीं आणि पाठीमागूनही कानांनीं ऐकणार नाहींत असे भयंकर रक्तपात झालेले आहेत आणि खून पडलेले आहेत. आणि आजपर्यंत एकदा माणसाचें डोकें ठेंचून टाकलें ह्मणजे तो मरत असे आणि तेथेंच सगळा ग्रंथ समाप्त होई. पण हल्लीं हीं ठार झालेलीं माणसें—त्यांच्या डोक्यावर झालेल्या वीस पंचवीस जखमांतून रक्त वहात आहे अशींच्या अशींच फिरून दृष्टीस पडतात आणि

आमच्या जाग्यावर येऊन बसतात हें त्या खुनापेक्षां देखील फार भयंकर !

दर्या०—ही मंडळी तुमची वाट पहात आहेत.

मानाजी०—मला त्यांची अगदींच आठवण नव्हती.—माझी ही स्थिति पाहून तुह्मी असे घाबरूं नका. मला ही चमत्कारिक खोड लागली आहे. ज्यांना ही माहीत आहे त्यांना ह्याचें कांहींच वाटत नाहीं. तुम्ही बसा आतां. मीही आपल्या जागेवर येऊन बसतों. त्र्यंकोजीराव येथें नाहींत त्यामुळें मला अगदीं चुकल्याचुकल्यासारखें झालें आहे. ते येथें असते तर बरें झालें असतें. ( भूत फिरून प्रवेश करितें. ) जा, चालता हो. माझ्या दृष्टीसमोर उभा राहूं नकोस. —हे धरणि, ह्माला तूं आपल्या पोटांत दडपून ठेव.— तुझीं हाडें मांसानें वेष्टित नाहींत. तुझ्या अंगांतील रक्त उष्ण नाहीं. आणि जे डोळे वटारून तूं माझ्याकडे पाहत आहेस त्या डोळ्यांत पाहण्याची शक्ति मुळींच नाहीं.

दर्या०—आज तुह्मी सगळ्यांच्या आनंदांत विरजण घातलें आणि तुह्मी आपल्या चमत्कारिक कृत्तीनें सगळ्या मंडळीचा विरस करून टाकिला.

मानाजी०—उन्हाळ्यांतल्या ढगांचें जसें आपल्याला कांहीं वाटत नाहीं तसेंच असल्या गोष्टी घडून आल्या तरी त्याचें विशेष आश्चर्य वाटूं नये हें संभवेल तरी कसें ? मी इतका शूर असून हा असला देखावा पाहून माझ्या तर तोंडचें पाणी पळालें. आणि

तुमच्या मुद्रेवर भीतीचें काडी इतकेंही चिन्ह दिसत नाहीं हें कसें ?

**राणोजी** —सरकार तुमच्या काय दृष्टीस पडलें ?

**दर्या०**—मी तुह्मांला हात जोडतें. त्यांच्याशीं आतां ज्यास्त बोलूं नका. त्यांची तब्येत अधिकाधिकाच बिघडत चाललेली दिसतें. आणि तुह्मी त्यांना प्रश्न विचारलेत ह्मणजे त्यांचें डोकें ज्यास्तीच भडकेल. तेव्हां तुह्मी आतां एकदम आपापल्या घरीं जा. ह्यांनीं पुढें त्यांनीं मागें असें करीत वेळ दवडूं नका. एकदम चालते व्हा येथून कसे.

**लक्ष्मण०**—येतों तर.

**दर्या०**—जा. ( सर्व सरदार व हुजरे जातात. )

**मानाजी०**—तो माझा बळी घेणार! सारें जग असें ह्मणतें कीं खुनाला खून पडलाच पाहिजे. गुप्त खून उघडकीस आणण्याकरितां असें ह्मणतात कीं दगड देखील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात, आणि झाडांना देखील वाचा फुटते. आणि छपून बसलेल्या खुनी माणसाचा शकुनाच्या जोरावर छडा लागलेला आहे.—आतां किती रात्र उरली असावी?

**दर्या०**—बहुतेक उजडायला झालें आहे.

**मानाजी०**—मी बोलाविलें असतां मुकुंदराव येणार नाहीं ह्मणतो ह्यांत त्याचा काय बरें उद्देश असावा ?

**दर्या०**—त्याला बोलावणें पाठविलें होतें कीं काय ?

**मानाजी०**—पाठविणार आहें. पण मी कर्णोपकर्णी ही बातमी ऐकिली. कारण त्यांच्या पैकीं प्रत्येकाच्या घरीं माझा गुप्त हेर ठेवलेला आहेच.—उद्यां मी त्या

चेटक्यांची गांठ घेण्याला जाणार. आणि तेथें गेलों ह्मणजे त्या कांहीं तरी ज्यास्ती सांगतीलच. जें काय पुढें माझें व्हायचें असेल तें मी त्यांच्यापासून बऱ्या वाईट उपायांनीं विचारून घेणारच. माझ्या हितापुढें मी आतां कशाचीहि पर्वा करणार नाहीं. लोकांच्या मुंड्या मुरगळण्याच्या कामांत मी इतका दूरवर गेलों आहें कीं आतां मागें परत फिरणें आणि पुढें जाणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच त्रासदायक आहेत. माझ्या डोक्यांत कैक विलक्षण गोष्ठी खेळत आहेत. आणि त्या सर्वांचा फारसा विचार करीत न बसतां त्या एकदम घडवून आणल्या पाहिजेत.

**दर्या०**—जर आपल्याला कांहीं वेळ झोंप लागेल कीं नाहीं तर आपल्या प्रकृतीला बरें वाटेल.

**मानाजी०**—चला आपण निजायला जाऊं. हा रक्तपात करण्याचा अजून आपल्यावर पहिलाच प्रसंग आहे ह्मणून जरा भीति वाटते. सवईनें आपलें मन ह्या कामांतही घटून जाईल. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ९ वा.

**स्थळ**—परशुपुर. राजवाड्यांतील दिवाणखाना.

( लक्ष्मणसिंग आणि दुसरा एक सरदार प्रवेश करितात. )

**लक्ष्मण०**—मी मागें तुमच्यापाशीं जे उद्गार काढले होते ते आणि तुमचे विचार अगदीं एक जमले. ह्यावरून पुढलें सगळें धोरण आपल्याला बरोबर बांधतां

येतें. सारांश, मोठ्या विलक्षण गोष्टी घडून येत आहेत. पहा, आपल्या दमाजीमहाराजांवर मानाजीरावांची किती तरी प्रीति होती. पण पहावें तों दमाजीराव प्राणाला मुकलेले. तसेंच आपल्या त्या शूर त्र्यंकोजीरावांना काय ह्मणे बाहेरून यायला रात्र झाली आणि त्यांचा मुलगा गुलाब यानेंच त्यांना ठार केलें! आणि याचें कारण काय तर तो गुलाब फरारी झाला. फार रात्रीचें बाहेर फिरतां देखील उपयोगीं नाहीं. मल्हारराव आणि धनाजी ह्यांनीं ह्मणे आपला बाप मारून टाकला! हें त्यांचें राक्षशी कृत्य नव्हे असें कोण ह्मणेल ? अत्यंत नीच काम! तें पाहून अहाहा! आपल्या मानाजीरावांना किती बरें खेद झाला! तें भयंकर कृत्य पाहिल्याबरोबर त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. आणि दारू पिऊन घोरत पडलेल्या त्या दोघां चांडाळांचे त्यांनीं तुकडे तुकडे करून टाकले. हें त्यांनीं मोठ्या शूरपणाचें आणि शहाणपणाचें काम केलें असें नाहीं का तुह्मांला वाटत? कारण ते जगते आणि ह्मणते कीं आह्मो नाहीं खून केला तर मग कोणाचें डोकें खवळून गेलें नसतें ? मला तर वाटतें मानाजीरावांनीं जें केलें तें फार उत्तम केलें. आणि दमाजीचे मुलगे जर त्यांच्या हातीं सांपडले असते—देव करो आणि ते त्याच्या हातीं न सांपडोत!—तर पितृवधाचें प्रायश्चित्त कसें काय खडतर असतें हें त्यांनीं त्यांना चांगलें दाखविलें असतें. तसेंच त्या गुलाबाला देखील प्रायश्चित्त मिळालें पाहिजे होतें. पण तें जाऊं द्या.—मी असें ऐकितों कीं कांहीं बोलाचाली झाल्यावरून आणि त्या जुलमी

राजाच्या येथें त्या दिवशींच्या मेजवानीला मुकुंदराव गेला नव्हता म्हणून त्याच्यावर इतराजी झाली आहे. तुम्हांला माहीत आहे का मुकुंदराव कोठें आहे तें?

**सरदार**–दमाजीला मारून त्याचें राज्य ह्या जुलमी राजानें छिनावून घेतल्यापासून त्या दमाजीचा मुलगा मल्हारराव मगधपुरांत जाऊन राहिला आहे. आणि तेथल्या राजानें त्याची अशी बरदास्त ठेविली आहे कीं त्याजवर दुर्दैवाचा फेरा आला आहे तरी त्याचा मानमरातब कांहीं इतकाही कमी झाला आहे असें तो राजा त्याला भासूं देत नाहीं. त्या राजाची मदत मागण्याकरतां मुकुंदराव तिकडे गेला आहे. देव करो आणि हा त्याचा हेतु सफल होवो. त्याची मदत मिळाली तर पोटभर अन्न खायला मिळेल आणि रात्रीची स्वस्थ झोंप लागेल; एकीकडे मेजवान्या आणि एकीकडे खून ही स्थिति बंद होईल; आणि राजावरकांति राजनिष्ठा दाखविण्याचा आणि तोंडपुजेपणानें मानमरातब मिळविण्याचा प्रसंग चुकेल. ही वातमी ऐकून मानाजीरावाच्या अंगाचा अगदीं संताप होऊन गेला आहे आणि तो लढाईच्याही तयारीला लागला आहे.

**लक्ष्मण०**–त्यानें मुकुंदरावाकडे बोलावणें पाठविलें होतें काय?

**सरदार**–होय. पण 'मी येत नाहीं' असा त्याच्या जासुदाला जबाब मिळाला. तेव्हां जासूद पाठमोरा होऊन आपल्याशींच गुणगुणला कीं 'तुह्मी असें उत्तर देतां खरें, पण ह्याचा परिणाम तुह्मांला पुढें भोगावा लागेल.'

लक्ष्मण०—ह्यावरून मुकुंदरावानें फार जपून वागलें पाहिजे. आणि त्यानें होईल तितकें दूर रहावें ह्यांतच शहाणपणा आहे. कोणी तरी जासूद मगधदेशांत पाठवून त्याला जर सर्व खबर कळवली तर त्याची ह्या चांडाळाच्या त्रासांतून सुटका होऊन ह्या हतभाग्य देशांचें नशीब लवकर उघडेल.

सरदार—माझीही अशीच इच्छा आहे.

( सर्व जातात. )

## अंक ४ था.

### प्रवेश १ ला.

स्थळ—एक गुहा. मध्यभागीं कढईखालीं जाळ पेटलेला दिसतो. व मेघगर्जना होत असतां तिघी चेटक्या प्रवेश करितात.

१ चे०—हं. कढईखालतीं चांगला जाळ पेटूं द्या. कढईंत पहिल्यानें दगडाच्या फटींत महिनेच्या महिने बसून राहिलेल्या विषारी बेडकाला शिजवा. बेडुकमामा डरांव डरांव, कढईच्या तेलांत मरांव मरांव.

सर्व—दक्षिण उत्तर, कोल्हे कुत्तर, छू छू मंतर, चलाव् चलाव्! पेटला जाळ, तापली कढई, ढवळा ग आतां ढवळा ग.

२ चे०—कावळ्याचा डोळा, सरड्याची तंगडी, ह्मातारी लंगडी, ढकला यांत! बेडकीचें बोट, विंचवाची नांगी, मणभर वांगीं, ढकला यांत! कुत्र्याची जीभ, नागाची फडा, डाळीचा वडा, ढकला यांत! वाघाच्या

रक्ताची, कढवा कढी, माणसांचीं मढीं, ढकला यांत!

सर्व–दक्षिण उत्तर, कोल्हे कुत्तर, छू छू मंतर, चलाव् चलाव्! पेटला जाळ, तापली कढई, ढवळा ग आतां ढवळा ग.

३ चे०–सुसरीची पाठ, लांडग्याचे दांत, चोराचे हात, ढकला यांत! अवसेच्या रात्रीं, तोडलेली वेल, डुकराचें तेल, ढकला यांत! मुंजाचें डोकें, बाळंतिणीचें हाड, लिंबाचें झाड, ढकला यांत!

सर्व–दक्षिण उत्तर, कोल्हे कुत्तर, छू छू मंतर, चलाव् चलाव्! पेटला जाळ, तापली कढई, ढवळा ग आतां ढवळा ग.

२ ज०–मला मोठी दुर्गंधि येत आहे. यावरून वाटतें कोणी तरी पापी प्राणी इकडे येत आहे. येऊं द्या. कांहीं हरकत नाहीं.

( मानाजीराव प्रवेश करितो. )

मानाजी०–काय ग ए चेटक्यांनो, तुह्मी ह्या मध्यान्ह रात्रीं अशा गुप्तपणानें येथें काय करीत आहां?

सर्व–आह्मी जें कांहीं करतों आहों त्याला नांव गांव कांहीं नाहीं.

मानाजी०–तुमच्या परम पूज्य देवतांची तुह्मांला शपथ आहे. मी तुह्मांला आतां जे जे प्रश्न विचारतों त्यांचीं त्यांचीं उत्तरें तुह्मी दिलींच पाहिजेत. मग तीं तुह्मांला कोणच्याही रीतीनें कळलेलीं असोत. व त्याबद्दल कांहीं झालें तरी हरकत नाहीं. प्रचंड वारा सुटून देवळांचे कळस उलथून पडले, खवळलेल्या समुद्राच्या लाटांनीं सर्व गलबतें बुडून गेलीं, किल्ल्याच्या

तटाच्या भिंती गस्तवाल्यांच्या डोक्यावर कोसळून पडल्या, राजवाडे आणि दुसऱ्या मोठमोठ्या इमारती ह्या सगळ्यांचीं शिखरें कोसळून पायाच्या दगडांवर आपटलीं, फार काय प्रत्यक्ष प्रळयाला देखील नाश करण्याचा कंटाळा आला, तरी हरकत नाहीं. पण मी जें विचारतों त्याचा जबाब मला मिळालाच पाहिजे.

१ चे०—विचार.

२ चे०—तुला काय वाटेल तें विचारून घे.

३ चे०—आह्मी त्या सगळ्यांचीं उत्तरें देऊं.

१ चे०—पण तुझ्या प्रश्नांची उत्तरें आमच्या तोंडूनच पाहिजेत किंवा तीं पिशाचांकडून ऐकण्याची तुझी इच्छा आहे ?

मानाजी०—बरें आहे. त्यांना हांक मारा. तीं तरी कोण आहेत तें मला पाहूं द्या.

१ चे०—ठीक आहे. तर मग आतां ह्या कढईंत डुकराचें रक्त ओतून तुह्मी ढवळायला लागा. मी मंत्र ह्मणून भूतांना हांका मारतें.—चला, यारे साऱ्या भुतांनों! हुलुलुलुलुलु! जखणी, हडळी, खवीस, मुंजे, चेडे, पीर, ब्रह्मसंबंध, चला सारे! चलाव् चलाव्. बीर हनुमानकी आण, बीर लछमन गोरखनाथकी आण, बीर वेताळकी आण, चलाव् चलव्! गुरूकी सगत, हमारी भगत, स्फुरो मंतर ईश्वरी वाचा, सच्चा गुरूका मंतर साचा, चलाव् चलाव्!

( मेघ गर्जना होते व नंतर शिरस्त्राण घातलेलें एक डोकें दृष्टीस पडतें. )

मानाजी०—अरे तूं कोण आहेस हें मला जरी

माहीत नाहीं तरी मी विचारतों त्याचा जबाब तूं मला दिला पाहिजे.

१ चे०—तुझ्या मनांतून त्याला काय विचारायचें आहे तें त्याला ठाऊक आहे. तूं आतां अगदीं गप्प बैस आणि तो काय ह्मणतो तें ऐक.

**पहिलें भूत**—मानाजीराव ! मानाजीराव ! ! मानाजीराव ! ! ! मुकुंदरावावर तुझें लक्ष असूं दे. त्यापासून तुला भीति आहे. पुरे इतकेंच पुरे. मी आतां जातों.

(अदृश्य होतें.)

**मानाजी**०—तूं कोणीही ऐस. परंतु तुझ्या ह्या इषाऱ्या बद्दल तुझे माझ्यावर फार उपकार आहेत. कारण माझ्या मनांतली भीति तूं बरोबर ताडलीस. तुला आणखी एक गोष्ट विचारायची होती.

**१ चे**०—आतां तूं कितीही हांका मारल्यास तरी तो माघारा येणार नाहीं. पण हें पहा पहिल्यापेक्षां अधिक बलाढ्य असें हें दुसरें भूत दिसूं लागलें.

( मेघगर्जना होते व नंतर रक्तानें भरलेलें असें एक लहान मूल दिसतें. )

**दुसरें भूत**—मानाजीराव! मानाजीराव! मानाजीराव!

**मानाजी**०—मला तीन कान असते तरी ते मी सारे तुझें ह्मणणें ऐकण्याकडेसच लाविले असते.

**दुसरें भूत**०—तूं धीटपणानें आणि दृढ निश्चयानें खुशाल रक्तपात करीत जा. तसेंच मानवी शक्तीला तर तूं मुळींच जुमानीत जाऊं नको. कारण मानवी स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या कोणत्याही मनुष्याच्या हातून तुझ्या केसाला देखील धक्का लागणार नाहीं.

( अदृश्य होतें. )

**मानाजी**०—असें असेल तर, मुकुंदराव, तूं खुशाल जीवंत रहा तुझी भीति बाळगण्याचें मला काय कारण आहे ?—पण असें उपयोगी नाहीं. आतण अगदीं निर्धास्त झालें पाहिजे. आणि त्यासाठीं, मुकुंदराव, तू मेलेंच पाहिजे. मग ह्या काळिजाचें पाणी करून सोडणाऱ्या भीतीला कोण भीक घालतो. मेघगर्जना होत असल्या तरी देखील मी खुशाल झोंप घेत पडेन.

( मेघ गर्जना होते व नंतर हातांत एक लहानसें झाड घेऊन मुकुट घातलेलें एक मूल दिसतें. )

**मानाजी**०—अरे हें काय ! हा एखाद्या राजपुत्रा सारखा कोण बरें दिसत आहे ? आपल्या मस्तकावर राज्यलक्ष्मीचा मुकुट घालणारा हा कोण बरें असावा ?

**सर्व**—तो काय ह्मणतो तें ऐक मात्र. त्याच्याशीं बोलण्याची तुला परवानगी नाहीं.

**तिसरें भूत**—मानाजीराव, तुझा हा सिंहासारखा पराक्रम आणि बेगुमानपणा खुशाल चालूं दे. तुझ्या नांवानें कोण खडे फोडतो, कोण हातपाय चोळतो, तुझ्या विरुद्ध कोण बंड करतो इकडे तूं मूळींच लक्ष देऊं नकोस. त्या भीरवनांतलीं झाडें ह्या देवगडच्या टेकडी पर्यंत चालून आलीं नाहींत तोंपर्यंत, मानाजीराव, तुझा कधींही पराभव होणार नाहीं. ( अदृश्य होतें. )

**मानाजी**०—ही गोष्ट कधींच घडणार नाहीं. त्या अरण्यांतील वृक्षांवर कोणाचा जोरा चालणार आहे ! जमिनींत खोल खोल गेलेलीं तुह्मी आपलीं पाळें मुळें उपटून काढून येथून निघा असा त्या झाडांना हुकूम

करणारा कोण आहे? वा! हें भविष्य तर फारच नामी आहे. त्या अरण्यातील झाडें चालूं लागे पर्यंत माझ्या विरुद्ध कोणच्याही प्रकारचे फंद फितूर होण्याची मुळींच काळजी उरली नाहीं. माझें आयुष्य आहे तेथपर्यंत मला आतां खुशाल नांदायला कांहीं हरकत नाहीं.--तरी पण अजून एक गोष्ट जाणण्याची माझ्या मनाला फार उत्कंठा आहे. हे चेटक्यांनों, जर तुमच्या विद्येच्या जोरानें तुह्मांला सांगतां येण्यासारखें असेल तर व्यंकोजीरावाचे वंशज कोणी ह्या देशाच्या गादीवर बसतील काय हें मला सांगा.

**सर्व**-जें तुला कळलें आहे त्यापेक्षां ज्यास्त कळण्याची इच्छा तूं आतां धरूं नको.

**मानाजी**०-कळलेंच पाहिजे मला हें. मी विचारतों तें सांगूं तर नका कीं तुमच्यावर अनंत दु:खें कोसळलींच ह्मणून समजा. मला हें सांगाच. ती कढई अदृश्य कां होत चालली? आणि हा गलबला कसला ऐकूं येत आहे? (कांहीं वाद्यें वाजतात.)

१ चे०- दाखवा!

२ चे०- दाखवा!

३ चे०- दाखवा!

**सर्व**-दाखवा. पुढें काय होणार आहे तें त्याला आपल्या डोळ्यांनीं पाहूं द्या. आणि तें पाहून त्याच्या अंत:करणाला एकसारखी तळमळ लागून राहूं द्या. चला या रे तुह्मी. भूतांच्या रूपानें येथें येऊन एकदा ह्याच्या दृष्टीस पडा. आणि लागलेच नाहींसे व्हा.

( आठ राजे दृष्टीस पडतात. त्यांपैकीं शेवटच्या राजाच्या हातांत एक आरसा दिसतो. व्यंकोजीराव त्यांच्या मागून येतो. )

**मानाजी**०—अरे व्यंकोजीरावाच्या आणि तुझ्या मध्यें फारच सारखेपणा दिसतो आहे. तूं येथून नाहींसा हो. तुझ्या डोक्यावर असलेला मुकुट पाहून माझ्या डोळ्यांतलि बुबुळें अगदीं करपून जात आहेत.—ह्या दुसऱ्याच्याही डोक्यावर तसलाच सोन्याचा मुकुट दिसतो आहे. आणि ह्याचे केस अगदीं पहिल्याच्या सारखे आहेत.—हा तिसरा तर अगदीं पहिल्या दोघां सारखाच हुबेहुब दिसत आहे.—अग घाणेरड्या अवदसांनों, तुह्मी मला हें कशाला दाखविलें!—अरे अजून चवथा आहेच.—छे! आणखी हा पाहून माझे डोळे अगदीं चकित होऊन गेले. ह्यांची रांग जगाच्या प्रळयापर्यंत चालणार आहे कीं काय कोण जाणें.—आणखी एक!—अरे हा सातवा.—आतां इतःपर मी इकडे मुळींच पहात नाहीं ह्मणजे झालें.—पण हा पहा आठवा आहेच. ह्यानें तर आपल्या हातांत आरसा घेतला आहे. आणि त्या आरशांत आणखी किती तरी राजे दिसत आहेत! ह्यांपैकीं कोणाच्या डोक्यावर दोन दोन मुकुट दिसत आहेत. कोणाच्या हातांत तीन तीन राजदंड दिसताहेत. फार भयंकर देखावा! आतां माझी खात्री झाली कीं हें सगळें खरें असलें पाहिजे. कारण हा रक्तानें थबथबलेला व्यंकोजीराव माझ्याकडे हसत हसत पाहून 'हे पहा माझे वंशज' असें ह्मणून हे मला दाखवित आहे.— काय! हें खरें होणार काय?

१ चे०—होय हें सगळें असेंच होणार. पण! मानाजीराव, तूं असा गांगरून कां गेला आहेस. या ग आपण जरा मौज करूं या, ह्मणजे त्या योगानें ह्याच्या उद्विग्न मनाला जरा आनंद होईल. तुह्मी नाचूं लागा आणि मी या हवेंतून मृदंगाचा ध्वनि निर्माण करतें. ह्या राजाचें आदरातिथ्य करण्यांत आपण कांहीं कमी केलें नाहीं असें ह्याला वाटलें पाहिजे. [ वाद्यें वाजतात व त्या चेटक्या नाचतात आणि नंतर अदृश्य होतात. ]

**मानाजी**०—कोठें आहेत त्या?—काय! त्या नाहींशा झाल्या!—ह्यापुढें पंचांगांतून ही घटका ह्मणजे कुयोगच असें लिहीत गेलें पाहिजे!—कोण आहे रे तिकडे? इकडे ये पाहूं. [ लक्ष्मणसिंग प्रवेश करितो. ]

**लक्ष्मण**०—सरकारची काय मर्जी आहे ?

**मानाजी**०—त्या चेटक्या तुह्मी पाहिल्यात ?

**लक्ष्मण**०—नाहीं सरकार.

**मानाजी**०—तुह्मी उभे होतां त्या बाजूनें त्या आल्या नाहींत काय ?

**लक्ष्मण**०—नाहीं, खरोखरच नाहीं सरकार.

**मानाजी**०—तर मग ज्या या हवेंतून त्या चेटक्या संचार करतात ती खरोखरच बिघडलेली असली पाहिजे. आणि जे कोणी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवतील त्यांना नरकांतच गेलें पाहिजे.—मी घोड्याच्या टापा ऐकिल्या असें वाटतें. त्या कोणाच्या? कोण बरें आलें ?

**लक्ष्मण**०—सरकार, दोघे तिघे इसम घोड्यावर बसून आतांच आले, आणि त्यांनीं अशी बातमी आ-

णली आहे कीं मुकुंदराव मगधदेशांत पळून गेला.

**मानाजी**०–मगधदेशांत पळून गेला?

**लक्ष्मण**०–होय, महाराज.

**मानाजी**०–माझ्या मनांतून जीं अघोर कृत्यें करावयाचीं होतों त्यांची तयारी काळानेंच करून ठेविली आहे. कल्पनेच्या भरारीबरोबर जर आपण काम उरकून घेतलें नाहीं तर हातून कांहींच होत नाहीं, आतां या घटकेपासून डोक्यांत विचार येण्याचा काय तो अवकाश कीं हातांनीं तसें करायला लागलें पाहिजे. आणि मी बोलतों तें खरें करून दाखविण्यासाठीं त्या बाबतींत काय करावयाचें तें ठरल्याप्रमाणें लागलेंच करून टाकूं या. मुकुंदरावाच्या किल्ल्यावर छापा घालून त्याचा मुलूख हस्तगत करून घेतों, आणि त्याची बायको, त्याचीं पोरें, आणि त्याचे हतभागी भाऊबंद ह्या सगळ्यांना तरवारीच्या धारेवर बळी देतों.–एखाद्या मूर्खासारखी ही पोकळ बडबड नव्हे हा विचार डोक्यांतून नाहींसा होण्याच्या पूर्वीच हें कृत्य उरकून टाकलें पाहिजे.—पण आतां ह्या जखणींचें मात्र दर्शन नको.—बरें ते आलेले इसम कोठें आहेत? त्यांच्याकडे मला घेऊन चला पाहूं.

[ सर्व जातात. ]

## प्रवेश २ रा.

स्थळ—परशुपुर. मुकुंदरावाचे किल्ल्यांतलि एक दिवाणखाना.

[ मुकुंदरावाची बायको कमळाबाई, तिचा मुलगा, आणि राणोजी प्रवेश करितात. ]

**कमळाबाई**—येथून पळून जाण्यासारखें येवढें असें त्यांनीं केलें आहे तरी काय ?

**राणोजी**—मी सगळें सांगतों. पण तुह्मी जरा धीर धरा.

**कमळा०**—मी पुष्कळ धीर धरीन. पण त्याचा काय उपयोग? अशा प्रसंगीं त्यांनीं धीर धरायला पाहिजे होता. तो त्यांनीं मुळींच धरला नाहीं. ते पळून गेले हा अगदीं वेडेपणा झाला. आपल्या हातून राजद्रोहाचें कोणतेंही कृत्य झालें नसलें तरी आपणच भ्यायला लागलों ह्मणजे दुसऱ्याला अर्थात् आपल्या बद्दल संशय येतो.

**राणोजी**—मुकुंदरावांनीं ही गोष्ट शहाणपणानें केली किंवा भीतिमुळें केली ह्याबद्दल तुह्मांला कांहींच ह्मणतां यावयाचें नाहीं.

**कमळा०**—शहाणपणानें! शहाणपणाचें नांव सुद्धां नको. आपण पळून जायचें आणि आपली बायको, आपलीं मुलें, आपला वाडा, आपली जहागीर हीं सर्व येथें टाकून द्यायचीं ह्यांत काय शहाणपण? आमची त्यांना मुळींच काळजी नाहीं. मी पाहून ठेविलें आहे त्यांच्या अंतःकरणाला मायेचा जिव्हाळा कसा तो काडी इतका देखील नाहीं. आपल्या घरच्यांतलि

लहानसान चिल्यापिल्यांना बहिरीससाणा नेऊं लागला तर त्यांचीं आईबापें अतिशय क्षुद्र पक्षी असलीं तरी देखील तेथें अगदीं तुटून पडतात. कसलें काय आणि कसलें काय! भीतीनें अगदीं गांगरून गेले. त्या भीतीपुढें आपल्या मुलांबळाची ममता त्यांच्या मनांत सुद्धां आली नसेल. वास्तविक पळून जाण्याला कांहीं कारण नव्हतें. असें असून ते पळालें ह्यांत शहाणपण कसलें आलें आहे!

**राजोणी**—बाई, तुम्हांला मी किती समजून सांगूं? जरा मन आवरून धरा. मुकुंदरावाच्या बद्दल मी तुम्हांला सांगतों कीं ते मोठे उदार, शहाणे, आणि विचारी आहेत. आणि कोणच्या वेळीं कसें वागावें हे त्यांना उत्तम समजतें. ह्या बाबतींत ज्यास्त बोलत। येत नाहीं. पण एवढें लक्ष्यांत ठेवा कीं काळ मोठा कठिण आला आहे. राजद्रोह आपल्या स्वप्नांत सुद्धां नसून आपण राजद्रोही ठरतों. कशाची तरी भीति वाटत असते. पण कशाची हें समजत नाहीं. आणि त्या भीतीमुळें हव्या त्या कंड्या खऱ्या वाटतात. आणि खवळलेल्या समुद्रा मधील गलबताप्रमाणें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे अशी आपल्या मनाची तारांबळ उडून जाते. असो. मी आतां तुमची रजा घेतों. थोडक्या वेळांत मी परत येईन. बाळा देव तुझें कल्याण करो!

**कमळा**०—ह्याला बाप असून एखाद्या पोरक्या पोराप्रमाणें ह्याची अवस्था झाली आहे.—बाळा ते तुला टाकून गेले. आतां तूं कसें करशील? तूं आपला जीव कसा वांचविशील?

मुलगा–अग आई, लहान लहान पाखरें देखील नाहीं का आपलें पोट भरीत तसें मी भरीन.

कमळा०–पाखरें किडे आणि माशा खातात. त्या का तूं खाणार आहेस?

मुलगा–इश्श! तसें नव्हे ग आई. त्यांना जें मिळतें तें जसें तीं खातात तसें मला जें मिळेल तें मी खाईन.

कमळा०– पण बाळा, त्या पाखरांना धरण्या॰ साठीं कोठें जाळीं पसरलेलीं असतात, कोठें झाडांच्या खांद्यांना गोंद लाविलेला असतो, कोठें खड्डे खणलेले असतात, आणि कोठें सापळे लाविलेले असतात. त्यांत तीं लहान लहान पाखरांची पिलें अडकून पडतात. तसा तूं पडलास तर मग बाळा कसेंरे होईल ?

मुलगा–आई, मला त्याची भीति कशाला पाहिजे? गरीब गुरीब पाखरांना धरण्याची कोणी खटपट करीत नाहीं. आई, कांहीं ह्मण, पण मला खास वाटतें कीं माझे बाबा लवकरच परत येतील. आई, माझे बाबा राजद्रोही होते काय ग ?

कमळा०–होय.

मुलगा–आई, राजद्रोही ह्मणजे काय ग?

कमळा०–जो राजनिष्ठेची शपथ वहातो आणि मोडतो तो.

मुलगा–असें जे जे करितात ते सगळे राजद्रोहीच का ?

कमळा०–होय. आणि अशा सगळ्यांना फाशीं द्यायची वहिवाट आहे.

**मुलगा**—तर मग जे शपथा घेतात आणि मोडतात त्या साऱ्यांना फाशीं द्यायचें ?

**कमळा०**—हो, साऱ्यांना हो.

**मुलगा**—आणि ह्यांना कोण फाशीं देणार?

**कमळा०**—जे प्रामाणिक लोक असतील ते.

**मुलगा**—अं:! तर मग शपथ घेऊन ती मोडणारांना कांहींच समजत नाहीं असें म्हटलें पाहिजे. कारण शपथ घेऊन ती मोडणारे लोक इतके पुष्कळ आहेत कीं ते प्रामाणिक लोकांना ठोकून काढून सहज फाशीं देतील.

**कमळा०**—ऐक, उगीच बैस. वेड्यासारखी किती बडबड करतो आहेस. पण बाळा, त्यांच्यावांचून तुझें कसें रे होईल ?

**मुलगा**—बाबा कांहीं आपल्याला टाकून गेले नाहींत. तूं कुठे रडतेस ?

**कमळा०**—काय ग बाई तरी बोलतो आहे हा !

(एक जासूद प्रवेश करतो.)

**जासूद**—बाईसाहेब, तुम्ही मला ओळखीत नाहीं. पण मी तुह्मांला ओळखतों. आणि ह्मणूनच मी तुह्मांला हें सांगायला आलों आहे कीं तुमच्यावर थोडक्याच वेळांत कांहीं संकट गुदरणार आहे. माझ्यासारख्या गरीब माणसाचा सल्ला तुह्मी ऐकाल तर तुम्ही येथें राहूं नये हें बरें. आपलीं मुलेंबाळें घेऊन येथून दुसरीकडे कोठें तरी जा. ही बातमी सांगून तुमच्या मनांत धडकी भरवणें हें फार वाईट आहे हें मी समजतों. पण ह्याच्याहून फार भयंकर प्रसंग तुम-

ऱ्यावर येणार आहे, तो टाळण्यासाठीं मी हें तुह्मांला सांगतों. देव तुमचें रक्षण करो ह्मणजे झालें. मला आतां येथें राहतां येत नाहीं. ( जातो. )

**कमळा०**—मी आतां कोठें तरी पळून जाऊं ? मी अपराध तर कोणताच केला नाहीं.—पण आतां माझ्या लक्षांत आलें कीं, मी ह्या मृत्युलोकांत आहें, आणि येथें पुष्कळ वेळां अपराध करणें हेंच स्तुत्य मानलें जातें, आणि सद्धर्मानें वागणें म्हणजे फार भयंकर तऱ्हेचा मूर्खपणा आहे असें समजतात. शिव! शिव! असें आहे तर मग ' मी अपराध केला नाहीं' असें म्हणण्यांत काय फायदा आहे? हे कोण लोक हे !

( मारेकरी प्रवेश करितात. )

**मारे०**—तुझा नवरा कोठें आहे ?

**कमळा०**—तुझ्या सारख्याच्या हातीं लागणार नाहींत अशा ठिकाणीं ते आहेत.

**मारे०**—तो राजद्रोही आहे.

**मुलगा**—तूं खोटें बोलतोस. हरामखोरा, ते तसे नाहींत.

**मारे०**—काय, हा पोर काय ह्मणतो आहे ? ( त्याला तरवारीनें जखम करतो. ) राजद्रोहाचा अंकुर ह्याच्यांत सुद्धां उगवत होता.

**मुलगा**—आई, ह्यानें मला मारलें ग मारलें. तूं तरी आतां येथून पळून जा. [ मरतो. ]

( खून रे खून असें ओरडत कमळाबाई जाते व मारेकरी तिचा पाठलाग करीत जातात. )

———

## प्रवेश ३ रा.

स्थळ—मगधदेशांतील राजवाड्यासमोर.

[ मल्हारराव आणि मुकुंदराव प्रवेश करितात. ]

**मल्हार०**—चला कोठें तरी एका बाजूला. एखाद्या झाडाच्या सावलींत जाऊन बसूं या. आणि आपल्या अंतःकरणांत जीं दुःखें सांचलीं आहेत तीं एकमेकांना सांगून पोटभर रडूं या. दुसरें काय करायचें ?

**मुकुंद०**—काय करायचें ? शत्रूच्या प्राणाचा घास घेणारी तरवार हातांत धरून आपल्या ज्या जन्मसिद्ध हक्कांची पायमल्ली होत आहे ते आपण परत मिळवूं या. प्रत्येक दिवशीं नवीन नवीन विधवा हंबरडे फोडीत आहेत, नवीन नवीन पोरकीं पोरें आक्रोश करीत आहेत, आणि नवीन नवीन दुःखें आपणांवर कोसळल्यामुळें लोक परमेश्वराची करुणा भाकीत आहेत. आणि ह्या सगळ्या आक्रोशाचा जो प्रतिध्वनि गगनतलापासून उत्पन्न होतो तो ऐकला म्हणजे असें वाटतें कीं आपल्या देशाप्रमाणेंच ह्या आकाशालाही दुःख होत आहे कीं काय कोण जाणें!

**मल्हार०**—ह्या जुलमी राजाला सर्व लोक पूर्वी अतिशय न्यायी ह्मणून समजत असत. दुसऱ्यांचें कशाला? तुमची स्वतःचीही त्याच्यावर फार भक्ति असे. त्याच्या जुलमाची गदा अजून तुमच्यावर खास पडली नसावी.—मी अजून तरुणच आहें. तरी पण मला जर तुह्मी त्याच्या स्वाधीन करून दिलें तर त्याची मर्जी तुमच्यावर मोठी बहाल होईल. शिवाय

ह्या क्षुब्ध झालेल्या देवतेला शांत करण्यासाठीं माझ्यासारख्या अशक्त, गरीब, आणि निरुपद्रवी कोकराची आहुति दिल्याबद्दल तुमच्या शहाणपणाचीही मोठी ख्याति होईल.

**मुकुंद०**—मी असा विश्वासघातकी मनुष्य नाहीं.

**मल्हार०**—पण मानाजीराव आहे. एखाद्या माणसाचा चांगला आणि सद्गुणी स्वभाव असला तरी राजाच्या मर्जीपुढें तें सगळें लटपटून जातें. पण मी तुमची माफी मागतों. मी तुम्हांला कांहीं म्हटलें तरी तुमचा जो खरा स्वभाव असेल तो बदलतो असें नाहीं. एखादी अतिशय चमकणारी वस्तु कांच ठरेल, पण रत्नें हीं चमकायचींच. जरी सर्व दुर्गुणांनीं सद्गुणांचा पेहराव केला तरी सद्गुणांचा पेहराव कायमच असायचा.

**मुकुंद०**—माझी अगदीं निराशा झाली !

**मल्हार०**—मला तुमची शंका आली हें तर तुमच्या निराशेचें कारण नसेलना?—पण तुह्मी आपल्या बायकामुलांचा निरोपही न घेतां इतक्या गडबडीनें त्यांना टाकून आलां हें कसें?—पण तेंही असो. माझी तुह्मांला एवढीच विनंति आहे कीं मला जो आतां संशय आला आहे तो तुमचा अपमान करण्यासाठीं नव्हे तर माझ्या स्वतःच्या संरक्षणासाठीं होय असें तुम्ही समजा. मला काय पाहिजे तें वाटो, त्याच्या योगानें तुमच्या प्रामाणिकपणाला काडी इतकाही बाध येत नाहीं.

**मुकुंद०**—हे माझ्या हतभाग्य देशा! वाहूं दे! अजून तुझ्या अंगांतील रक्त असेंच वाहिलें पाहिजे! अरे जुलमी रा-

जा, तुझ्या जुलमाचा पाया दृढ होऊं दे. कारण तुझा वीमोड करण्याची चांगल्या चांगल्या माणसांना देखील छाती होत नाहीं. तुझे अन्याय असेच चालूं देत. तुझा गादीवरील हक्क कायम ठरला. चालूं दे आतां पाहिजे तेवढा जुलूम!—महाराज, रामराम! तुह्मांला देव सुखी राखो. त्या जुलमी राजाच्या ताब्यांत जेवढें राज्य आहे तेवढें सगळें—इतकेंच नव्हे तर आणखी ती सोन्याची लंकाही—जरी मला कोणी दिली तरी देखील तुह्मांला वाटतें आहे तसलें दुष्ट मांगाचें काम माझ्या हातून कधींही व्हायचें नाहीं.

**मल्हार०**—तुह्मी रागावूं नका. तुह्मी माझ्याशीं विश्वासघात कराल एवढ्याच भीतीनें केवळ मी तुमच्याशीं असें बोललों असें समजूं नका. त्या जुलमी राजानें ठेविलेल्या जोखडाखालीं आपल्या देशांतील लोकांच्या माना मोडून गेल्या आहेत हें मी समजतों. तेथील लोक ढळढळ रडत आहेत, त्यांच्या रक्तांचे पाट वहात आहेत, आणि प्रत्येक दिवशीं त्यांच्या अंगाला नवीन नवीन जखमा पडत आहेत, हें मला कळतें. तसेंच मी गादीला हक्क सांगूं लागलों तर माझ्या बाजूनेंही पुष्कळ लोक शस्त्र घेऊन उठतील हें मला माहीत आहे. ह्या मगधदेशाच्या राजाकडून सुद्धां लागेल तितकी फौज देण्याबद्दल मला वचन मिळालेलें आहे. आणि आतां कल्पना करा कीं त्या जुलमी राजाचें डोकें मी आपल्या पायाखालीं तुडविलें किंवा आपल्या तरवारीच्या टोंकावर धरून नाचविलें—इतक्या स्थितीला गोष्ट आणली—तरी पण

त्या जुलमी राजाच्या पाठीमागून जो गादीवर बसेल त्याच्या हातून माझ्या देशाला निरनिराळीं अधिक संकटें भोगावीं लागतील. आणि जे दुर्गुण तेथें आतां नाहींत त्यांच्या अनिवार फैलाव होईल.

मुकुंद०--ह्याच्या पाठीमागून गादीवर बसणारा असा कोण तो ?

मल्हार०--मीच तो. आणि माझ्या अंगांत----मला पक्कें ठाऊक आहे----सर्व प्रकारचे दुर्गुण अगदीं ओतप्रोत भरलेले आहेत. आणि त्यांचा प्रभाव जेव्हां दृष्टोत्पत्तीस येऊं लागेल तेव्हां हा महापातकी मानाजीराव देखील माझ्याशीं तुलना करून पाहिली असतां अगदीं धुतल्या तांदुळासारखा निष्कलंक तुम्हांला वाटूं लागेल आणि माझ्या दुर्गुणांचे बेसुमार चाळे पाहिले ह्मणजे मानाजीराव हा अगदीं गरीब कोकरूं होतें असें लोकांना वाटेल.

मुकुंद०--आज पर्यंत नरकामध्यें जे असंख्य अघोर पातकी प्राणी तडफडत पडले असतील त्यांत सुद्धां मानाजीरावापेक्षां अधिक पातकी दुसरा कोणी मिळायचा नाहीं.

मल्हार०--मी कबूल करतों कीं मानाजीराव हा लबाड, उग्र, मत्सरी, आणि क्रूर आहे. मी असें देखील ह्मणतों कीं जें जें पातक जगांत प्रसिद्ध आहे तें तें मानाजीरावानें केलें असलें पाहिजे. तरी पण माझे जे ऐष आराम आहेत त्यांना तर सीमाच नाहीं. तुमच्या बायका, मुली, आणि दासी ह्या सगळ्यांचा उपभोग मला मिळाला तरीही माझी कामवासना तृप्त

होणार नाहीं. आणि ह्या कामांत माझ्या विषयसुखा-
ला जे जे प्रतिबंध येतील ते ते झुगारून देऊन मी
आपली इच्छा पूर्ण केल्यावांचून कधींही राहणार नाहीं.
तेव्हां असला माझ्यासारखा राजा राज्य करण्याला अस-
ण्यापेक्षां मानाजीराव चांगला नव्हे काय ?

मुकुंद०—कोणच्याच कामांत अमर्याद बेफामपणा
असणें चांगलें नाहीं. ह्याच्या योगानें पुष्कळ राजे
लयाला गेले आणि शेंकडों आपल्या गादीला मुकले.
तरी पण वंशपरंपरेच्या हक्कानें जी आपली गादी
आहे तिच्यावर बसण्याला आपण अनमान करूं
नये. तुह्मांला ऐषआराम करावयाचे असतील तर ते
खुशाल करा. पण त्याबद्दल बाह्यात्कारी जरा औ-
दासिन्य दाखवा. ह्मणजे तुमच्या त्या सगळ्या चैन-
बाजीवर चांगलें पांघरूण पडेल. तुमच्या सेवेला त-
त्पर अशा पुष्कळ अविवाहित स्त्रिया आमच्या दे-
शांत आहेत. आणि त्या सर्व आपली वासना तृप्त क-
रण्याला पुरेशा होणार नाहींत इतका कामाग्नीचा
भडका आपल्या हृदयांत पेटला असेल असें मला वा-
टत नाहीं.

मल्हार०—माझ्या अंगांत एवढाच दुर्गुण आहे
असें नाहीं, तर माझा स्वभाव पराकाष्ठेचा लोभी आहे.
मी जर राजा झालों तर माझ्या राज्यांतील जहा-
गिरदारांच्या जमिनी माझ्या ताब्यांत याव्या ह्या हे-
तूनें मी त्यांना ठार केल्यावांचून कधींही सोडणार
नाहीं. ह्याचा जवाहिरखाना बळकावून घ्यावा, त्याचा
वाडा हस्तगत करून घ्यावा, अशी इच्छा मला झा-

त्यावांचून राहणार नाहीं. आणि जसजसें अधिक मिळत जाईल तसतशी माझी भूकही अधिक वाढत जाणार. आणि मग मी धर्मशील आणि राजनिष्ठ अशा लोकांशीं देखील मुद्दाम अन्यायानें कांहीं तरी कुरापत काढून त्यांना रसातळाला पोंचवून त्यांच्या द्रव्याचा अपहार केल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

मुकुंद०–कामवासनेपेक्षां ह्या लोभाचीं पाळेंमुळें हृदयांत फार खोलपर्यंत जातात आणि तीं एकदा गेलीं ह्मणजे निघतां निघत नाहींत. आजपर्यंत जे राजे प्राणाला मुकले त्यांचा घात करणारें शस्त्र हेंच होय. तरी पण ह्याबद्दलही आपल्याला फारशी काळजी नको. आपल्या लोभाची तृप्तता करण्या इतकें द्रव्य आपल्या देशांत भरपूर आहे. आपल्या अंगांत जे दुसरे अनेक गुण आहेत तिकडे लक्ष पोंचविलें ह्मणजे हे दुर्गुण सह्य आहेत असें मानण्याला कांहीं हरकत नाहीं.

मल्हार०–पण माझ्या अंगांत तुह्मी म्हणतां तसा एकही गुण नाहीं. न्याय, खरेपणा, नेमस्तपणा, दृढनिश्चय, औदार्य, उद्योग, दया, नम्रपणा, भक्ति, सहनशीलता, धैर्य, शौर्य, इत्यादि राजाला शोभविणारे जे सद्गुण त्यांचा माझ्या ठिकाणीं गंधही नाहीं. सर्व प्रकारच्या दुर्गुणांनीं मात्र मी ओतप्रोत भरलेला आहें. फार कशाला, माझ्या हातांत जर सत्ता आली तर पृथ्वीच्या पाठीवर जो कांहीं मित्रपणा आहे तो सगळा मी लयाला घालवीन, चोहोंकडे जी शांतता नांदत आहे ती मी उद्ध्वस्त करून टाकीन, आणि

एकी हा पदार्थ देखील कोणाच्या नजरेस पडूं देणार नाहीं.

मुकुंद०–हर हर ! हे माझ्या देशा, तूं खरोखरच हतभागी आहेस !

मल्हार०–मी सांगितलें असा हा मी आहें. असला मनुष्य तुमच्यावर राज्य करण्याला योग्य असेल तर सांगा.

मुकुंद०–राज्य करण्याला योग्य ? जिवंत राहण्यालाही योग्य नाहीं !–अरे माझ्या हतभाग्य देशा ! ज्याचा तुझ्यावर राज्य करण्याला कांहींही हक्क नाहीं असा तो चांडाळ लोकांचे गळे कापून तुझ्यावर अम्मल करीत आहे. त्यांतून सुटून तुला सुखाचे दिवस कधींरे पहावयाला मिळतील ? कारण तुझ्या सिंहासनावर बसण्याचा वाजवी रीतीनें ज्याला अधिकार आहे असा हा मल्हारराव तर आपल्याच तोंडानें आपल्या दुर्गुणांचा पाढा वाचून दाखवून आपलें बदनाम करून घेत आहे, आणि आपल्या कुळालाही कलंक लावून घेत आहे.—आपले वडील मोठे साधु पुरुष होते. आणि जिनें आपल्याला जन्म दिला ती आपली आईही नेहमीं परमेश्वराच्या भजनांत व्यग्र होऊन तपश्चर्येनें आपला देह झिजवीत असे. असो. राम राम ! येतों आतां. तुह्मी आपल्या दुर्गुणांचे हें जें वर्णन केलें तें ऐकिल्यापासून मला आतां आपल्या देशांत परत जाण्याची आशा तिळमात्र उरली नाहीं. ह्या तुमच्या दुर्गुणांनीं मला तेथून हद्दपारच केलें असें

ह्मटलें पाहिजे. हृदया, तुझ्या सर्व आशेची समाप्ति येथें झाली !

**मल्हार०**–मुकुंदराव, मनांत खरेपणा असल्यावांचून एरवीं इतका देशभक्तीचा उमाळा कोणाला यावयाचा नाहीं. आणि ह्याच्या योगानें माझ्या मनांतील सर्व संशय नाहींसा होऊन तुमच्या खरेपणाबद्दल आणि प्रामाणिकपणाबद्दल माझी पूर्ण खात्री झाली. मला आपल्या ताब्यांत आणून घेण्यासाठीं त्या मायावी मानाजीरावानें असल्या युक्त्या पुष्कळ वेळां केल्या होत्या. आणि म्हणून मी नेहमीं फार बेताबातानें वागतों आणि सहसा कोणावर विश्वास ठेवीत नाहीं. पण आतां ईश्वराला साक्ष ठेऊन असें सांगतों कीं तुह्मी सांगाल त्याप्रमाणें वागण्याला मी आतां देखील तयार आहें. मी आपले जे दुर्गुण सांगितले ते सर्व खोटे. माझ्या मनांत त्या दुर्गुणांचा गंधही नाहीं. स्त्रीसंग कसा तो अद्यापि मला माहीत देखील नाहीं. मी कधीं खोटी शपथ वाहिली नाहीं. माझ्या स्वतःच्या मालकीच्या म्हणून ज्या वस्तु आहेत त्यांचा सुद्धां माझ्या मनांत लोभ नाहीं. मग इतरांची तर गोष्ट कशाला ? मी कोणाचा विश्वासघात केला नाहीं. आणि प्रत्यक्ष सैतान जरी माझ्यावर विश्वास ठेऊन माझ्या आश्रयाला येऊन राहील तरी त्याला देखील मी दुसऱ्याच्या हवालीं करणार नाहीं. माझा जीव आणि खरेपणा हे दोन्ही मला सारखेच प्यारे आहेत. आणि मी जन्मास आल्यापासून जर कांहीं खोटें बोललों असेन तर तें मी आपल्याबद्दल आतां जें बोललों तेवढेंच काय तें. हें

माझें खरें स्वरूप आहे. आतां माझा दुर्दैवी देश आणि तुह्मी मला जी आज्ञा कराल त्याप्रमाणें वागण्याला मी सिद्ध आहें. तुह्मी येथें येण्याच्या पूर्वींच दहा हजार हत्यारबंद फौज घेऊन शिवदेवराव नांवाचे सरदार त्या मानाजीरावावर स्वारी करण्याकरितां आज निघणार असें ठरलें होतें. परंतु आतां आपण सगळे जण बरोबरच निघूं. आणि आतांच्या आपल्या भांडणाचा परिणाम जसा गोड झाला तसाच ह्या लढाईचाही होवो.–पण तुम्ही असे स्तब्ध कां ?

मुकुंद०–असल्या उद्वेगजनक व आनंददायक गोष्टी एकदम ऐकल्यामुळें मन अगदीं घोटाळून गेलें आहे.

[ राणोजी प्रवेश करतो. ]

मुकुंद०–हा कोण बरें येत आहे इकडे ?

मल्हार०–हा कोणी तरी माझा देशबंधुच असला पाहिजे, पण अमुकच असें मला ओळखत नाहीं.

मुकुंद०–या या तुम्ही. कसें काय ठीक आहेना ?

मल्हार०–आतां मी यांना ओळखलें. देवा, आम्ही सगळे एका देशांतले असून आम्ही एकमेकांची ओळख देखील विसरून जाण्याचा आम्हांवर प्रसंग यावा ना ! देवा ही स्थिति तूं लवकर दूर करशील तर बरें होईल.

राणोजी–माझीही देवापाशीं अशीच विनंति आहे.

मुकुंद०–कसें काय ? आपल्या देशाची होती तीच स्थिति कायम आहेना ?

राणोजी–आपला देश, खरोखर तुम्हांला सांगतों, फुटक्या नशिबाचा आहे. आपला देश ही आ-

पली आई असें म्हणण्याची आतां सोय उरली नाहीं; तर ती आपली सगळ्यांची स्मशानभूमिच झाली आहे. तेथें जेवढे शंखशिरोमणि म्हणून आहेत तेवढ्यांची मात्र सडकून चैन चालली आहे. बाकी कोणाच्या तोंडावर काडी इतकेंही तेज राहिलें नाहीं. तेथें कोणाला दुःखाचे हुंदके येत आहेत, कोणी तेथील अन्यायामुळें आक्रोश करीत आहेत आणि कोणी तेथील जुलमामुळें किंकाळ्या फोडीत आहेत. अशा प्रकारच्या दुःखाच्या विलापांनीं सगळें आकाश दणाणून गेलें आहे. तरी पण त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. तेथें कोणी दुःखानें तडफडत असलेला दृष्टीस पडला तरी त्यांत कोणाला कांहीं विशेष वाटत नाहीं. भ्रमिष्ट होऊन बडबडतो आहे असें उलटें त्याला ह्मणतात. कोणी मनुष्य मेला तर हा कोण मेला, कशानें मेला, ही सुद्धां कोणी चौकशी करीत नाहीं. कारण जुलमाच्या योगानें जेथें असंख्य प्राणी रोज मरणार तेथें कोण कोणाची चौकशी करतो. जो आतां जीवंत आहे तो घटकेनें जीवंत असेलच अशी खात्री नाहीं. दुखणें नाहीं बाणें नाहीं, तरी पण एकाएकीं माणसें नाहींशीं होतात.

मुकुंद०—तुह्मी सांगतां अशीच हकीकत असली पाहिजे. ह्यांत काडी मात्र संशय नाहीं.

मल्हार०—बरें, आतां अगदीं ताजा जुलूम लोकांवर कोणता होत आहे ?

राणोजी—ताजा ह्मणून कोणता सांगूं ? एक घटकेच्या मागचा ह्मणून सांगूं लागलों तरी तो वास्तविक

पाहतां अगदीं शिळा झालेला असतो. कारण प्रत्येक क्षणाला नवीन नवीन जुलूम चालले आहेत.

मल्हार०—आणखी काय तिकडची खबर आहे ?

राणोजी—मी इकडे येत होतों तों वाटेनें पुष्कळ चांगल्या लोकांच्या तोंडून मी अशी बातमी ऐकिली कीं मानाजीराव आपलें सैन्य घेऊन लढाई देण्यासाठीं निघाला आहे. मला ह्याबद्दल शंका वाटत होती. पण तें मानाजीरावाचें सैन्य जेव्हां मी आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां माझा त्या बातमीवर विश्वास बसला. आतां आह्मांला आपण मदत करण्याची हीच वेळ आहे. तुह्मी आपल्या देशांत आलां ह्मणजे पाहिजे तेवढे लढवय्ये लोक तुमच्या भोंवती जमतील, आणि आपल्यावर आलेल्या संकटाचें निवारण करण्यासाठीं बायकादेखील लढाई करण्याला तयार होतील.

मल्हार०—आह्मी तिकडे कूच करण्याच्या तयारींतच आहों हें ऐकून लोकांना समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. ह्या मगध देशच्या राजानें आपला उत्तम सरदार शिवदेवराव आणि दहा हजार सैन्य आह्मांला दिलें आहे. शिवदेवरावांसारखा अनुभवी आणि शूर शिपाई साऱ्या दुनयेंत मिळणें कठिण आहे.

राणोजी—आपण मला ही जशी आनंदाची बातमी सांगितली तशी मलाही जर आपल्याला सांगतां आली असती तर बरें झालें असतें. पण माझ्या कपाळीं तसला योग नाहीं. मी जी बातमी आणली

आहे ती जेथें कोणी ऐकणार नाहीं अशा एखाद्या रानांत मात्र उच्चारण्याजोगी आहे.

मुकुंद०—ती कोणाच्या बद्दल आहे? सगळ्या देशाच्या संबंधाची आहे किंवा कोणा एखाद्या विशेष व्यक्तीबद्दल आहे?

राणोजी—जो जो मनुष्य प्रामाणिक आहे त्याला ती ऐकून वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. तरी पण ती मुख्यत्वेंकरून तुमच्याच संबंधाची आहे.

मुकुंद०—जर ती माझ्याबद्दलची आहे तर माझ्या पासून ती दडवून ठेऊं नका. ती मला कळूं द्या.

राणोजी—आजपर्यंत तुमच्या कानांनीं कधींही ऐकिले नाहींत असे कठोर शब्द माझी जिव्हा उच्चारणार आहे. पण त्याबद्दल तुह्मी माझा तिरस्कार करूं नका.

मुकुंद०—हं! मी जाणलें तुह्मी काय सांगणार तें.

राणोजी—तुमच्या किल्यावर छापा घालून तो शत्रूंनीं हस्तगत करून घेतला आणि तुमच्या बायकामुलांची फार निर्दयपणानें कत्तल उडविली.

मल्हार०—परमेश्वरा, तुला त्या अनाथांची कशी रे दया आली नाहीं!—मुकुंदराव तुम्ही असे कपाळावर हात देऊन स्तब्ध बसूं नका. तुमच्या मनांत जें दुःख सांचलें असेल तें शब्दांनीं व्यक्त करा. असें केलें नाहीं तर दुःखानें भरून गेलेल्या अंतःकरणांत शोक धुमसत रहातो आणि त्या योगानें हृदय फुटून जातें.

मुकुंद०—माझीं मुलें मारलीं!

राणोजी—होय.

मुकुंद॰—आणि मी त्यांचें संरक्षण करण्याला जवळ नसावें ! माझ्या बायकोला देखील मारलें ?

राणोजी—होय.

मल्हार॰—जरा धीर धरा. हें जें आपल्याला पराकाष्ठेचें दुःख होत आहे ह्या रोगावर उत्तम औषध म्हटलें ह्मणजे ह्याचा सूड उगवणें हें होय.

मुकुंद॰—याला कांहीं मुलें बाळें नाहींत असें वाटतें. माझीं तीं सगळीं लहान लहान मुलें त्यानें मारलीं ? तुम्ही काय सांगितलें ? सगळीं मारलीं म्हणून ! अरेरे चांडाळा ! अरे नरकांतल्या गिधाडा, माझीं सगळीं चिलींपिलीं आणि त्यांची आई ह्यांनां तूं एका भयंकर झडपेसरशी उचलून नेलेंस काय ?

मल्हार॰—मुकुंदराव, ह्याचा जाब मानाजीरावाला मर्दासारखा विचारा.

मुकुंद॰—समरांगणांत तो विचारीनच. परंतु सध्या माझ्यानें माझा शोक आवरून धरवत नाहीं. जीं माणसें माझीं अतिशय लाडकीं होतीं त्यांची मला फिरून फिरून आठवण होते ! काय करूं ? हें कृत्य झालें तेव्हां परमेश्वर तें पहात होता ना ? आणि पहात असून तो त्यांचें संरक्षण करण्याला धांवला नाहीं कसा ? अहा रे चांडाळा मुकुंदरावा, तुझ्यासाठीं तीं सगळीं बिचारीं प्राणाला मुकलीं ! शिव शिव ! सर्व अपराध माझा ! त्यांचा तिळप्रायही नाहीं ! असें असून माझ्यासाठीं त्यांच्या देहाचे तुकडे तुकडे झाले ! देवा, आतां स्वर्गलोकांत तरी त्यांना सुख लागूं दे.

मल्हार०–हें दुःख आहे तर ही तुमची तरवार पाजविण्याची सहाणच आहे असें समजा. मनांतील दुःख सोडून द्या आणि तेथें क्रोधाचा संचार होऊं द्या. तुमच्या अंतःकरणांतील त्वेष मंद होऊं देऊं नका. तो चांगला प्रज्वलित करा.

मुकुंद०–डोळ्यांतून बायकोसारखीं एकीकडे टिपें टाकीत असून तोंडानें मात्र वल्गना करीत बसण्यांत आतां कांहीं हशील नाहीं. देवा, आतां तुझ्यापाशीं हेंच मागणें आहे कीं त्याची माझी गांठ पडण्याला विलंब लावूं नको. त्या सैतानाची आणि माझी समोरा-समोर एकदा गांठ घालून दे. माझ्या तरवारीच्या आटोक्यांत त्याला येऊं दे. आणि मग तो कसा जीवंत राहतो तें मी पाहतों.

मल्हार०–आतां मर्दासारखें बोललां. चला आपण महाराजांकडे जाऊं. आपलें सैन्य तयार आहे. महा-राजांचा निरोप घेऊन निघण्याचा काय तो अवकाश आहे. तिकडे मानाजीरावाच्याही पापाचे घडे भरत आले आहेत. आणि त्याचें पारिपत्य करण्याची प्रे-रणा परमेश्वरानें आपल्या अंतःकरणांत केली आहे. ह्यांतच तुह्मी आतां आनंद मानून घेतला पाहिजे. कारण असा आनंद मानला नाहीं तर हा शोक क-धींच संपायचा नाहीं.

[ सर्व जातात. ]

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळ--देवगडच्या किल्ल्यांतील एक दिवाणखाना.

(वैद्य आणि दासी प्रवेश करितात.)

**वैद्य**–तुझ्या बरोबर मी दोन रात्रीं येथें जागत बसलों, पण तूं सांगतेस त्यांत कांहीं तथ्य आहे असें कधींच आढळून आलें नाहीं. त्या झोंपेंतून उठून चालण्याला आज किती दिवस झाले ?

**दासी**–आपले महाराज लढाईला निघून गेल्यापासून मी हें पाहतें आहें. बाईसाहेब आपल्या बिछान्यावरून उठतात, आपली शालजोडी पांघरतात, आपल्या रंगमहालाची कडी काढतात, आणि मग कागद घेऊन त्याची घडी घालून त्याच्यावर कांहीं लिहितात, तें वाचतात, आणि मग तें पत्र मोहोरबंद करून फिरून आपल्या बिछान्यावर जाऊन निजतात, आणि फिरून हा सगळा कारभार झोंपेंतच चाललेला असतो.

**वैद्य**–गाढ झोंप येत असून जागें असल्या प्रमाणें ज्यापेक्षां सर्व व्यवहार होतात त्यापेक्षां ह्यांच्या मनाला फारच अस्वस्थता उत्पन्न झालेली असली पाहिजे. बरें, झोंपेंत असतांना ह्या चालूं लागतात आणि हे कारभार करतात हें एक झालें, पण ह्या शिवाय एखादे वेळीं त्या कांहीं बोलतात काय ?

**दासी**–होय. पण मी तें तुम्हांला सांगणार नाहीं.

**वैद्य**–माझ्यापाशीं तें सांगायला हरकत नाहीं. तूं तें सांगितलेंस तर बरें होईल.

**दासी**–मी जें ऐकिलें आहे तें दुसऱ्या कोणीही ऐकिलें नसल्यामुळें तें कोणाला खरें देखील वाटणार नाहीं. त्यापेक्षां तें न सांगितलेलेंच बरें. ह्या पहा. ह्या इकडेच येत आहेत.

( हातांत दिवा घेऊन दर्याबाई प्रवेश करिते. )

हाच ह्यांचा नेहमींचा पोषाक. आणि मी खात्रीनें सांगतें ह्या अगदीं गाढ झोंपेंत आहेत. आतां जवळ उभे राहून नीट लक्ष लावून पहा.

**वैद्य**–ह्यांना हा दिवा कोठून मिळाला ?

**दासी**–कां बरें ? तो त्यांच्या उशागतीं असतोच. साऱ्या रात्रभर बिछान्याजवळ दिवा जळत असला पाहिजे असा त्यांनीं हुकूमच केला आहे.

**वैद्य**–पहा, ह्यांचे डोळे उघडे आहेत.

**दासी**–उघडे असले तरी त्यांना कांहीं दिसत नाहीं.

**वैद्य**–आतां ह्या हें काय बरें करीत आहेत ? पहा ह्या आपले हात कसे घांशीत आहेत.

**दासी**–त्या नेहमींच असें हात घांसल्यासारखें करतात. घटका घटका एकसारखें हेंच करीत बसलेल्या त्यांना मी कैक वेळां पाहिलें आहे.

**दर्या०**–अजून येथें डाग आहेच !

**वैद्य**–ऐक. ह्या बोलताहेत. ह्या काय बोलल्या ह्याचें पुढें मागें कदाचित् विस्मरण पडेल ह्मणून ह्यांच्या तोंडून जे कांहीं शब्द बाहेर पडतील ते मला टिपून ठेविले पाहिजेत.

दर्या०—जा! जा! अरे मेल्या डागा, जा आतां! एक-दोन-हं! झालीच वेळ हं! आतां उरकलेंच पाहिजे!—नरकांतल्या यातना भयंकर ह्मणे!—मानाजीराव, धिक्कार असो तुम्हांला! शिपाई म्हणवतां आणि असे भितां! कळलें म्हणून भिण्याचें काय कारण आहे? आपल्याला विचारणारा कोण आहे?—तरी पण त्या थेरड्याच्या अंगांत इतकें रक्त असेल असें मला तर वाटलें नव्हतें!

वैद्य—ऐकलेस का तूं हें?

दर्या०—मुकुंदरावाला एक बायको होती!—पण ती आतां कोठें आहे!—ह्या माझ्या हातावरचे हे डाग कधींच जायचे नाहींत काय!—प्रिया, जाऊं द्या, त्याच्याबद्दल ज्यास्त विचार नको! तुम्ही असे मध्येंच दचकतां त्यामुळें सगळ्या कामाची घाण होते!

वैद्य—अरे रे! ज्या गोष्टी तुला समजूं नयेत त्या समजल्या आहेत असें दिसतें.

दासी—जें त्यांनीं बोलूं नये तें त्या बोलत आहेत असें वाटतें. ह्यांच्या कानावर काय गोष्टी आल्या आहेत तें परमेश्वराला ठाऊक.

दर्या०—अजून माझ्या हाताला रक्ताची घाण येतेच आहे. मलयपर्वतावरील सगळ्या चंदनाचें गंध उगाळून ह्या हाताला फासलें तरी सुद्धां ही घाण जायची नाहीं असें वाटतें! काय करावें! अरे रे रे रे!

वैद्य—हाय! हाय! केवढा हा दुःखाचा उसासा ह्यांना आला! ह्यांच्या मनांत फार जबर दुःखाचीं कारणें सांठलेलीं असलीं पाहिजेत.

**दासी**–मला तर बाई हें असलें राज्यवैभवही नको, आणि ह्या यातनाही पण नकोत.

**वैद्य**–बरें बरें, ऐक.

**दासी**–देव करो आणि सगळें बरें होवो म्हणजे झालें !

**वैद्य**–हा रोग माझ्या हातून बरा होण्यासारखा नाहीं. झोंपेंतून उठून पुष्कळ लोक चालतांना मी पाहिलेले आहेत, पण ते पापी नव्हते.

**दर्या०**–तुम्ही आपले हात धुवून टाका! हा दिवसाचा पोषाख नको आतां !–आणि असे कावरे बावरे दिसूं नका !–मी तुम्हांला फिरून सांगतें व्यंकाजीरावाचें प्रेत जमिनींत गाडून टाकिलें आहे. तेथून तो आतां खास बाहेर येणार नाहीं.

**वैद्य**–असें ! असें काय !

**दर्या०**–चला, आतां चटकन् जाऊन निजूं या. दरवाजावर कोणी धक्के मारीत आहे ! चला, चला, चला, तुमचा हात माझ्या हातांत द्या ! जें झालें तें झालें! आतां मुकाट्यानें जाऊन निजूं या ! (जाते.)

**वैद्य**–आतां ह्या बिछान्यावर निजतील काय ?

**दासी**–होय.

**वैद्य**–कांहीं अघोर कृत्य घडून आल्याबद्दल लोकांत बरीच गुणगुण सुरू आहे. अघोर कर्मे करणारांना अघोर यातना सोसाव्या लागतात. आणि अघोर कर्मे करणारे बिछान्यावर बसून बहिऱ्या उशीपुढेंही आपलीं गुप्त कृत्यें ओकतात. बाईसाहेबांच्या ह्या रोगावर वैद्यशास्त्रांतील कोणताही उपाय लागू पड-

णार नाहीं. त्यांच्या हातून कांहीं देवधर्माचेच उपाय करवून पहा. त्यानें कांहीं गुण आला तर येईल, देव त्यांना सुखी राखो. तूं त्यांनां नीट जपत जा. त्यांनां ज्यापासून त्रास होईल अशा वस्तु त्यांच्या नजरे आड करून ठेव. आणि नेहमीं त्यांच्यावर तुझें लक्ष असूंदे. बरें आहे मी जातों आतां. हा सगळा चमत्कार पाहून माझें मन अगदीं घोटाळून गेलें आहे. मला वाटतें—पण नको.

**दासी**–बरें आहे. या तर. [ जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**–देवगडाजवळचें एक मैदान.

( महिपतराव, हंबीरराव, अंग्रे, लक्ष्मणसिंग, आणि इतर शिपाई हातांत निशाणें घेऊन नगारा वाजवीत प्रवेश करितात. )

**महिपतराव**–मगधदेशच्या राजाचें सैन्य अगदीं जवळ येऊन ठेपलें आहे. मल्हारराव, शिवदेवराव, आणि मुकुंदराव हे त्या सैन्यांतील मुख्य आहेत. आपल्यावर सूड उगविण्याची इच्छा रात्रंदिवस त्यांच्या मनांत एकसारखी जळत आहे. आणि त्यांच्या लोकप्रिय पक्षाचा कड घेऊन अगदीं विरक्त साधु देखील भयंकर रणगर्जना करून रक्तपात करण्याला प्रवृत्त होतील.

**अंग्रे**–त्या बीरबनच्या जंगलांत आपण त्यांस जाऊन मिळूं या. कारण ते त्याच रस्त्यानें येत आहेत.

**हैबतराव**–बरें, धनाजी आपल्या भावाबरोबर आहे किंवा नाहीं ह्याबद्दल कोणाला पक्की माहिती आहे काय ?

लक्ष्मण०--तो मल्हाररावाबरोबर नाहीं हें मी पक्कें सांगतों. त्यांच्या बरोबर कोण कोण सरदार आहेत त्या सगळ्यांची नांवनिशी माझ्या जवळ आहे. एक शिवदेवरावांचा मुलगा आहे. आणि दुसरे अगदीं तरणे बांड ज्यांच्या तोंडावर अजून मिशी देखील फुटली नाहीं असे कांहीं लोक आहेत.

महिपत०--आणि आपले राजेसाहेबांची कशी काय तयारी चालली आहे ?

हैबत०--ह्या देवगडची त्यांनीं अगदीं कडेकोट तयारी चालविली आहे. कोणी ह्मणतात कीं ह्याला वेड लागलें आहे, पण ज्यांच्या मनांत त्याच्याबद्दल फारसा तिटकरा नाहीं असे कांहीं लोक ह्मणतात कीं तो फार खवळून गेला आहे. पण एकंदरींत एवढें खरें कीं अलीकडे त्याची वर्तणूक इतकी चमत्कारिक झालेली आहे कीं कशाला कांहीं धरबंद नाहीं.

अंग्रे--त्यानें गुप्तपणें केलेल्या खुनाचीं फळें आतां त्याला भोगावीं लागत आहेत. त्यानें आजपर्यंत लोकांना खोट्या खोट्या थापा मारून फसविलें. परंतु आतां त्यामुळें लोकांत पुंडावे माजत चाललेले पाहून त्याची छाती धडधडत आहे. त्याच्या हाताखालचे चाकर लोक त्याची भाकरी खातात ह्मणून कांहीं तरी चाकरी करीत आहेत. बाकी स्वामिभक्तीचा लेश देखील त्यांच्या मनांत नाहीं. आणि आपली सत्ता डळमळूं लागली हें आतां त्याच्या दृष्टोत्पत्तीस येत आहे.

महिपत०--त्याचें मन त्याला खात असल्यामुळें

त्याच्या अंतःकरणांत जी चलबिचल झाली आहे त्याबद्दल त्याला कोण दोष देईल ?

हैबत०–बरें आहे. चला आपण कूच करूं या आणि आपले खरे खरे धनी जे मल्हारराव सरकार त्यांच्या पायाशी कांहीं तरी चाकरी बजावण्याला तेथें जाऊं या. आपल्या सगळ्या देशाला गुलामगिरीचा हा एक रोगच जडला आहे म्हणावयाचा. पण त्याच्यावर हें रामबाण औषध सुदैवानें मिळत आहे. आपल्या देशाला संकटांतून सोडविण्याच्या कामीं आपल्या धनी साहेबां बरोबर आपणही आपल्या शरीरांतील रक्ताचा प्रत्येक थेंब नाहींसा होईपर्यंत निकरानें लढूं या.

लक्ष्मण०–अथवा ह्या जुलमी राज्याच्या ज्या रानवेली चोहोंकडे पसरल्या आहेत त्या खणून काढून स्वराज्यरूपी सुंदर फुलझाडाला वाढीस लागण्याला जितकें लागेल तितकें रक्त आपण आपल्या शरीरांतून खर्ची घालूं. असें कां म्हणाना ? चला आतां. त्या बीरबनच्या रानांत आपण निघून जाऊं या. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—देवगडच्या किल्ल्यांतील दिवाणखाना.

[ मानाजीराव, वैद्य, आणि चाकर प्रवेश करतात. ]

मानाजी०–बस्स झालें. आतां मला आणखी बातम्या मुळींच सांगु नका. त्या सगळ्यांना येथून पळून जाऊन शत्रूच्या पक्षाला मिळूं द्या. बीरबनच्या रानां-

तील झाडें आपली जागा सोडून येथें जोंपर्यंत चालत आलीं नाहींत तोंपर्यंत माझ्या मनाला भीति शिवणार नाहीं. तो कालचा पोरगा मल्हारराव त्याची काय बिशाद! आणि शिवाय ह्या जगांत काय काय घडामोडी व्हावयाच्या हें ज्यांना माहीत असतें अशा त्या चेटक्यांनीं मला सांगितलें आहे कीं, 'मानाजीराव, स्त्रीच्या उदरांतून जन्मास आलेल्या कोणत्याही मनुष्याचा जोर तुझ्यावर चालणार नाहीं आणि त्यापासून तुला भिण्याचें मुळींच कारण नाहीं.' हा मल्हारराव अशांतलाच नव्हे काय? मग काय तर? चला जा येथून, लुच्यांनों, आणि तुह्मांला वाटत असेल तर तुह्मीही त्या लोकांना जाऊन मिळा. ह्या असल्या तुमच्या थापांनीं माझ्या मनांत यत्किंचित् ही शंका उत्पन्न होणार नाहीं, किंवा भीति वाटणार नाहीं.

[ एक जासूद प्रवेश करितो. ]

हा आला रडतोंड्या. गुलामाचें तोंड कसें खापरासारखें काळें ठिक्कर पडलें आहे. काय रे काय झालें?

**जासूद**–धनीसाहेब, दहा हजार—

**मानाजी०**–काय? गुलामा, काय सांगतोस? काय? दहा हजार बायका आल्या आहेत?

**जासूद**–सरकार, दहा हजार शिपाई आले आहेत.

**मानाजी०**–नीघ. येथून आधीं काळें कर पाहूं. भीतीनें गुलामाच्या काळजाचें पाणी होऊन गेलें आहे, आणि येथें येऊन भलभलती बडबड करीत आहे. कसले शिपाई आले आहेत रे, गुलामा! इतका भिला

झालास त्यापेक्षां तूं मेलास कां नाहीं! गुलामाच्या तोंडावर दरदरून घाम आला आहे. आणि भीतीमुळें बोबडी वळून गेली आहे. अरे गायवण्यां, कोठले शिपाई आले आहेत रे?

जासूद०–महाराज, मगधदेशांतले.

मानाजी०–तूं माझ्यापुढें उभा राहूं नको. येथून चालता हो कसा. [ जासूद जातो. ] संताजी, अहो संताजी–काय करावें? हे सगळे विचार मनांत आले ह्मणजे माझें डोकें भडकून जातें.–संताजी, काय हो मी हांका मारतों आहेंना तुह्मांला?–आतांचा प्रसंग मोठा कठिण आहे. ह्यांतून निभावलों तर पुढें राज्य आणि धनदौलत. पण बहुतकरून ह्यांतच आमचा निकाल होणार! बरें असो. आणखी तरी जगून काय करायचें आहे! झालें तें पुष्कळ झालें. आतां काय आपले दहा गेले आणि पांच उरले. आतां काय व्हायचें असेल तें होईल. जन्मभर नीट वागलें ह्मणजे म्हातारपणीं आपला लौकिक वाढतो, चार लोक आपल्याला बरें म्हणतात, कोणावर आपण शब्द टाकला तर तो सहसा खालीं पडत नाहीं, चार लोकांशीं स्नेह जडतो. पण आमच्या कपाळीं हें कांहीं नाहीं. लोक मला उलट शिव्याशाप मात्र देत असतील. उघड उघड दिल्या नाहींत तरी मनांतून तरी खास देत असतीलच. माझ्या तोंडापुरता वरवर मला मान देतात, पण त्यांच्या अंतःकरणांत त्याचा लेश देखील नसतो. लोक भिले आहेत, त्यामुळें त्यांना आपला तिरस्कार स्पष्ट

करून दाखवितां येत नाहीं इतकेंच काय तें. असो. संताजी ! ( संताजी प्रवेश करतो. )

**संताजी**–महाराजांचा काय हुकूम आहे ?

**मानाजी०**–आणखी काय बातमी आहे ?

**संताजी**–सरकार, आपल्याला पूर्वीं जी बातमी कळली ती अगदीं खरी आहे असें पाठीमागून आलेले जासूद सांगतात.

**मानाजी०**–माझ्या मांसाचे तुकडे तुटून तुटून हाडापासून अगदीं वेगळे होईपर्यंत मी लढल्यावांचून कधींही राहणार नाहीं. माझें चिलखत मला आणून द्या.

**संताजी**–एव्हांशी चिलखत घालण्याचें कांहीं काम नाहीं.

**मानाजी०**–तरी पण मी घालणारच !—आणखी कांहीं स्वार पाठवा. आणि त्यांच्याकडून चोहोंकडची बातमी आणवा. आणि आपल्यापैकीं जे कोणी भीत असतील त्यांना आधीं फाशीं द्या.—माझें चिलखत मला आणून देतांना?—काय वैद्यबुवा, कशी काय तिकडची प्रकृति आहे ?

**वैद्य**–महाराज, बाईसाहेब इतक्या म्हणण्यासारख्या आजारी नाहींत, पण त्यांच्या मनांत एकापाठीमागून एक असे नानाप्रकारचे तरंग उठत असतात. त्यामुळें त्यांना झोंप लागत नाहीं.

**मानाजी०**–होय, ह्याच्यावरच तिला कांहीं तरी औषध द्या. मनाला कांहीं विकार झाला असल्यास त्याच्यावर देखील तुमच्यापाशीं औषध असेलच कीं नाहीं ? तिला ज्यापासून दुःख होत आहे त्याची वि-

स्मृति पडली पाहिजे. तिच्या मेंदूत जो घोटाळा झालेला आहे तो निघाला पाहिजे. आणि तिचें अंतःकरण ज्या भयंकर दुःखांनीं दडपून गेलें आहे त्याचा विसर पडण्याला कांहीं तरी एखादें गोडगोडसें रामबाण औषध शोधून काढा.

वैद्य–असल्या रोगावर ज्याचें त्यानेंच औषध शोधून काढलें पाहिजे. तें वैद्याला सांपडण्यासारखें नसतें.

मानाजी०–असें आहे काय ? तर मग आग लावा तुमच्या त्या वैद्यशास्त्राला चला. जा येथून! मला त्या औषधांची मुळींच गरज नाहीं! हं! चिलखत आणा इकडे! संताजी, आपले घोडेस्वार बाहेर जाऊं द्या!—वैद्यबुवा, माझे सगळे सरदार पळून गेले काय ?—हं जलदी करा!—वैद्यबुवा, जर तिच्या या रोगाची नीट चिकित्सा करून तिची प्रकृति तुह्मी पूर्ववत् ताळ्यावर आणून दिली तर तुमची मोठी वाहवा होईल. आणि चोहोंकडे तुमची कीर्ति पसरेल.—तो बंद सुटत नसला तर तोडून टाका!—काय हो वैद्यबुवा, हे मगधदेशांतलें सैन्य येथें आलें आहे हें घालवून लावण्याला तुमच्यापाशीं कांहीं मात्रा, किंवा चूर्ण, किंवा गोळ्या, कांहीं आहेत काय? हें सैन्य आलें आहे ही बातमी तुमच्या कानावर आली आहे कीं नाहीं?

वैद्य–होय सरकार. आपली ही लढाईची तयारी चालली आहे ह्यामुळें आमच्या कानावर ह्या बातम्या आल्या आहेत.

मानाजी०–मी पुढें जातों. तुह्मी तें मागून घेऊन या!

जोंपर्यंत बीरबनच्या रानांतील झाडें येथें चालून आलीं नाहींत तोंपर्यंत मला मरणाची मुळींच भीति नाहीं.

( जातो. )

**वैद्य**—मला आतां येथून पळ काढूं द्या. आपल्याला कोणी लाख रुपये दिले तरी सुद्धां मी येथें फिरून पाऊल टाकणार नाहीं. [ जातो. ]

---

## प्रवेश ४ था.

स्थळ—देवगडच्या किल्ल्याच्या आसपासचा प्रदेश.

( मल्हारराव, शिवदेवराव, त्यांचा मुलगा, मुकुंदराव, महिपतराव, हैबतराव, अंग्रे, लक्ष्मणसिंग, राणोजी, आणि शिपाई हातांत निशाणें घेऊन रणवाद्यें वाजवीत प्रवेश करितात. )

**मल्हार०**—मित्रहो, थोड्याच दिवसांनीं हा जुलूम नाहींसा होऊन चोहोंकडे स्वस्थता होईल.

**महिपत०**—ह्यांत कांहीं संशय नाहीं.

**शिवदेवराव**—आपल्या समोर हें कसलें अरण्य दिसतें आहे ?

**महिपत०**—ह्याला बीरबन असें ह्मणतात.

**मल्हार०**—प्रत्येक शिपायानें येथल्या झाडाची एक एक खांदी तोडून आपल्या समोर धरावी. कारण असें केलें ह्मणजे आपल्या सैन्यांतील लोक झाडाच्या खांद्यांनीं झांकून गेल्यामुळें आपले किती लोक आहेत हें शत्रूला मुळींच कळणार नाहीं.

**शिपाई**—ठीक आहे. आपल्या हुकुमाप्रमाणें आह्मी करतों.

शिवदेव०—आपल्याला आतांपर्यंत एवढीच काय ती बातमी लागली आहे कीं तो जुलमी मानाजीराव आपल्याच ऐटींत देवगड मुक्कामीं तळ देऊन बसला आहे. आणि आपण त्या देवगडाला वेढा दिला तरीही तेथेंच राहून तो किल्ला लढवायचा त्याचा विचार आहे.

मल्हार०—ह्याच्याशिवाय त्याला दुसरें कांहीं करतांच येत नाहीं. तेवढीच काय ती त्याला आशा बाळगण्याला जागा आहे. कारण संधि मिळाली कीं लहान थोर त्याला सोडून येत आहेत. ज्यांना कांहीं गत्यंतरच नाहीं असे लोक मात्र आतां त्याच्या चाकरीला उरले आहेत. आणि त्यांच्या सुद्धां मनांतून आपल्याच पक्षाला जय मिळावा असें आहे.

मुकुंद०—आधीं आपल्या हातून शौर्याचीं कामें होऊं द्या, आणि मग आपण शत्रूंच्या कृत्यांची चर्चा करीत बसूं.

शिवदेव०—आपल्या हातून काय काय कामें पार पडतात आणि काय काय पडत नाहींत हें थोडक्याच वेळांत आपल्याला कळून येणार आहे. आपण असें मनोराज्य करीत बसलों तर वाटतील त्या कल्पना करतां येतील. पण खरा परिणाम काय होतो ह्याचा निकाल आपल्या तरवारींचे प्रहारच करतील. तर चला आतां त्याच कामाला निघूं.

(सर्व कूच करून निघून जातात.)

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—देवगडचा किल्ला.

[ मानाजीराव, संताजी, आणि शिपाई निशाणें घेऊन नगारा वाजवित येतात. ]

**मानाजी०**—ह्या किल्याच्या अगदीं बाहेरच्या बुरजावर हें आपलें निशाण नेऊन रोवा. 'शत्रु आले रे आले' अशी ओरड अजून ऐकूं येत आहे. आपला हा किल्ला इतका कांहीं मजबूद आहे कीं त्यांनीं कितीही दिवस वेढा घातला तरी हा त्यांच्या हातीं लागायचा नाहीं. अन्नपाण्याची टंचाई आणि तापाची सांथ ह्यांच्या योगानें त्यांच्यातील सगळे मरून जाईपर्यंत त्यांना आतां खुशाल किल्याला वेढा देऊन बसूं द्या. आपल्या बाजूचे लोक त्यांना जाऊन मिळाले नसते तर आपण त्यांच्या तोंडास तोंड देऊन लढलों असतों. आणि त्यांना येथून पिटाळून लावलें असतें. ही ओरड कसली ऐकूं आली?

( पडद्यांत बायकांच्या रडण्याचा ध्वनि ऐकूं येतो. )

**संताजी०**—धनीसाहेब, हा बायकांच्या रडण्याचा शब्द असावा असें वाटतें. ( जातो. )

**मानाजी०**—भीति ह्मणजे काय असते ह्याचा सुद्धां आतां मला बहुतेक विसर पडला. पुर्वीं रात्रीची एखादी किंकाळी ऐकली ह्मणजे माझ्या सर्वांगाचा थरकांप होत असे. आणि एखाद्या पोथीपुराणांत भयंकर गोष्ट वाचली तरी देखील माझ्या अंगावर शहारे उठत असत. पण ते दिवस गेले. आतां अघोर कर्मांची पुष्कळच सवय झाली आहे. लोकांचे गळे

कापण्याचे विचार माझ्या मनांत नेहमीं घोळत असल्यामुळें भयंकर प्रसंगांचें माझ्या मनाला कांहीं सुद्धां वाटेनासें झालें आहे. [ संताजी येतो. ] कशाची ती ओरड होती ?

**संताजी०**—महाराज, राणीसाहेब मरण पावल्या !

**मानाजी०**—ती आणखी कांहीं दिवसांनीं मेली असती तर बरें झालें असतें! ही बातमी पुढें केव्हां तरी माझ्या कानावर आली असती तरी हरकत नव्हती !—पुढें केव्हां तरी !—उद्यां—उद्यां—उद्यां! मनुष्य मरेपर्यंत दररोज असें ह्मणत असतो. पण असें ह्मणतां ह्मणतां काळ त्याला ओढून नेतो. जाऊं द्या! ही माझी आतां थोडाच वेळ टिकणारी प्राणज्योति जाऊं द्या! आयुष्य ह्मणजे निव्वळ चालती सावली आहे! रंगभूमीवर येऊन ज्याप्रमाणें एखादा क्षुल्लक नट मोठ्या ऐटीनें छाती काढून चालतो आणि कपाळाला आठ्या घालून एक घटकाभर बोलतो आणि मग पुढें त्याचा आपल्याला कांहीं मागमूस देखील लागत नाहीं त्या प्रमाणें ह्या जगांत मनुष्यांची अवस्था आहे.

[ एक जासूद प्रवेश करतो. ]

तूं कांहीं तरी बातमी सांगण्यासाठीं आला आहेस असें दिसतें. काय असेल तें सांग पाहूं चटकन्.

**जासूद**—धनीसाहेब, मी जें ह्या डोळ्यांनीं पाहिलें तें आपल्याला कळविण्याला आलों आहें. पण तें कसें सांगावें हें मला समजत नाहीं.

**मानाजी०**—चल आटप सांग काय तें !

**जासूद**–मी त्या टेकडीवर पहारा करीत उभा राहिलों असतां माझी दृष्टि सहज त्या बीरबनच्या रानाकडे गेली, तेव्हां तें सगळें रानच्यारान चालूं लागलेलें माझ्या दृष्टीस पडलें.

**मानाजी०**–अरे लुच्या गुलामा, कांहीं तरी खोटें सांगतोस.

**जासूद**–मी खोटें सांगत असलों तर तुह्मी खुशाल रागें भरा. पण मी खरोखर सांगतों कीं तें रान चालत चालत सुमारें एका कोसावर येऊन ठेपलें आहे.

**मानाजी०**–जर तूं खोटें सांगत असलास तर ह्या पलीकडच्या झाडावर भुकेनें तूं मरेपर्यंत तुला टांगून ठेवीन. आणि तूं ह्मणतोस तें खरें असेल तर मग माझे पापाचे घडे भरलेच ह्मणायचे! माझा आतां धीर सुटत चालला. त्या चेटक्यांचें भाकित द्व्यर्थी असलें पाहिजे असें मला आतां वाटूं लागलें आहे. 'बीरबनचें रान देवगडच्या किल्याजवळ चालून येईपर्यंत तुला भीति नाहीं,' असें त्यांनीं मला सांगितलें होतें. आणि आतां हें बीरबनचें रान देवगडच्या किल्याजवळ चालून येत आहे.–चला उठा रे उठा! किल्यांतून बाहेर पडा! हा सांगतो आहे हें जर खरें असेल तर आतां येथून पळूनही जातां येत नाहीं, किंवा किल्याच्या आंत दडून बसून ही भागणार नाहीं!–मला ह्या जगाचा कंटाळा आला आहे आणि असें वाटतें कीं ह्याचा ह्यावेळीं प्रळय होऊन जाईल तर फार बरें!–सगळ्यांना इषारा मिळण्याकरतां शिंग फुंका!–वाहा! वाऱ्यांनों, मोठ्या सोसाट्यानें वाहा. आणि

एकदां हें सगळें जग उद्ध्वस्त करून टाका!—आपण तर लढाई करीत करीत देह ठेवणार. (सर्व जातात.)

---

## प्रवेश ६ वा.

स्थळ—किल्ल्यासमोरील मैदान.

(मल्हारराव, शिवदेवराव, मुकुंदराव, आणि त्यांचें सैन्य हातांत रणवाद्यें घेऊन नगारे वाजवीत आणि निशाणें नाचवीत प्रवेश करतात.)

**मल्हार०**—आतां आपण किल्ल्याच्या बरेच जवळ आलों. आतां हे शूर शिपायांनों, तुह्मी आपल्या आड धरलेल्या झाडाच्या खांद्या फेंकून द्या. आणि तुह्मी आपलें खरें स्वरूप प्रकट करा.—काकासाहेब तुह्मी आणि तुमचा मुलगा ह्या उभयतांनीं मिळून आज शत्रूला पहिला सामना द्यावा. बाकी राहिलेली कामगिरी मुकुंदराव आणि मी असे दोघे मिळून करतों.

**शिवदेव०**—ठीक आहे. आज रात्रीं शत्रु आमच्या आटोक्यांत तर येऊं द्या ह्मणजे मग त्यांना दाखवितों कसा काय पराक्रम आहे तो.

**मुकुंद०**—तुह्मी आपलीं सर्व रणवाद्यें वाजवायला हुकूम द्या. रणदुंदुभि ह्मणजे रक्तस्राव आणि मृत्यु ह्यांची बिनीच आहे.

(रणवाद्यें वाजतात व सर्व जातात.)

---

## प्रवेश ७ वा.

स्थळ—त्याच मैदानांतील दुसरें एक ठिकाण.

(मानाजीराव प्रवेश करतो.)

**मानाजी०**—ह्यांनीं मला मोठ्या पेंचांत अडकवून

धरिलें आहे. आतां मला पळून जातां येत नाहीं. एखाद्या अस्वलाप्रमाणें अखेरपर्यंत आतां मला लढलेंच पाहिजे.---पण मी एवढा भितों कशाला ? ह्यांच्यापैकीं स्त्रीच्या उदरांतून जन्माला आला नाहीं असा कोण असणार ? असा जो कोणी असेल तेवढ्याची मात्र मला भीति. दुसऱ्या कोणाची नाहीं.

( शिवदेवरावाचा मुलगा प्रवेश करतो. )

**मुलगा**—तुझें नांव काय ?

**मानाजी०**—तूं ऐकलेंस तर तुला त्या नांवाचें भय वाटेल.

**मुलगा**—छे, छे, तूं मोठा राक्षस असलास तरीही मी तुला भिणार नाहीं.

**मानाजी०**-तर मग ऐक. माझें नांव मानाजीराव.

**मुलगा**—दुसरें कोणतेंही नांव ऐकून माझ्या अंगाचा इतका संताप झाला नसता.

**मानाजी०**—आणि इतकी भीति पण वाटली नसती.

**मुलगा**—अरे जुलमी चांडाळा, मला भीति वाटण्याची गोष्ट तर सोडूनच दे. आणि तुझी अशानें खात्री होत नसेल तर ह्या माझ्या तरवारीनें तुझी खात्री करून देतों.

(ते एकमेकांशीं लढतात आणि शिवदेवरावाचा मुलगा मरून पडतो.)

**मानाजी०**—तूं स्त्रीच्याच उदरांतून जन्माला आला असला पाहिजेस ! स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या माणसानें कितीही गुरकावण्या दाखवल्या तरी मी त्याला जुमानीत नाहीं. त्याच्या तरवारीची मला मुळींच भीति नाहीं.

[ जातो. ]

( रणवाद्यें वाजतात आणि मुकुंदराव प्रवेश करतो. )

**मुकुंद०**–ह्या बाजूनें गलबला ऐकूं येत आहे.—त्या जुलमी चांडाळाला हुडकून काढलेंच पाहिजे. कारण माझ्या शस्त्राचे घाव लागल्यावांचून जर तो मेला तर मी आपल्या बायकोचा आणि मुलांचा सूड उगविला नाहीं ह्मणून तीं भुतें होऊन नेहमीं माझ्या मानेस बसतील. पगार देऊन लढाई करण्याकरितां धरून आणलेल्या गरीबगुरीब शिपुर्ड्यांना—-त्या बाजारबुणग्यांना—-मारण्यांत काय पुरुषार्थ आहे ! मानाजीराव, ह्या तरवारीला एक तुझा तरी बळी देईन, नाहीं तर ती दुसऱ्या कोणावर न चालवितां म्यानबंद करीन. इकडेच तूं असला पाहिजेस. हा मोठा गलबला कोणातरी मोठ्याच मनुष्याबद्दल असला पाहिजे. दैवा, मानाजीराव माझ्या हातीं लागूं दे आणि मग मला तुझ्यापाशीं दुसरें कांहीं मागावयाचें नाहीं. [ जातो ]

(भयसूचक रणवाद्यें वाजतात.)

( मल्हारराव आणि शिवदेवराव प्रवेश करतात. )

**शिवदेव०**–धनीसाहेब, इकडून या असे. किल्ला हळुहळु आपल्या हातीं येत चालला आहे. मानाजीरावाचे लोक दोन्ही बाजूंनीं लढत आहेत. आपल्या सरदारांनीं आज खुप निकरानें लढाई चालविली आहे. आणि आतां जय बहुतेक आपल्याच बाजूला मिळाल्यासारखा आहे.

**मल्हार०**–शत्रू आपल्यावर मारा करीत आहेत खरा पण तो अगदीं चुकतो आहे.

**शिवदेव०**–चला आपण किल्ल्यांत शिरूं या.

[ जातात. ]

[मानाजीराव फिरून प्रवेश करतो.]

**मानाजी**०—एखाद्या वेड्याप्रमाणें मी आपल्याच तरवारीनें आपला गळा कापून घेतला तर त्यांत काय शहाणपण ? माझ्या समोर शत्रु लढत असतांना त्याच्यावर वार करायचे टाकून मी आपल्यावरच काय ह्मणून करावे ?

( मुकुंदराव फिरून प्रवेश करतो. )

**मुकुंद**०—फिर, अरे हरामखोर, मागें फिर ! अरे लांडग्या, चाललास कोठें !

**मानाजी**०—तुझी आणि माझी गांठ पडूं नये ह्मणून मी फार प्रयत्न करीत होतों. पण अजून तूं परत जा.——मुकुंदराव, तुझ्या कुळांतील रक्ताची मला अगदीं ओकारी आली आहे.——जा. येथें एक अक्षरसुद्धां बोलायला उभा राहूं नको.

**मुकुंद**०—मला कांहीं बोलायचें नाहीं. जें बोलायचें तें ही तरवार बोलेल. तुझ्या अघोर कर्माचें वर्णन करण्याला शब्द किती पुरणार आहेत ?

( दोघे लढतात. )

**मानाजी**०—तुझे हे श्रम व्यर्थ आहेत. तूं आपली तरवार ह्या हवेवर मारलीस तर तिच्या अंगांतून जितकें रक्त निघेल तितकेंच माझ्या अंगांतून निघेल हें तूं पक्कें समज. ज्या शरीराला जखम लागेल त्याच्यावर तूं आपल्या तरवारीचे पाहिजे तितके घाव खुशाल मार. माझ्यावर तुझें शस्त्र चालणार नाहीं. स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या कोणत्याही मनुष्याच्या हातून मला मरण येणार नाहीं असा मला वर मिळाला आहे.

**मुकुंद**०—तुझा वर बीर आतां एकीकडे ठेव. ज्या

कुणी चेटक्यांनीं तुला हा वर दिला त्यांनींच तुला सांगायला पाहिजे होतें कीं हा मुकुंदराव आपल्या आईच्या पोटांतून जन्मास आला नाहीं तर आईचें पोट फाडून त्याला बाहेर काढलेला आहे.

**मानाजी०**—हे शब्द ज्या जिभेनें उच्चारले ती जळून खाक कां झाली नाहीं ! कारण ह्या शब्दांनीं माझ्या हृदयांतील धीर अगदीं नाहींसा करून टाकिला. आणि ह्या चेटक्या––ज्या द्व्यर्थी भाषणें बोलून मनुष्याला खड्यांत पाडतात, ज्या कानाला गोड गोड लागणाऱ्या थापा मारतात, आणि परिणामाची वेळ आली म्हणजे ज्या निराशा करतात—त्या ह्या चेटक्यांच्या बोलण्यावर कोणीही भल्या माणसानें इतःपर भरंवसा ठेवूं नये.—मुकुंदराव मी तुझ्यापाशीं लढणार नाहीं.

**मुकुंद०**—तर मग, अरे भित्र्या, मला शरण ये, म्हणजे तुझे प्राण वांचतील. आणि मग ज्याप्रमाणें वाघ किंवा सिंह ह्यांना सांपळ्यांत कोंडून लोकांना दाखविण्याकरितां ठेवतात त्याप्रमाणें तुला ठेवून देऊं, आणि ' जुलमी राजा ' अशीं अक्षरें त्या सांपळ्यावर लिहून ठेऊं.

**मानाजी०**—मी कधींही तुला शरण येणार नाहीं. तो कालचा पोर मल्हारराव त्याच्या पायापुढें हें डोकें मी जमिनीला कधीं लावणार नाहीं. जरी बीरवनचें रान देवगडच्या किल्ल्याजवळ चालून आलें आणि स्त्रीच्या उदरांतून जन्मलेला तूं जरी माझ्या समोर सामना देण्याला उभा आहेस तरीही मी एकदा शेवटचे हात पाय हलवल्या वांचून राहणार नाहीं. ही मी आपल्या-

पुढें आपली ढाल धरतों आणि मुकुंदराव, तूं आतां कर माझ्यावर प्रहार! पण हें लक्षांत ठेव कीं ' पुरे, बस पुरे ! ' असें जो कोणी ह्मणेल तो नरकांत गेल्या वांचून रहाणार नाहीं. ( दोघेही लढत लढत निघून जातात.)

[ रणवाद्यें वाजतात आणि मल्हारराव, शिवदेवराव, राणोजी, व दुसरे सरदार आणि शिपाई निशाणें घेऊन प्रवेश करितात. ]

**मल्हार०**—जे आपले स्नेही येथें दृष्टीस पडत नाहींत ते लढाईंतून वांचून सुरक्षितपणें परत येऊन आपल्याला भेटोत म्हणजे झालें.

**शिवदेव०**—एवढ्या लढाईंत कांहीं तरी मरणारच. पण आपले बहुतेक लोक येथें दिसत आहेत. त्या मानानें पाहिलें तर इतके थोडे लोक मरून एवढी मोठी लढाई आपण जिंकली हें फार चांगलें झालें.

**मल्हार०**—मुकुंदराव कोठें दिसत नाहींत, आणि तुमचा मुलगा—

**राणोजी०**—तुमचा मुलगा आपल्या शिपाईगिरीचें सार्थक करून गेला ! तुमचा बच्चा नुकताच जवान होत चालला होता. आणि ह्या लढाईंत न डगमगतां खऱ्या जवानमर्दाप्रमाणें त्यानें आपली तरवार गाजवून अखेरीस प्राण सोडला.

**शिवदेव०**—तर मग तो मेलाच काय !

**राणोजी**—होय. आणि त्याचें प्रेत रणांगणांतून आह्मी उचलून इकडे आणिलें आहे. आपल्या मुलाचे एक एक गुण आठवून जर तुम्ही रडत बसलां तर तुमचा शोक कधींच संपणार नाहीं. कारण त्याचे गुण खरोखरच अनंत होते.

**शिवदेव०**—तरें पण त्याला ज्या जखमा लागल्या आहेत त्या त्याच्या पाठीवर नाहींत ना ?

**राणोजी**—छे, छे, पाठीवर एकही नाहीं.

**शिवदेव०**—मग खुशाल मरूं द्या त्याला. वर गेल्यावर माझा मुलगा देवाला देखील आवडता होईल. आणि तो तेथें देखील देवाच्या शिपाइगिरीचें काम बजावील. अशा रीतीनें मृत्यु येत असेल तर माझा एक मुलगाचसा काय पण माझ्या अंगावर जितके रोमांच आहेत तितके मुलगे मला असते तरी त्या सर्वांनाही मी मृत्यूच्या तोंडीं देण्याला तयार झालों असतों. असो. अशा रीतीनें त्याचा अंत झाला !

**मल्हार०**—त्याची योग्यता फार मोठी होती. आणि त्या मानानें त्याचें नांव राहण्याला योग्य तजवीज मला केली पाहिजे.

**शिवदेव०**—कसली फार मोठी त्याची योग्यता आली आहे ! त्यानें आपली तरवार गाजविली असें चार लोक म्हणत आहेत हें पुष्कळ झालें. आतां स्वर्गलोकांत त्याला सुख मिळो म्हणजे झालें!—ही पहा केवढी आनंदाची गोष्ट झाली ती! [ मानाजीरावाचें शिर घेऊन मुकुंदराव प्रवेश करतो. ]

**मुकुंद०**—महाराजांचा जयजयकार असो. कारण आतां तुम्ही खरोखरच महाराज झालां. हें पहा त्या चांडाळाचें शिर आपल्यापुढें आणलें आहे. आतां आपण स्वतंत्र झालों. आपल्या राज्यांतील सर्व ठळक ठळक रत्नें आपल्या भोंवताली उभीं आहेत. आणि मी जेव्हां आपल्याला महाराज म्हणून आपला जयज-

यकार केला तेव्हां त्यांनींही तो आपल्या मनांत केलाच असेल. परंतु माझी अशी इच्छा आहे कीं त्या सर्वांनीं मोठ्यानें माझ्या बरोबर आपला जयजयकार करावा. महाराजांचा जयजयकार असो !

**सर्व**—महाराजांचा जयजयकार असो! (वाद्यें वाजतात.)

**मल्हार॰**—मित्रहो, तुम्ही जी माझ्याबद्दल तसदी घेतली आहां त्याबद्दल मी तुमचा उतराई लवकरच होईन. माझे सरदार आणि भाऊबंदहो, आपल्या देशांतील जे अतिशय मोठे मानमरातब आहेत ते सर्व मी तुम्हांला आज देतों. तसेंच जुलूम करण्यासाठीं कोठें कधीं संधि सांपडेल म्हणून डोळ्यांत तेल घालून बसलेल्या ह्या चांडाळाच्या कचाटींतून सुटून जे आपले इष्टमित्र परदेशीं जाऊन राहिले आहेत त्यांना आपापल्या घरोघर येऊन राहण्याकरितां बोलाविलें पाहिजे. ही राणी दर्याबाई—मला वाटतें हिनें आपल्याच हातानें आपल्या जिवाचा अंत करून घेतला असावा!— ही अवदसा आणि हा गुलाम खाटीक ह्या दोघांचे साथीदार कोण कोण आहेत ते शोधून काढून त्यांना शिक्षा दिल्या पाहिजेत. पण ह्या आणि दुसऱ्याही कित्येक अवश्य गोष्टी परमेश्वराच्या कृपेनें थोडक्याच वेळांत योग्य स्थळीं आणि योग्य वेळीं आपण करूं. मी तुमच्यापैकीं प्रत्येकाचा फार फार आभारी आहें. आणि उदईक राज्याभिषेकाचा समारंभ साजरा करण्याकरतां आपण सर्वांनीं यावें अशी मी आपल्याला विनंति करतों.

( वाद्यें वाजतात आणि सर्व जातात. )

---

समाप्त.